
म. ग्रं. सं. ठाणे
विषय चरित्र
सं. क्र. १३२७
१८६१



REFBK-0011637

# यशवंत गोपाळ जोशी

# लक्षांत राहिलेलीं माणसं

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ३८३४७ ...... दि: ..................
क्रमांक ...................... नों. दि. ३.२.६९

: लेखक :

य. गो. जोशी

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्र. ११६३७

मूल्य रु. २·७५

REFBK-0011637

व्हीनस प्रकाशन : पुणें

आवृत्ति पहिली
जानेवारी १९६१

*  *  *

सर्व हक्क प्रकाशकांचे स्वाधीन

*  *  *

चित्रकार
पाथरकर

*  *  *

प्रकाशक :
स. कृ. पाध्ये
व्हीनस प्रकाशन
४१० शनवार पेठ पुणें २.

*  *  *

मुद्रक :
ल. स. केळकर
विश्वविद्या मुद्रणालय
६२३।२९ सदाशिव पेठ : पुणें २.

# प्र स्ता व ना

'लक्षांत राहिलेलीं माणसं' पहिल्यांदा माझ्या 'प्रसाद' मासिकांत प्रसिद्ध झालीं, त्यावेळीं तीं लोकांना फार आवडलीं व पुस्तकाची मागणी सुरू झाली. 'संस्कृत कोशाच्या' मोठ्या प्रकाशांत हें पुस्तक छापण्याची मला सवड नव्हती. माझे स्नेही श्री. स. कृ. पाध्ये व्हीनस प्रकाशन यांनी हें पुस्तक छापण्याची इच्छा दर्शविली त्यामुळे हें पुस्तक आज प्रसिद्ध होत आहे.

'लक्षांत राहिलेलीं माणसं' हीं सत्यसृष्टींत एकदा वावरून गेलेलीं आहेत. तीं माझ्या परिचयाचीं होतीं. मी फक्त त्यांचीं नांवें बदललीं आहेत. त्या माणसांनी व त्यांच्या कथांनी माझ्या मनाला आकर्षण निर्माण झालें होतें. अशीं अनेक माणसें अजून माझ्या लक्षांत आहेत. तींहि केव्हा तरी लिहीन. सदर पुस्तकाचीं मुद्रितें पाहतांना तीं माणसें मला पुन्हा भेटून गेलीं—नजरेसमोर आलीं आणि गेलीं. पुन्हा पुनःप्रत्ययाचा आनंद वाटला. "जीवन हें असें आहे!" असें जीवन वाङ्मयांत फार थोडें दिसतें. आपलें अलीकडील बहुतेक मराठी ललित वाङ्मय हें 'वाङ्मय वाचून लिहिलेले वाङ्मय' असावें असें मला वाटतें. 'ही लक्षांत राहिलेलीं माणसं'—'त्यांच्या जीवनाच्या दृष्टीने लहान-मोठीं कशीं वाटलीं तरी-जिवंत आहेत. प्रत्यक्ष जीवनांतून उचललेलीं आहेत. याची गोडी कांहीं निराळी आहे. कदाचित् वाचकहि माझ्या या मताशीं सहमत होतील अशी मला आशा आहे. वाचकांना जर या 'माणसांत' विशेष कांहीं वाटल्याचें मला वाचायला—ऐकायला मिळालें तर अशीं अनेक आयुष्यें—माणसें माझ्या नजरेसमोरून गेलेलीं आहेत त्या आयुष्यांच्या प्रतिमा मी जरूर वाङ्मयांत आणून ठेवीन!

'प्रसाद'—पुणें.<br>
१०-१-१९६१<br>
मकरसंक्रांत

सर्वांचा कृपाभिलाषी<br>
यशवंत गोपाळ जोशी

●●●

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम ३५०३५८१ वि: ....
क्रमांक ........ नों: दि: [illegible]
११६३८ ठाणा (स्थळ प्रत)

# एक

मला वाटतें १९२० सालांतील ती गोष्ट असावी. मी नुकताच नोकरीला लागलों होतों. आणि त्या नोकरींत असतांनाच त्याची माझी पहिली ओळख झाली.

शंभरांत देखणी अशी त्याची शरीरयष्टि होती. अंगावर किंमतवान् पोशाख होता. कोणाचेंहि लक्ष आपल्याकडे आकर्षून घेतील असे वेगळेपणाने चमकणारे घारे घारे डोळे-विशाल भालप्रदेश—सफाईने इंग्रजी बोलण्याची पद्धत-एखाद्याला वाटावें, हा नुकताच विलायतेहून बॅरिस्टर होऊन आला असावा !

पण तो एक साधा मॅट्रिक होता. पण इंग्रजी भाषेची किमया त्याने साध्य केली होती. त्याचे अनेक युरोपियन दोस्त होते; आपली नोकरी साधून त्याने कांही इंग्रजी व्यक्तींना 'मराठी' शिकविण्याच्या शिकवण्या धरल्या होत्या. त्याच्या हातांत नेहमी पैसा खेळता असे.

चार मित्र सुट्टीच्या दिवशीं जमले की, खाण्यापिण्याचा खर्च नेहमी तोच करी. माझी परिस्थिति त्या वेळीं साधारणच होती. मला मिळे तें घरीं द्यावें लागे. स्नेह्यासोबत्याकरिता—सिनेमा नाटकाकरिता—खर्च करायला मला सवड नसे. त्याच्या मैत्रींत मी फक्त महिना दोन महिने राहिलों. मला त्याची मैत्री परवडणार नाही असें वाटलें. आणि तो जरी मनाचा उदार होता तरी एकाने खर्च करीत राहावें आणि आपण खात-चैन करीत

राहावें हें माझ्या वृत्तीला परवडेना ! पण तो गृहस्थ माझ्या लक्षांत राहिला होता.

त्याचें नांव होतें विनायक.

पुढे पुढे रस्त्यांने मला तो नेहमी भेटे. आम्ही एकमेकांना नमस्कार करीत असूं. त्याच्या लग्नाचें मला आमंत्रण आलें होतें.

मी लग्नाला गेलों होतों. त्याच्या रूपसौंदर्याला साजेशीच पत्नी त्याला मिळाली होती.

लग्नांत एकमेकांशेजारी फुलांच्या माळांनी सजलेलें-सुहास्यानें नटलेलें तें दांपत्य अजून मला माझ्या डोळ्यांपुढें दिसतें आहे !

काळाच्या गालिच्याला आणखी पांच घड्या पडल्या. आमच्या आयुष्यांतून पाच वर्षें निघून गेलीं होतीं.

एक दिवस सहज वर्तमानपत्र वाचीत होतों. विनायक ज्या कंपनींत नोकरीला होता त्या कंपनीचें दिवाळें वाजल्याची बातमी त्या दिवशींच्या वर्तमानपत्रांत छापून आली होती.

ती बातमी वाचतांच माझ्या डोळ्यांपुढे विनायकाचें लग्न उभें राहिलें— फुलामाळांनी आणि सुहास्याने नटलेलें, विनायक आणि त्याची पत्नी सरस्वती-आपल्या पुढील आयुष्याच्या सुखस्वप्नांचें ज्यांच्या डोळ्यासमोर मंद–मधुर धुकें वावरत आहे असें, तें नवदांपत्य !

पण त्या बातमीचा माझ्या मनावर कांहीच परिणाम झाला नाही. कारण विनायक हुषार होता. त्याला कोठेहि नोकरी लागेल किंवा त्याने आपली अगोदरच कुठेतरी सोय लावली असेल. त्याने जवळ चांगली मायाहि केली असेल.

आणि ही माझी कल्पना कांही केवळ कल्पनेवर आधारलेली नव्हती ! मधे एकदा त्या विनायकाची सरस्वती रस्त्याने जातांना पाहिली होती, तेव्हा तिच्या हातांत गोठतोड्यांसकट दागिने मीं पाहिले होते. गळ्यांत मोत्यांचे दागिने दिसत होते. तोंडावर माझ्या लक्षांत राहिलेलें तें तिच्या विवाहप्रसंगीचेंच हास्य दिसत होतें.

-मधे आणखी कांही वर्षांचा धुराळा होऊन उडून गेला.

आणि एक दिवस तो माझ्याकडे आला.

" कोण ! विनायकराव ! ! –या–या– " त्याचें मीं अत्यंत उत्साहाने स्वागत केलें.

पण माझ्या त्या स्वागतपर शब्दांचा त्याच्यावर चांगला परिणाम झालेला दिसला नाही.

" कां ! आज इकडे कोणीकडे ! " त्याला चहा देत मी म्हटलें.

" कांही नाही-अगदी सहज ! " आणि तो गमतीदार हसला. त्याच्या हास्याची चव पूर्वीसारखीच होती !

नंतर आम्ही खूप मोकळ्या मनाने गप्पा मारल्या. आमच्या त्या वेळच्या मित्रांची चौकशी केली. " सर्वांचें त्यांच्या त्यांच्या मानाने बरें चाललें आहे ! " असें त्याने सांगितलें.

" आणि सध्या आपलें काय चाललें आहे ? "

अचानक एखाद्या विंचवाने डंख मारावा असें त्याला माझा हा प्रश्न ऐकून झालें. तो ताडकन् उठला. त्याने एक जांभई दिली; आणि " येईन पुन्हा केव्हा तरी ! " असें आळस देत म्हणत तो जसा अचानक आला तसा अचानक चालूं लागला.

मला आश्चर्य वाटलें. मी त्याच्या जाण्याकडे पाहतच राहिलों !

नंतर मला कळलें, तो माझ्या ओळखीने कुठे खाजगी जमाखर्च वगैरे लिहिण्याचें काम मिळालें तर विचारायला आला होता.

मीं त्याची समग्र माहिती काढली आणि त्या माहितीमुळे माझें डोकें सुन्न झालें.

त्याचे वडील असेच अपघाती लहानपणी वारले होते. त्याच्या आईने चार घरीं काबाडकष्ट करून त्याचें शिक्षण केलें होतें. तिला विनायक हा एकच मुलगा. दिसायला देखणा, अभ्यासांत हुषार आणि गरिबीला लाजवणारें तोंडावरचें दैवी हास्य. आईच्याच ओळखीने त्याला एकदम ती मोठ्या पगाराची नोकरी लागली होती ! इंग्रजी पत्रव्यवहार करण्यांत तो फर्डा होता. टाईपरायटिंग करण्यांत त्याचा हात धरणारा कोणी नव्हता. तो टाईपरायटरवर काम करायला लागला की, एखाद्याने बाजाच्या पेटीवर एखादें सुस्वर पद वाजवावें तसा आवाज होई. जणूं तो

' टाईप ' करीत असलेले शब्दच नादमधुरपणाने आवाज करीत आहेत आणि विरून जात आहेत !

पुढे त्याचें लग्न झालें. त्यांनी आनंदी ससार थाटला.

पण ऋणानुबंध सुटूं नयेत म्हणून त्याच्या आईने आपलीं कामाचीं घरें सोडलीं नव्हतीं आणि आता ती फारशी घरीं कधीच जात नसे. जिथे ती काम करी तिथेच कुठे तरी ती राही-आज या घरीं, उद्या त्या घरीं !

" पार्वतीबाई—" विनायकरावांच्या आईचें नांव-" आता कशाला काम करतां तुम्ही ? " कोणी तरी विचारावें.

" मग काय बसून राहूं ?— अहो, पूर्वीं गरज होती म्हणून काम करीत होतें. आता गरज नसतांना काम करीत आहें. या काम करण्यांत निराळा आनंद आहे ! आणि शिवाय मुलाच्या सुखी संसारांत माझी लुडबुड कशाला ! "

" आणि परवा काय झालें, त्याच्याकडे आता मोठीं मोठीं माणसें येतात. मींहि चार मोठ्या घरींच कामें केलेलीं-मला सगळीजणं ओळखतात. तो बोलला नाही हं ! पण मी त्याची आई आहें, हें कळायला नको कुणाला. मला आपलं सहज वाटलं, त्यामुळे त्याला चोरट्यासारखं वाटत असेल. माझीच हो ही कल्पना ! तो कांही बोलला नाही ! "

"—मला वाटेल तेव्हा मी घरीं जातें. गेल्याबरोबर सूनबाई मला आदराने चहा करून देते, जेवायला राहण्याचा आग्रह करते, केल्या कष्टाचं समाधान भेटतं मला त्यांच्या संसाराकडे पाहून ! "

आणि नंतर पार्वतीबाई फारसें काम करीनाशा झाल्या. थोडें थोडें कुठे काम करीत आणि फावल्या वेळीं विनायकरावांचीं मुलें-आपलीं नातवंडें-कडेखांद्यावर घेऊन कामाला हिंडत-कौतुकाने हिंडत !

आणि नंतर कांही दिवसांनी विनायकरावांची नोकरी सुटली. मनुष्य हुषार असल्यामुळे त्यांना अनेक नोकऱ्या सांगून आल्या. पण पूर्वींइतका पगार मिळेना. आणि कमी पगारावर नोकरी करण्याचें विनायकरावांना अपमानास्पद वाटूं लागलें !

विनायकराव ठराविक वेळेला जेवून घराबाहेर पडत; संध्याकाळीं नेमक्या वेळीं परत येत !

एक दिवस सरस्वतीने विचारलें, "जमलं का कुठे नोकरीचें!"

विनायकराव हसत म्हणाले, "तुला काय करायचं आहे! तुला कांही कमी पडलं आहे का? मग मी रोज नेमके कुठे जातों हें तुला कशाला विचारायला पाहिजे? माझ्या संसाराची मला कांही काळजी नाही का?"

सरस्वतीबाई यावर काय बोलणार! आपल्याला नोकरी मिळत नाही हें आपल्या बायकोलासुद्धा सांगण्याचा विनायकरावांना कमीपणा वाटूं लागला.

विनायकरावांना स्नेहीसोबती खूप होते. त्यांनी आतापर्यंत आपली पत खूप राखली होती. स्नेह्यासोबत्यांकडून कर्जाऊ पैसे घेऊन वर्ष–सव्वा वर्ष ते बायकोला नेमाने घरखर्चास पैसे देत.

विनायकराव हसत होते. सरस्वतीबाई हसत होत्या. मुलाबाळांची चैन चालली होती. पण विनायकरावांच्या आईने ओळखलें होतें–हें हसणें रिकामें आहे.

एक दिवस मायलेकरांची रस्त्यांत अवेळीं गाठ पडली–दुपारी तीन साडेतीनच्या सुमारास.

"विनायक!" पार्वतीबाई म्हणाल्या, "अजून नोकरीचें जमलें नाही का रे कुठे?"

या प्रश्नाने विनायकरावांच्या वर्मी घाव बसला. त्यांच्या नोकरीचें कुठेच जमलें नव्हतें. गावांतली पत संपत आली होती. आपण अवेळीं रिकामें गावांत हिंडत आहोंत, हें आईने पाहिलें. तिने बहुतेक आपली परिस्थिति ओळखली! विनायकरावांनी टापरून आईला म्हटलें, "माझें चांगलें होतें, तरी तुला दुसऱ्याच्या इथलीं कामें करण्याची हौस होतीच! कशी मला लागणार नोकरी?"

पार्वतीबाईंच्या डोळ्यांत पाणी आलें. त्या वेळीं त्यांच्या कडेवर विनायकरावांचाच मुलगा होता. त्याच्याकडे आणि आपल्या आईकडे पाहून विनायकरावांच्याहि डोळ्यांत पाणी आलें. "आई, तुझ्याजवळ पैसे आहेत का कांही? मी सध्या फार अडचणींत आहे. तुझे परत करीन एक-दोन दिवसांत!"

डोळे पुशीत पार्वतीबाई म्हणाल्या, "आहेत थोडेसे. किती पाहिजेत तुला? कामाचे पैसे साठवून ठेवले आहेत, या नातवंडांकरिता; तुझें आता कांही

मीं ऋण लागत नाहीं. केव्हा देशील माझे पैसे परत ?"

"एक दोन महिन्यांत!" विनायकराव आशाळभूतपणाने म्हणाले.

—आणि आपली आई पोस्टांत पैसे ठेवते हें विनायकरावांना ऐकून माहीत होतें. एक दिवस विनाकरावांनी पोस्टांत ओळखीने आईच्या खात्यांत किती रक्कम आहे ती पाहिली. त्यांच्या तोंडाला पाणी सुटलें. "एवढी रक्कम आपल्या एकदम हातांत आली तर—आपण हा धंदा करूं, तो धंदा करूं, नाहीतरी नोकरींत हल्ली कुठे राम राहिला आहे!"

आईजवळून मागून घेतलेले पैसे विनायकराव परत करूं शकले नाहीत आणि शिवाय आईजवळच त्यांनी मोठी रक्कम मागितली.

"अरे, माझ्याजवळ कुठले एवढे पैसे?" पार्वतीबाई नकार देत म्हणाल्या

"मुलाजवळ खोटें बोलतेस?" विनायकराव हसत म्हणाले, "पोस्टांत तुझ्या नांवावर किती पैसे आहेत हें मीं पाहिलें आहे!"

"पण मला ते तुला द्यायचे नाहीत!" पार्वतीबाई निग्रहाने म्हणाल्या.

विनायकराव परिस्थितीने चेकाळले होते ते चिडून म्हणाले, "पण एवढे पैसे काय करायचे आहेत तुला? तुला काय पुन्हा संसार करायचा आहे?"

पार्वतीबाईंनी विनायकरावांकडे भयंकर नजरेने पाहिलें. त्यांनी डोळ्यांत आलेले अश्रु पुसले आणि एका शब्दानेहि प्रत्युत्तर न देतां त्या घराबाहेर पडल्या. त्राग्यानेच त्या पोस्टांत गेल्या. त्यांनीं आपल्या नांवावरची सर्व रक्कम काढली आणि दुसऱ्या ठिकाणीं ठेवून दिली.

दिवसांमागून दिवस जात होते. विनायकरावांना नोकरी मिळाली नाही त्यांनी कांही धंद्याचा प्रयत्न करून पाहिला, तो अंगावर आला. सर्व बाजूंनी परिस्थिति कोसळत होती. पण कमी पगारावर नोकरी करणार नाही!" हा विनायकरावांचा अभिमान कायम होता!

सरस्वतीबाईंच्या अंगावरचे सर्व दागिने नाहीसे झाले. विनायकरावांना खरें कर्ज किती आहे, याचा कुणालाच अंदाज लागेना. विनायकराव कुठे काम धंदा पाहीनात. आपल्याला कुठेतरी एकदम मोठी नोकरी मिळेल हा त्यांचा भ्रम अद्याप कायम होता. त्यांचे सर्व स्नेही तुटले होते!

"अरे, माझ्या आयुष्याचें सर्व दिवस काय असेच राहणार आहेत?"

विनायकराव आता आपल्या पोराबाळांना आणि बायकोलाच ऐकवीत "अरे, एक दिवस पाहाल तुम्ही. तुम्हाला खूप खूप कपडेलत्ते करीन आपण मोटार घेऊं स्वतःची. घर बांधूं. तुम्ही काय समजलांत?"

विनायकरावांची पत्नी, मुलें सर्व कांहीं समजून चुकलीं होतीं. आपला नवरा शहाणा वेडा आहे हें सरस्वतबाईंनी ओळखलें होतें—आपला बाप हुषार आहे हें विनायकरावांच्या मुलांना कळलें होतें !

विनायकराव आता घरांतल्या घरांतच असतात. त्यांची तब्येत आता खूप ढासळली आहे. त्यांना दमा खोकला कायमचा जडला आहे. पाठीला पोक आला आहे. अंगावर धड कपडा नाही. त्या अंगावरच्या लक्तरांनी विनायकराव आता बाहेर जायलासुद्धा लाजतात; पण त्यांचें तोंडावरचें तें हसणें मात्र अद्याप कायम आहे.

—सरस्वतीबाईंच्या सुद्धा !

—सरस्वतीबाईहि आता बाहेर कामाला जाऊं लागल्या होत्या. विनायकरावांचीं सुंदर आणि हुषार मुलें आता शाळेंत अभ्यास करून फावल्या वेळांत 'आलेपाक वड्या–वर्तमानपत्रें' विकत होतीं !

विनायकरावांच्या शरीराचा–मनाचा सर्व अभिमान आता पार कोलमडला होता. एकदा सरस्वतीबाईंनी जिथे कामाला जात तिथून त्यांना सणावाराचें कांही खायला मिळाले–तें त्यांनी घरीं आणलें. ते पाहून विनायकराव हसत म्हणाले, "हं–मला दे ते खायला. माझी आई कामाला जात असे, ती मला असेंच खायला आणून देत असे, अन् मगच मला मोठी नोकरी लागली. चल आण, आण तें खायला. मला आता लौकरच मोठी नोकरी लागणार आहे !"

सरस्वतीबाई ते जिन्नस आपल्या मुलांना खायला देणार होत्या; पण विनायकरावांचा शब्द त्यांना मोडवेना. त्यांनी तें आणलेलें सर्व विनायकरावांना खायला दिलें !

तें खात खात विनायकराव आपल्या पत्नीला म्हणाले, "आता मला फार मोठ्या पगाराची नोकरी लागणार आहे. कोणत्याहि गोष्टीची तपश्चर्या पुरी व्हायला पाहिजे. परमेश्वर तरी माझे किती हाल करील ! उद्या एका ठिकाणीं नोकरीचा अर्ज करणार आहे. लिहितांना आता हात

कापतो माझा. पण एके काळीं माझं अक्षर काय वळणदार होतं ! आहे काय एखादा कोरा कागद ? चल, आण; येवढं खाणं झालं की करतोंच अर्ज ! " आणि विनायकराव खात खात हसूं लागले.

सरस्वतीबाईंनी आणलेलें सर्व आपल्या पतिराजांना खायला दिलें; पण नोकरीचा अर्ज करण्याकरिता एक कोरा कागद त्या आपल्या पतिराजांना द्यायला तयार नव्हत्या. कारण कालच त्यांनी एक पैशाचे दोन कोरे कागद मुलांना पुस्ती लिहिण्याकरिता आणले होते.

विनायकरावांचें खाणें संपलें. ते खोकत-खोकत नोकरीचा अर्ज करण्याकरिता कागद घेऊं लागले.

सरस्वतीबाई आतां मात्र रागावून म्हणाल्या, " हं, तो कागद घेऊं नका. पुरुषाला तो उद्या शाळेंत न्यायला पाहिजे आहे ! "

विनायकरावांनी रागाने तो कोरा कागद खालीं टाकला व म्हणाले, " तुमच्या नशिबांतच दारिद्र्य आहे त्याला आम्ही काय करणार ! भोगा दारिद्र्य ! करा दुसऱ्याकडे कामं ! मला चांगला पगार मिळत होता तरी आईने काम करणें सोडलें नाही. तुम्हीहि तोच कित्ता गिरवीत आहांत. मला बाहेर तोंड काढायला जागा नाही. मी हजार-पांचशेंची नोकरी मागायला जाणार आणि कुणीं विचारलं की, येवढी मोठ्या पगाराची तुम्हांला नोकरी पाहिजे, मग तुमची बायको कां हो कामाला जाते ?— मुलं कां हो आलेंपाक वड्या आणि वर्तमानपत्रं विकतात ?— कशी मला मोठ्या पगाराची नोकरी मिळणार ? तुमच्याच नशिबांत नाही त्याला मी काय करणार ?— बघा, मोठ्या पगाराच्या नोकरीकरिता अर्ज करायला तयार आहे तर कोरा कागदच नाही. आज नाही उद्या मिळेल केव्हा तरी ! " आणि पुन्हा विनायकराव पूर्वीसारखे हसले.

एके काळचें भरजरी वस्त्र विरून विरून त्याची मच्छरदाणी व्हावी, तरीहि तें जशी आपल्या पूर्वीच्या वैभवाची आठवण करून देतें तसें विनायकरावांचें तें हास्य, भेगा पडलेलें, अनेक छिद्रें पडलेलें तें हास्य !

ठराविक वेळेला पार्वतीबाई आणि सरस्वतीबाई— त्या सास्वा-सुना रस्त्यावर कुठे तरी भेटतात. कांही तरी बोलतात. " यांनी नोकरी सुटल्याचं आम्हांला सांगितलंच नाही. मीं नसती का प्रपंचांत काटकसर

केली ! कुठे लहान नोकरी धरली नाही. कर्ज केलें, धंदे केले–! " सरस्वतीबाई म्हणत.

" अग, पण तू सुखी आहेस. तुझ्या कपाळीं सौभाग्य आहे. तुला मुलंबाळं आहेत. मुलं तुझे पांग आज ना उद्या फेडतील. अशी निराश होऊं नकोस. माझं काय आहे तें मीं नातवांच्या नांवानं करून ठेवलं आहे. विकूं देत सध्या माझे नातू–आलेंपाक आणि वर्तमानपत्रं ! लहानांतूनच मोठे व्हायला पाहिजेत. याला पहिल्यांदाच मोठी नोकरी लागली, म्हणून विनायकाचा आपल्या कर्तबगारीवरचा भ्रम वाढला. आणि ऐकलंस का सरस्वती ! तूं आपल्या ओळखीनं मुलांना कुठे नोकऱ्या लावून देऊं नकोस. त्यांना परस्पर जगाची ओळख होऊं दे. फक्त तुझीं मुलं, माझीं नातवडें वाईट मार्गाला लागणार नाहीत एवढेंच त्यांच्यावर लक्ष ठेव— "

पार्वतीबाई धीरगंभीरपणाने बोलत होत्या.

" पण आपण कधींच घरीं येत नाही ? " सरस्वतीने विचारलें.

" काय करायचं घरीं येऊन ? याच्या आशावादी थापाच ऐकायच्या ना ? मीहि आता थकलें आहें; पण शेवटपर्यंत कष्ट करणार ! मुलाकरिता केले ते वायां गेले, आता नातवंडांकरिता. पण ते पैसे फक्त त्यांच्या शिक्षणाला खर्च कर. आणि राहिलेले तुला ठेव. आता अशी मी तुला आणखी किती दिवस भेटणार आहें ! फार दिवस नाही. केव्हा तरी एकदा, कुठून तरी तुला निरोप येईल–मी थंड झालें म्हणून ! त्या वेळीं तूं ये, विनायक आला तर बाहवा, नाहीतर त्याला त्याच वेळीं मोठ्या पगाराच्या नोकरीकरिता कुठे तरी भेटायला जायचं असेल ! तर जाऊं दे त्याला ! नातवंडांना आणूं नकोस. तुला काय वाटेल तें कर. "

दोघीजणी एकमेकींपासून बाजूला झाल्या. दृष्टीआड होईपर्यंत एकमेकी एकमेकींकडे मागे वळून वळून पाहत होत्या.

" अरे, त्या रावसाहेबांना मीं बोलावलं आहे म्हणून सांगितलंस का ? " विनायकराव आपल्या एका मुलाला विचारीत होते. विनायकरावांना हल्ली हा नाद जडला होता. ते वाटेल त्याला आपल्या घरीं भेटायला बोलवीत. पण त्यांच्या बोलावण्यावरून आता त्यांच्या घरीं कोणीच येत नव्हतें आणि बोलावून कोणी आलें नाही, की विनायकराव आपल्या पोरांवरच खेकसत.

" अरे, ते रावसाहेब माझा निरोप कळल्यावर आल्याशिवाय राहिले नसते. तूं त्यांना नीट निरोपच सांगितला नसशील. काय सांगितलास त्यांना निरोप ? "

विनायकरावांच्या मुलांनी कधी त्यांचा अपमान केला नाही की उलटून उत्तर दिलें नाही.

" हं, आज किती मिळविलेस पैसे ? एक रुपया सात आणे ? एवढेच ? कष्ट करायला नकोत ! अरे, मी पहिल्यांदाच नोकरीला लागलों तों अडीचशें पगार मिळायला लागला मला. महिन्याचे अडीचशें म्हणजे एका दिवसाचे किती ? हं बरं, एक रुपया सात आणे तर सात आणे. मी केव्हाचा तुझी यायची वाट पाहतों आहे. अरे, सिगरेट संपल्या आहेत माझ्या. जा—हल्ली मला सगळींच शहाणपणा शिकवायला लागलीं आहेत. ती यायच्या आंत एक आख्खी पेटी आणून दे मला आणि तिने विचारलें तर सांग, आज एक रुपया चार आणेच मिळाले म्हणून ! "

पोरांनी विनायकरावांना सिगरेटची पेटी आणून दिली. त्यांतील एक सिगरेट काढून बाकीची पेटी बायकोला दिसूं नये म्हणून आपल्या उशा-खाली लपवून ठेवली. त्या सबंध सिगरेटचे त्यांनी मधोमध कापून दोन तुकडे केले. त्यांतील एक तुकडा खिशांत ठेवला आणि हेलकावे खात ते स्वयंपाकघरांतल्या पेटलेल्या शेगडीशीं गेले. " अरे, मला नोकरी नाही ना, म्हणून काटकसर करायला हवी. मला आता सिगरेट पेटविण्याकरिता काडी खर्च करून चालायचं नाही, विस्तवावरच सिगरेट पेटवितों. " असें म्हणून विनायकराव सिगरेट पेटवूं लागले. तोंच सरस्वतीबाई कामा-हून आल्या. त्यांच्याकडे पाहत सिगरेटचा धूर सोडीत विनायकराव म्हणाले, " सगळ्यांना सांग—नोकरी मिळाली नाही, गरिबी आली तरी विनायकरावांनी आपला अभिमान सोडला नाही. एका सिगरेटचे दोन तुकडे करून ओढले, पण एखाद्या दरिद्र्यासारख्या विड्या ओढायला सुरुवात केली नाही की, कमी पगाराची नोकरी केली नाही ! "

सरस्वतीबाईंना हल्ली हसावें केव्हा आणि रडावें केव्हा तेंच कळत नाहीसें झालें होतें. रडायला लागेल; पण सध्या हसता येत आहे तोंपर्यंत हसून घ्यावें, असें त्यांनी ठरविलें होतें आणि त्या विनायकराव कांहींहि

बोलले तरी अलीकडे हसतच असत.

इतक्यांत विनायकरावांचीं सर्व मुलें तिथे आलीं. त्यांच्याकडे पाहत विनायकराव म्हणाले, "कोण म्हणतो मी गरीब आहें म्हणून? ही पाहा माझी श्रीमंती. पुरुषा-माधव-श्रीधर! अरे, यांना केवढ्याला नोकऱ्या लागतील! मग काय आम्हांला कमी आहे! पण बाळांनो, तुम्हांला नोकरी लागायच्या आंतच मी गेलों तर सर्वांना सांगा–आमच्या वडिलांना अडीचशें रुपयांची नोकरी होती. त्यांनी हाल काढले; पण कधी कमी पगाराची नोकरी पत्करली नाही......"

विनायकरावांना खोकला आला. ते खोकत खोकत हसूं लागले. त्यांना खोकल्याची केवढी तरी उबळ आली. सरस्वतीबाईंनी त्यांना आधार देण्याकरिता त्यांची पाठ धरली.

तीं दोघें उभीं होतीं. त्यांच्या समोरच्या भिंतीवरच–लग्नसमारंभांत "विनायक–सरस्वतीचा" त्यांच्या लग्नांत फुलांमाळांनी सजविलेला, हास्याने नटलेला फोटो–अनेक वर्षें त्यावरून गेल्यामुळे धुरकटलेला फोटो–टांगलेला होता!

विनायकराव खोकत आणि सरस्वतीबाई कावरेबावरेपणाने त्या फोटोकडे पाहूं लागत!

● ● ●

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम ३६३६७...... दि: ......................
क्रमांक ........................ नों. दि. ..........

# दोन

सहज कांहीतरी बोलतांना विषय निघाला आणि मला कळलें की, ' चंद्राआत्या ' दोन तीन वर्षांपूर्वीच वारल्या म्हणून. ती बातमी ऐकून माझ्या तोंडावर विषण्ण हास्य पसरलें आणि मी माझ्या खोलींत येऊन कांहीतरी कामाला लागलों. पण माझें कामाकडे लक्ष लागेना.

' चंद्राआत्या ' माझ्या डोळ्यांसमोरून हालेना.

त्या दिवशीं माझें कामाकडे लक्ष लागेना. मीं चंद्राआत्याच्या कांही नातेवाईकांकडे गेलों--आणि त्यांचा शेवट कसा झाला त्याची माहिती काढून घेतली.

चंद्राआत्याचें सबंध आयुष्य म्हणजे मूर्तिमंत तडफड होती !

चंद्राआत्या ही एका गरिबाची मुलगी. तिच्या माहेरचें नांव माहीत नाही-आणि करायचें आहे काय तिच्या माहेरच्या आयुष्याच्या नांवाशीं ? माझ्या दृष्टीने तिच्या आयुष्याचें नांव तडफड !

चंद्राआत्या दिसायला नक्षत्रासारखी होती. रंगाने गोरी होती. त्यामुळे तिच्या अंगावर कांही जरी दागदागिने नव्हते तरी ते आहेत असें वाटे. तिचे डोळे घारीसारखे होते. त्या तिच्या दृष्टीच्या चमकींतच सर्व दागिने भरलेले आहेत असें दिसे.

पण नशिबाने तिला नेभळा नवरा मिळाला होता. तो नवरा इतका

नेभळा होता की, दुर्गुणी असण्याचा किंवा होण्याचा सुद्धा वकूब त्याच्यांत नव्हता. कुठे तरी एका खाजगी दुकानांत तो नोकरीला होता. मिळेल तें आपल्या पत्नीजवळ आणून देत असे.

चंद्राआत्या स्वभावाने हुषार. वृत्तीने चलाख.

पण या हुषारीचें आणि चलाख वृत्तीचें तिच्या संसारांत काय काम होतें? चार फुटकीं भांडीं-दोन घडोती-कांही कपडे, हा तिचा संसार होता. कोणतीहि महत्त्वाकांक्षा नसलेला नवरा तिला मिळाला होता. अंगांत असलेल्या हुषारीचें आणि चलाखीचें करायचें काय?

दिवस येत होते आणि जात होते!

चंद्राआत्याचें आयुष्य वाढत होतें. एखादें झाड जसें एखाद्या ठिकाणीं उगवतें-त्याला हालचाल करतां येत नाहीं-वारा, पाणी, ऊन, पाऊस, थंडी पडेल ती सहन करायची-जशी वाढ होईल तसें वाढायचें! कुणीं दगड मारलें—पानें खुडलीं—फांदी तोडली—सहन करायचें! वारा येईल तसें हालायचें!

उन्हांत तापायचें—पावसांत भिजायचें—आणि केव्हा तरी मोडून पडायचें!

असें एखाद्या झाडासारखें चंद्राआत्याचें आयुष्य होतें!

लग्न झाल्यावर नव्या बिऱ्हाडीं आल्याचा व नव्या नात्याचा काय तिला आनंद वाटला असेल तेवढाच. शेजारींपाजारीं चार नव्या ओळखी झाल्या. पण चंद्राआत्याला वाटलें, आपल्याभोवतीं सगळींच मुर्दाड आयुष्यें आहेत! कुणाला कसली महत्त्वाकांक्षा नाही-गरिबींत पिचत राहणारीं आणि मिळत असेल त्यांत हिशेबाने 'संसार' बसविणारीं आणि फावल्या वेळांत शेजारपाजारची कुचाळकी करण्यांत करमणूक पाहणारीं!

'चंद्राआत्या' लग्न झाल्यावेळीं किती सुंदर दिसत होती!

आणि तिला नवरा मिळाला असा. अवतींभोवतींच्या लोकांनी आपला अंदाज जाहीर केला, "ही इतकी सुंदर आहे—आपल्या नवऱ्याला धरून राहाणार नाही!

आणि तिच्या नवऱ्याचे स्नेहीसोबती, नातेवाईक तिच्या नवऱ्याला म्हणत, "अशी नक्षत्रासारखी पोर पत्करली आहेस—कशी संभाळणार हिला तूं?"

आणि ह्याच्यावर चंद्राआत्याकडे पाहत तिचा नवरा फक्त बावळट-पणाने हसे.

एवढ्या निराशेंत चंद्राआत्याला एकच सौख्याचा झरा सापडला होता आणि तो म्हणजे तिला एकुलती एक नणंद होती. तिचीं मुलं तिच्याकडे येत आणि प्रेमळपणाने हाक मारीत, "चंद्राआत्या ?"

फक्त ती प्रेमळ हाक ऐकण्याकरिता जगावें असें चंद्राआत्याला वाटे तीं मुलें आलीं की, चंद्राआत्या त्यांना कांही गोडधोड खायला करून ठेवी.

आणि आयुष्यांतील राहिलेल्या रिकाम्या वेळाचें काय करायचें हा चंद्राआत्याला प्रश्न पडे. कारण नवरा सकाळीं आठला कामाला जाई तो एक वाजतां येई व पुन्हा जेवण करून दोनला घराबाहेर पडे तो रात्रीं नवाचे सुमारास घरीं येई. नवऱ्याच्या आणि तिच्या वयांतहि खूप अंतर होतें. दोघें एकमेकाशेजारीं उभीं राहिलीं तर नवराबायकोसारखीं वाटत नसत !

"चंद्राआत्या नवऱ्याला धरून राहणार नाही !" असें आजूबाजू म्हणे. शेजारीपाजारी कांही हीनवृत्तीचे लोक होतेच. ते या म्हणण्याचा प्रत्यय येतो का पाहूं लागले—पण चंद्राआत्या ठिसूळ नव्हती. तिला आपल्या संसारांत राम आणायचा होता. तिचा 'संसार' असा आहे म्हणून इकडे तिकडे कुठे पाह्यचें नव्हतें. जे तिच्याकडे अशा दृष्टीने पाहत होतें—त्यांना तिने केवळ नजरेने मारलें !

अशांत कांही दिवस गेले आणि चंद्राआत्याला कळलें की, आपल्याला आता लौकरच मूल होणार आहे ! तिला आनंद वाटला आणि भीतीहि वाटली. आनंद होता—'मूल' होणार याचा. आणि 'भीति' वाटली त्या मुलाचें आयुष्य आपण चांगल्या तऱ्हेने वाढीला लावूं का नाही याची.

पण चंद्राआत्याने ठरविलें, बाळंतपणाचे पहिले कांही दिवस जातांच आपण कुठेतरी कामाला जायचें, पैसे मिळवायचे, साचवायचे, आणि आपलें आयुष्य जरी असें मिळमिळीत असलें तरी आपल्या मुलाचें आयुष्य—लोकांनी म्हटलें पाहिजे, चंद्राआत्याचें आयुष्य खिचपत गेलें तरी हें पाहा चंद्राआत्याचें मूल—मुलगा किंवा मुलगी—कसें नांव काढलें आहे या मुलाने किंवा मुलीने !

पण चंद्राआत्याला मुलगीच झाली.

ती मुलगीहि दिसायला चंद्राआत्यासारखीच होती. त्या मुलीकडे पाहून चंद्राआत्याचें आयुष्य हसायला लागलें. चंद्राआत्या बाहेर कामाला जाऊं लागली. पैसे मिळवूं लागली—साचवूं लागली.

नंतर एक—दोन वर्षांनी चद्राआत्याला मुलगा झाला.

आणि सबंध आयुष्यांत चंद्राआत्याला एवढीं दोनच नक्षत्रासारखीं मुलें लाभलीं.

तिच्या नवऱ्याची नोकरी चालूच होती. तो घरीं येई—जाई; पण त्याचें लग्न झाल्यानंतरहि जसा त्याच्या तोंडावर कधी आनद दिसला नाही तसा त्याला मुलें झाल्यानेहि कधी त्याच्या तोंडावर आनंद दिसला नाही.

जसें धान्य मोजण्याचें माप असताना— तशी चंद्राआत्याच्या नवऱ्याची मनोवृत्ति होती. त्या मापाने तांदूळ मापले काय, गहू मापले काय, किंवा मोती किंवा माती मापली काय, त्या मापाच्या वृत्तींत फरक पडत नाही. तसा चंद्राआत्याचा नवरा ‘ आयुष्याचा काल ’ मापीत होता.

——एक—दोन—तीन !

—आणि चंद्राआत्याला आता आयुष्यांत आनद सापडल्यासारखें वाटत होतें. स्वतःचा संसार सभाळून तिने सारखे कष्ट सुरू केले होते. ती पैसे मिळवूं लागली होती.

—तिने मुलीचें नांव ठेवलें होतें सिंधू, आणि मुलाचें नांव ठेवलें होतें मधू ! त्या दोन पोरांचे ती वाटेल ते लाड पुरवीत होती. त्या दोन मुलांना हौसेचे कपडे शीव— जे तिने आपल्या आयुष्यांत कधी पाहिले नव्हते— तिच्या शेजाऱ्यापाजाऱ्याच्या गरीब बिऱ्हाडकरूंना डोळ्यांत सलत असे कपडे ती आपल्या मुलांना करी; त्यामुळे तिच्या घरांत तीं दोन मुलें म्हणजे या बाईने—चंद्राआत्याने कुणातरी श्रीमंताचीं—भाग्यवंताचीं मुलें संभाळायला आणलीं आहेत असें वाटे ! आणि आजूबाजूचीं माणसें तिची थट्टाहि करीत— पण चंद्राआत्याने तें कधी मनावर घेतलें नाही !

“ हीं माझीं दोन मुलें नांव काढतील— आणि मग चंद्राआत्या ही कर्तबगार बाई होती—हें लोकांना कळेल ! आपली ‘ सिधू ’ कशी नक्षत्रा-सारखी आहे— हिला चांगलें श्रीमंताचें सुखी ठिकाण मी पाहून देईन—

आणि याच्यावर चंद्राआत्याकडे पाहत तिचा नवरा फक्त बावळट-पणाने हसे.

एवढ्या निराशेंत चंद्राआत्याला एकच सौख्याचा झरा सापडला होता आणि तो म्हणजे तिला एकुलती एक नणंद होती. तिचीं मुलं तिच्याकडे येत आणि प्रेमळपणाने हाक मारीत, "चंद्राआत्या ?"

फक्त ती प्रेमळ हाक ऐकण्याकरिता जगावें असें चंद्राआत्याला वाटे तीं मुलें आलीं की, चंद्राआत्या त्यांना कांही गोडधोड खायला करून ठेवी.

आणि आयुष्यांतील राहिलेल्या रिकाम्या वेळाचें काय करायचें हा चंद्राआत्याला प्रश्न पडे. कारण नवरा सकाळीं आठला कामाला जाई तो एक वाजतां येई व पुन्हा जेवण करून दोनला घराबाहेर पडे तो रात्रीं नवाचे सुमारास घरीं येई. नवऱ्याच्या आणि तिच्या वयांतहि खूप अंतर होतें. दोघें एकमेकाशेजारीं उभीं राहिलीं तर नवराबायकोसारखीं वाटत नसत !

"चंद्राआत्या नवऱ्याला धरून राहणार नाही !" असें आजूबाजू म्हणे. शेजारीपाजारी कांही हीनवृत्तीचे लोक होतेच. ते या म्हणण्याचा प्रत्यय येतो का पाहूं लागले—पण चंद्राआत्या ठिसूळ नव्हती. तिला आपल्या संसारांत राम आणायचा होता. तिचा 'संसार' असा आहे म्हणून इकडे तिकडे कुठे पाह्यचें नव्हतें. जे तिच्याकडे अशा दृष्टीने पाहत होतें—त्यांना तिने केवळ नजरेने मारलें !

अशांत कांही दिवस गेले आणि चंद्राआत्याला कळलें की, आपल्याला आता लौकरच मूल होणार आहे ! तिला आनंद वाटला आणि भीतीहि वाटली. आनंद होता—'मूल' होणार याचा. आणि 'भीति' वाटली त्या मुलाचें आयुष्य आपण चांगल्या तऱ्हेने वाढीला लावूं का नाही याची.

पण चंद्राआत्याने ठरविलें, बाळंतपणाचे पहिले कांही दिवस जातांच आपण कुठेतरी कामाला जायचें, पैसे मिळवायचे, साचवायचे, आणि आपलें आयुष्य जरी असें मिळमिळीत असलें तरी आपल्या मुलाचें आयुष्य—लोकांनी म्हटलें पाहिजे, चंद्राआत्याचें आयुष्य खिचपत गेलें तरी हें पाहा चंद्राआत्याचें मूल—मुलगा किंवा मुलगी—कसें नांव काढलें आहे या मुलाने किंवा मुलीने !

पण चंद्राआत्याला मुलगीच झाली.

ती मुलगीहि दिसायला चंद्राआत्यासारखीच होती. त्या मुलीकडे पाहून चंद्राआत्याचें आयुष्य हसायला लागलें. चंद्राआत्या बाहेर कामाला जाऊं लागली. पैसे मिळवूं लागली-साचवूं लागली.

नंतर एक-दोन वर्षांनी चद्राआत्याला मुलगा झाला.

आणि सबंध आयुष्यांत चंद्राआत्याला एवढीं दोनच नक्षत्रासारखीं मुलें लाभलीं.

तिच्या नवऱ्याची नोकरी चालूच होती. तो घरीं येई-जाई; पण त्याचें लग्न झाल्यानंतरहि जसा त्याच्या तोंडावर कधी आनंद दिसला नाही तसा त्याला मुलें झाल्यानेहि कधी त्याच्या तोंडावर आनंद दिसला नाही.

जसें धान्य मोजण्याचें माप असताना- तशी चंद्राआत्याच्या नवऱ्याची मनोवृत्ति होती. त्या मापाने तांदूळ मापले काय, गहू मापले काय, किंवा मोती किंवा माती मापली काय, त्या मापाच्या वृत्तींत फरक पडत नाही. तसा चंद्राआत्याचा नवरा 'आयुष्याचा काल' मापीत होता.

--एक-दोन-तीन !

-आणि चंद्राआत्याला आता आयुष्यांत आनंद सापडल्यासारखें वाटत होतें. स्वतःचा संसार सभाळून तिने सारखे कष्ट सुरू केले होते. ती पैसे मिळवूं लागली होती.

-तिने मुलीचें नांव ठेवलें होतें सिंधू, आणि मुलाचें नांव ठेवलें होतें मधू! त्या दोन पोरांचे ती वाटेल ते लाड पुरवीत होती. त्या दोन मुलांना हौसेचे कपडे शीव- जे तिने आपल्या आयुष्यांत कधी पाहिले नव्हते- तिच्या शेजाऱ्यापाजाऱ्याच्या गरीब बिऱ्हाडकरूंना डोळ्यांत सलत असे कपडे ती आपल्या मुलांना करी; त्यामुळे तिच्या घरांत तीं दोन मुलें म्हणजे या बाईने-चंद्राआत्याने कुणातरी श्रीमंताचीं-भाग्यवंताचीं मुलें संभाळायला आणलीं आहेत असें वाटे ! आणि आजूबाजूचीं माणसें तिची थट्टाहि करीत- पण चंद्राआत्याने तें कधी मनावर घेतलें नाही !

"हीं माझीं दोन मुलें नांव काढतील- आणि मग चंद्राआत्या ही कर्तबगार बाई होती-हें लोकांना कळेल ! आपली 'सिंधू' कशी नक्षत्रासारखी आहे- हिला चागलें श्रीमंताचें सुखी ठिकाण मी पाहून देईन-

माझा ' मधू ' नांव काढील— त्याला मी शिकवीन— तो खूप खूप नांव आणि पैसा मिळवील— आणि आयुष्याचे सुरुवातीचे जरी नाही तरी— शेवटचे दिवस मी सुखांत काढीन— " या मनोराज्याने चंद्राआत्या जगत होती.

आणि तिचीं दोन्ही मुलें होतींहि देखणी आणि हुषार. शाळेंत चांगलीं शिकत. चंद्राआत्याच्या मनाप्रमाणे वागत; आणि त्यामुळे चंद्राआत्याला वाटे, आपल्या सुखाचा ' चंद्र ' अगदी आपल्या हातीं आला आहे. आणखी दहा वर्षांनी मी सिंधूचें लग्न करीन— आणखी पंधरा वर्षांनी माझा मधू मिळवायला लागेल—दहा-पंधरा वर्षें काय हां हां म्हणतां निघून जातील!

——पण एक व्हायला लागलें होतें. जिवापाडच्या कष्टांनी चंद्राआत्या सुकूं लागली होती. ती इतकी कष्टत होती तरी तिनें कधी जिवाला धड खाल्लें नाही-कधी चांगला कपडा स्वतःला वापरला नाही!

एकीकडे तिचे कष्ट चाललेच होते आणि एकीकडे तिचे देवाचे नेमधर्म चालले होते. सोळा सोमवारचे कडक उपास कर—एकादशा कर—शनवारीं मारुतीला प्रदक्षिणा घाल· ! पण तिच्या मनाने गरुड-भरारी घेतली होती!

मी माझ्या आयुष्यांत शेवटीं सुखी होणार—माझीं मुलें माझे पांग फेडतील!

आणि कित्येक वर्षांनी—लग्नापासून कित्येक वर्षांनी तिला एक सुखाचा शब्द ऐकायला मिळाला होता. घाण्याच्या बैलासारखी डोळ्याला झापड घालून आपल्या दैनंदिन जीवनाचा घाणा फिरविणारा तिचा नवरा एक दिवस तिला म्हणाला, " किती कष्ट करते आहेस! मला पाहवत नाही. चार-आठ दिवस तरी विश्रांति घे!"

आणि आयुष्यांत पहिल्या प्रथम आपल्या नवऱ्याच्या तोंडचे ऐकलेले ते सहानुभूतीचे शब्द ऐकून चंद्राआत्या आनंदाने न्हाऊन निघाली. तिला वाटलें, आपल्या नवऱ्यासारखा माणूस उभ्या जगांत नाही! आणि चंद्राआत्याचा नवरा खरंच वाईट नव्हता—पण लहानपणापसून त्याचा आयुष्य-अनुभव असा होता की, आपल्या आयुष्यांत चांगलें कधी व्हायचेंच नाही—आपलें कुणी ऐकून घ्यायचें नाही—आपल्याला या आयुष्यांत कधी किंमत येणार नाही—गाडीला जुंपण्याकरिता बैल जसा खच्ची करतात तसें आपलें आयुष्य आहे. कामाला ' मान ' द्यायची—आणि

त्याचा मोबदला म्हणून जें मिळेल—तो ' कडबा ' चघळीत पुन्हा कामाची वेळ येईपर्यंत स्वस्थ बसायचें !

त्याने आयुष्यांत कधी विचारच करावयाचा नाही असें ठरविलें होतें. आपण माणसांतलीं यंत्रें आहोंत, आपणांला कुणीं ' चालू ' केलें की चालू व्हायचें—' बंद ' केलें की घोरत पडायचें, किंवा कडबा चघळीत बसायचें ! अशा त्या चंद्राआत्याच्या नवऱ्याने आज तिच्याविषयीं सहानुभूतीचे उद्गार [illegible] !

नवऱ्याच्या या उद्गारानं चंद्राआत्याला वाटलें, आपलें आयुष्य सार्थकीं लागलें ! तिने आपल्या नवऱ्याकडे कितीतरी अभिमानाने पाहिलें. नवऱ्याच्या अंगांतल्या कोटाच्या लक्तऱ्या झाल्या होत्या. टोपीचा आकार गेला होता. सदऱ्याला गुंड्या नव्हत्या. चंद्राआत्या नवऱ्याकडे पाहत कृतज्ञतेने म्हणाली, " आता या पगाराला आपण कोट करा, टोपी घ्या ! "

आणि दिवस जात होते !

चंद्राआत्याचे कष्ट चालूच होते. सिंधू आणि मधू हीं तिचीं मुलें शिकत होतीं. त्यामुळे चंद्राआत्याला कष्टाचे कांही वाटत नव्हतें. पण ती सुकत चालली होती—थकत चालली होती. ' सिंधू ' अगदी चंद्राआत्या-सारखी दिसायला लागली होती. आणि चंद्राआत्या सिंधूच्या सावलीसारखी दिसूं लागली होती !

आणि अशांत ' सिंधू ' मॅट्रिकची परीक्षा पास झाली. चंद्राआत्या कष्ट वाटेल तितके सहन करीत होती—पण ' सिंधू ' परीक्षा पास झाल्याचा आनंद तिला मोठ्या त्रासाने सहन करावा लागला. आणि तिला वाटलें, " आपल्या या दोन मुलांचा फोटो काढावा. देवाशेजारीं तो देव्हाऱ्यांत ठेवावा. किती किती चांगलीं आणि सद्गुणी मुलं आहेत माझीं ! "

" चंद्राआत्या—पेढे काढ—सिंधू पास झाली ! " तिच्या नणंदेच्या मुलांनी प्रेमाने म्हटलें. तीं मुलेंहि आता मोठीं झालीं होतीं. त्यांची तशी सुस्थिति होती. आपल्या चंद्राआत्याकडे तीं वारंवार येत होतीं. त्यांतील एका मुलाजवळ कॅमेरा होता. आतापर्यंत चंद्राआत्याने त्या मुलांजवळ कांहीहि मागितलेलें नव्हतें.

पण तिला आज त्या मुलांजवळ कांहीतरी मागावेसें वाटलें.

ती अत्यंत खजील आवाजांत आपल्या भाच्यांना म्हणाली, " अरे, पेढे द्यायलाच पाहिजेत. पण एक करशील ? सिंधू पास झाली आहे, तिचा तुझ्या कॅमेऱ्यांतून फोटो काढशील ? "

" आत्या–त्यांत एवढं केविलपणाने काय विचारते आहेस— येत्या रविवारीं सकाळीं येतों मी आपला कॅमेरा घेऊन. "

तो रविवार उजाडला.

सिंधू फोटो काढण्याकरिता कपडे करूं लागली.

पण भाच्याने म्हटलें, " एकट्या सिंधूचा नाही फोटो काढणार आपण. चंद्राआत्या–तूं, सिंधू, मधू आणि बापू–अशा चौघांचा फोटो काढणार मी ! "

चंद्राआत्या त्या कल्पनेने काय कावरीबावरी झाली ! " आपला फोटो काढायचा ? " बापूंनाहि कसेंसेंच वाटलें. पण भाच्याने आग्रह धरला–चंद्राआत्या, बापू, सिंधू आणि मधू यांचा फोटो निघाला.

"अरे, नक्षत्रासारखीं मुलें–त्यांच्या शेजारीं आमचा फोटो बरा दिसेल का ? " चंद्राआत्या कुरकुरत होती.

" पण त्यांची तूं आई आहेस ना ? त्यांच्याकरिता तू कष्ट करते आहेस ना ? नाहीतर–सिंधूचें इतकें शिक्षण शक्य होतें का ? "

आणि चंद्राआत्याने ठरविलें, आता सिंधूला पुढे शिकवायचें नाही. तिचें आता लग्न करायचें. चंद्राआत्या मोठीं मोठीं श्रीमंताचीं स्थळें पाहूं लागली. सिंधूच्या लग्नाकरिता मी कर्ज करीन–मी फेडीन–पुढे मधू मोठा होईल–माझ्या हातून कर्ज फिटलें नाही–तर पुढे माझा मधू तें कर्ज फेडील.

सिंधू दिसायला नक्षत्रासारखी होती !

आणि सिंधूचें लग्न एका श्रीमंताच्या मुलाशीं ठरलें. झालें ! चंद्राआत्याला आपल्या आयुष्याचें सार्थक झाल्यासारखें वाटलें. तिच्या चार घरीं चांगल्या ओळखी होत्या–एका मुलीच्या जन्माचें कल्याण होतें आहे, आणि चंद्राआत्यासारख्या कष्टाळू बाईची मुलगी आहे. अनेकांनी तिच्या लग्नाकरिता कर्ज दिलें.

लग्न झालें !

अनेक सोहाळे झाले.

चंद्रज्योति, भुईनळे उडाले !

आणि नंतर कळलें की, सिंधूला त्या श्रीमंतींत सुख लागत नाही. आईकडील गरीबी म्हणून तिची चेष्टा होते. सिंधूला कोणी माहेरीं पाठवीना.

गरीब म्हणून 'चंद्राआत्याला' सिंधूच्या सासरीं चांगली वागणूक मिळेना.

आपल्या आईने आपल्याकरिता इतके कष्ट केले-तेव्हा आपल्याला 'संसारांत' 'सुख' नाही हें आईला सांगून तिला कष्टी करायचें सिंधूने टाळलें. ती आपलें दुःख आपण भोगूं लागली.

तिला वेळेवर जेवायला मिळायचें नाही. शिवाय वर तोंड करून विचारायचें, "कां जेवली नाहीस ?" म्हणून. कांही काम केलें नाही, तर "कां केलें नाहीस ?" केलें तर "कां केलेंस ?" असा कर नकऱ्याचा वसा घरांतील सर्व मंडळींनी घेतला होता. आणि या सर्वांचें कारण काय तर चंद्राआत्याने लग्नांत आपल्या जिवापाड कर्ज करून 'सिंधूच्या' सासरच्या माणसाच्या हौशी पुरविल्या होत्या; पण लग्नानंतर एकहि सण त्यांच्या इतमामाने देणें चंद्राआत्याला अशक्य झालें होतें.

—पण सिंधूच्या सासरच्या माणसांना सर्व सण पाहिजे होते !

—आणि ते मिळत नाहीत असें पाहतांच सर्वांना सिंधू डोळ्यासमोर नकोशी झाली होती !

आणि मग एक दिवस सिंधूला ऐकायला आलें-सिंधू आपल्या वडिलांची मुलगी नाही ! सिंधूच्या आईने एरवी एवढा खर्च कसा केला ? सिंधू आणि तिचा भाऊ-बापाच्या तोंडवळ्याचीं कुठे आहेत ?

—असें तोंडाला येईल तें अद्वातद्वा बोलणें आणि केरपोतेऱ्यासारखें वागविणें—

त्या वागणुकीच्या परी मी वर्णन करूं शकत नाही !

—माणसातहि हिंस्र पशू असतात-एवढेंच फार तर मी म्हणेन.

दिसामासी सिंधूचे हाल वाढत होते. आता ते तिला सहन होईनासे झाले. सिंधू जिवाला कंटाळली. आणि एक दिवस तिने अंगावर रॉकेल ओतून स्वतःला पेटवून घेतलें !

जिवंत सिंधू चंद्राआत्याला पुन्हा पाहायला मिळाली नाही.

—आणि या घटनेमुळे चंद्राआत्याचा सर्व चांगल्या आणि वाईट गोष्टीं-

वरचा विश्वास उडाला. तिला कांही बोलतांच येईना. तिने अंथरूण धरलें. जीवनांतली तिची सर्व तडफड संपली होती ! तिच्या आयुष्याचे दिवस सरत आले होते. अश्रूभरल्या डोळ्यांनी तिचा नवरा आणि एकुलता एक मुलगा तिची शुश्रूषा करीत, तोच तिचा आनंद–आणि या आनंदांत आपण डोळे मिटावे ही तिची एकमेव इच्छा !

––आणि त्या आनंदांतच दोन-तीन वर्षांपूर्वी चंद्राआत्याने आपले डोळे मिटले.

––हीं आयुष्यें–आणि अशीं आयुष्यें–ज्या कवितांचा अन्वयअर्थ लागत नाही–अशीं काव्येंच जीवनांत अनंत आहेत !

• • •

मराठी ग्रंथ सं ... मात.
अनुक्रम ३७.३४ ........ दि: ..................
........................ नों. दि. ........

# तीन

एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं बिऱ्हाड बदलण्यांत काय त्रास आणि दुःख असेल तें मलाहि मान्य आहे; पण बिऱ्हाड बदलल्यामुळे कांही निराळीं माणसें आपणाला पाह्यला मिळतात, तो आनंद कांही निराळाच आहे.

उसाचे कर्वे चावून चोखून फेकून द्यावेत त्याप्रमाणे पहिल्या बिऱ्हाडाच्या आसपासच्या माणसांच्या स्वभावांतील आनंद आपण घेतलेला असतो आणि रस संपलेल्या उसाच्या चोयट्यांसारखीं तीं माणसें आपल्याभोवतीं जगत असतात.

कांही आपलाहि दोष असेल, कांही त्यांचाहि असेल; पण त्यांतील कांही माणसें अनुभवाने आपल्याला डोळ्यांसमोरहि नकोशीं होतात, तर अगदी दोन-चार माणसांचा किंवा एखाद्याच माणसाचा स्मृतिसुगंध बरोबर घेऊन आपण निराळ्या बिऱ्हाडांत प्रवेश करतों.

आणि एकदा निराळ्या जागीं आपण आपलें बिऱ्हाड थाटल्यानंतर, सहज का होईना आपणाला आपल्या पहिल्या बिऱ्हाडीं जावेंसेंहि वाटत नाही. यांत त्या माणसांचा दोष असतो का आपला असतो याचा जरी माणसाने थोडा तिऱ्हाईत दृष्टीने स्वस्थ बसून विचार केला तरी माणसांत कितीतरी सुधारणा होईल; पण तें आपल्या हातून होत नाही आणि आपल्याशीं वागण्यांत कोण कसा चुकला हेंच आपल्या लक्षांत राहतें आणि आपण कांही

कोणाशीं वागण्यांत चुकलों असूं ही कल्पनाहि आपल्या मनाला कधी शिवत नाही !

मी त्या नवीन बिऱ्हाडांत राहायला येऊन चार–पांच दिवस झाले होते. त्या वाड्यांत राहणारीं सर्व माणसें मला अद्याप पाहायला मिळालीं नव्हतीं. नवीन म्हटलें की, माणूस कांहीतरी चांगल्याची–निराळेपणाची अपेक्षा करतो. पण आयुष्यांत इतकीं माणसें पाहिलीं, आता आणखी काय नवें पाहायला मिळणार ?

पण माणसाची अपेक्षा असते, माणसांचीं नांवें नवीन असतील, त्यांचे कपडे निराळे असतील, घरांतलीं भांडींकुंडीं–मांडामांडी निराळी असेल. झाडाची जात कळल्यानंतर आजचीं फुलें उद्या असणार नाहीत–नवीन फुलें फुलतील. जात तीच–वास तोच, पण फक्त कालचीं आज नव्हेत आणि आजचीं उद्या नव्हेत एवढाच फरक. पण तरीसुद्धा नवीन उमलणाऱ्या फुलाबद्दल आपली आस्था आणि आकांक्षा वाढलेली असतेच ना ?

तसेंच माणसांचें. आणखी नवीन जातीचीं काय माणसें पाहायला मिळणार ?

— पण माणसाची नवीनाबद्दल अपेक्षा असतेच !

— पण त्या नवीन बिऱ्हाडांत माझी नावीन्याची अपेक्षा खरंच पुरी झाली. त्या दिवशीं मी संध्याकाळीं माझ्या नव्या बिऱ्हाडांत परत येत होतों तोच वाड्यांतील एक इसम माझ्या जवळ आला आणि त्याने मला लाडांत विचारलें,

" काय मामा, नवीन राहायला आलांत वाड्यांत ? " एवढें म्हणून तो पुन्हा हसला आणि म्हणाला, " मला एक पैसा द्या ना ! "

मी त्या माणसाकडे पाहतच राहिलों.

गृहस्थाचें वय होतें पन्नाशीच्या पुढे. पंचेवजा धोतर नेसलेला. अंगांत एक फाटका काळा लॉंग कोट–ज्याला गुंड्या नाहीत. आंत फाटका सदरा, डोक्याला कोणताहि आकार नसलेली एक टोपी, दाढी वाढलेली, दाढीचे केस अर्धे पांढरे–अर्धे काळे. कानांत एक तीन मोत्यांची भिकबाळी—

पण हसणें मात्र मनमोकळें. आपण ओळख नसलेल्या तिऱ्हाइतापाशीं

पैसा मागतो आहों याची लाज नाही. एवढेंच नव्हे तर आपला तो हक्कच आहे ही भावना.

" एक पैसा—कशाला ? " मी विचारलें.

" मला बायको करायची आहे. पैसे जमवायचे आहेत. फक्त एकच पैसा ! "

मी त्याच्याकडे तिरसटपणाने पाहिलें आणि त्याच्या मागण्याकडे लक्ष न देतां तडक घरांत आलों.

पण त्याचें तें हसणें मात्र माझ्या लक्षांत राहिलें.

आणि सकाळीं उठून अंगणांत यावें तो-त्याचें नांव बाळकोबा—तो मला अंगणांत दिसायचा. तोंडाने कांहीतरी देवाची स्तुति तो गुणगुणत असायचा. कधी मला तो भांडीं घासतांना दिसे, कधी शेणाच्या गोवऱ्या लावतांना दिसे आणि प्रत्येक काम करतांना त्याच्या तोंडावर त्या कामा-बद्दलचा कंटाळा न दिसतां तद्रूपता दिसायची !

आणि गमतीची गोष्ट, सकाळचे दहा वाजले की, आपण जसे एखाद्या घरच्या समारंभाची मंडई करायला हौसेने मंडईला निघतों तितक्या आनंदाने आणि तत्परतेने एक मळकट झोळी घेऊन बाळकोबा मधुकरीला निघायचा !

आणि बाळकोबाची लहर लागेल त्या वेळीं त्याचें मधुकरी मागणें संपे. कधी तो तासभरांत घरीं परत येई, तर कधी संध्याकाळच्या वेळीं रानांतून गुरें घरीं परतत त्या गुरांबरोबरच बाळकोबा घरीं परतत ! त्या दिवशीं त्याची मधुकरीची झोळी भरपूर भरलेली दिसे आणि नंतर तो दोन-चार दिवस मधुकरीला जात नसे. ती एका दिवशीं गोळा केलेली मधुकरी तो चार दिवस पुरवी—आणि तिसऱ्या चवथ्या दिवशीं त्या मधुकरींतील भाकरीचे—वाळलेल्या भाकरीचे—कडक तुकडे मऊ करण्याकरिता तो नळा-खालीं भिजवतांना दिसे ! आणि त्या वाळक्या अन्नब्रह्माकडे पाहूनहि खुषींत दिसे.

बाळकोबाचें वय पन्नाशीच्या पुढे होतें. त्याचें पोट सुटलेलें होतें. घरीं थंडी असो, की उन्हाळा असो, तो उघडाच हिंडे. बाळकोबाच्या पोटावर

आणि पाठीवर इतके केस उगवलेले होते की, मला वाटलें, त्या केसाळ-पणामुळेच त्याला थंडीवाऱ्याची बाधा होत नसावी.

बाळकोबाने माझें लक्ष वेधलें होतें. एखादा मोर–ससा–पाहतांना आपणाला जें औत्सुक्य वाटतें तसा बाळकोबा म्हणजे माणसांतला एक विचित्र प्राणी आहे असें मला वाटे. मी त्याच्या हालचालींकडे, तो माझ्या दृष्टीस पडे तेव्हा, पाहत असे.

अखेर शेवटीं त्याची हकीगत मला कळली. हकीगत अगदी साधी होती. बाळकोबा हा एका गरीब कुटुंबांतला मुलगा. बुद्धीने बेताचाच. घरची गरिबीच. लहानपणींच कांही क्षुल्लक भांडणावरून घराबाहेर पडला. पुढील आयुष्याचा विचार त्याच्या कधी डोक्यांतच आला नाही. वर्तमान काळ हाच त्याच्या आयुष्यांतले तिन्ही त्रिकाळ होते. कुठे तरी राहिला. त्याला कुणीतरी मधुकरीची दीक्षा दिली. पोटाचा प्रश्न मिटला. कुठेतरी कामें करी. विसाव्याला कुठेतरी थांबे. ते कपडेलत्ते आणि शिव्या देत. बाळक्याला त्यांतहि आनंद वाटे.

रस्त्यावर पडलेला दगड टेकण लावण्याकरिता कुणीतरी आणावा, काम झालें की परत रस्त्यावर फेकून द्यावा. पुन्हा कुणाला गरज लागली की त्याने न्यावा–काम झालें, की पुन्हा रस्त्यावर फेकून द्यावा असें बाळक्याचें आयुष्य चाललें होतें.

साध्या साध्या मध्यम वर्गातील माणसांच्या आयुष्यांतहि अशा एखाद्या दगड माणसाची गरज असते. पण ती कायमची नसते. घरांत कुणी बाळंतीण झालें, आजारी पडलें, घरीं कांही कमीजास्त असलें, की हाता-खाली बाळकोबासारख्या एखाद्याची गरज असते. तेवढ्यापुरतें त्याला बोलवावें, त्याला काम सांगून तेवढ्यापुरतें गोड बोलून काम करून घ्यावें आणि नंतर नालायक म्हणून त्याला हाकून द्यावें. वाया जाणारें अन्न त्याला चारावें. फाटके कपडे त्याला दान द्यावे. शरमिंदा होईल असें त्याला बोलावें...

आणि हें करणारांचीहि एक अडचण असते. तीं माणसें इच्छा असली तरी आपल्या घरचीं माणसें पोसून आणखी असें एखादें आयुष्य पोसूं शकत नाहीत!

बाळकोबाने अशीं अनेक वर्षे काढलीं. त्यामुळे त्याच्या खूप ओळखी झाल्या होत्या. त्यामुळे त्याला राहण्याकरिता कुठे तरी आसरा मिळे. मधुकरीला त्याला कधी कमी पडलें नाही. आणि तो वयांत आल्यानंतर त्याला ‘ लग्नाची ’ आवश्यकता वाटूं लागली.

पण तो बोलणार कुणाजवळ ? तो मनांतल्या मनांत आपलें लग्न करीत होता. एकदा एका ठिकाणीं तो मधुकरीला गेला.

तिथे लग्नाचाच विषय चालला होता. कुणाच्या तरी मनांत आलें, हा चार घरीं मधुकरीकरिता हिंडतो. ह्याला चार लग्नाचीं स्थळें माहिती असतील. त्या दिवशीं त्याला त्या घरीं मधुकरी थोडी जास्त मिळाली आणि त्याला कोणीतरी विचारलें, “ बाळकोबा, आमच्या मुलीचें लग्न व्हायचें आहे. कुठे लग्नाचें स्थळ असलें तर सांगा ना आम्हांला !... ”

हातांतील मधुकरीच्या झोळीला चार आनंदाचे हेलकावे देत बाळकोबा उत्तरले, “ अस्सं ? मग मला लग्न करायचें आहे ना ! ”

बाळकोबाचें तें उत्तर ऐकून त्या घरांत हशा पिकला आणि मग बाळकोबा कांही दिवसांनी ज्या ज्या घरीं मधुकरी मागायला जाई तेथे तेथे लाजत हसत सांगूं लागला, “ मला लग्न करायचें आहे. मला एखादी मुलगी सांगा ! ”

आणि मग त्याला सांगितलें, “ अहो बाळकोबा, असें वेड्यासारखें ज्याला त्याला काय सांगत सुटला मला लग्न करायचें आहे म्हणून—जवळ हजार, दोन हजार रुपये साचवा म्हणजे मग तुम्हांला कोणीहि मुलगी देईल ! ”

“ अस्सं—मग मी उद्यापासून दक्षणेचे पैसे साचवितों आणि दोन हजार रुपये साचले की, तुम्हाला सांगतों. मग द्याल तुम्ही माझें लग्न करून ? ” बाळकोबाने भोळेपणाने विचारलें.

“ हो...साचवा दोन हजार रुपये ! ”

आणि कित्येक वर्षे बाळकोबाच्या आयुष्यांतून निघून गेलीं. तेवढ्या अवधींत बाळकोबाजवळ लग्नाकरिता सतरा-अठरा रुपये साचले होते. बाळकोबाला वाटलें, हे दोन हजार रुपये साचणार केव्हा आणि आपलें लग्न होणार केव्हा ?

मग बाळकोबा मधुकरीबरोबर लग्नाला आणा अर्धा आणा मागूं लागला. पहिल्यापहिल्यांदा लोकांनी चेष्टेने त्याला पैसे दिले; पण पुढे मिळेनात. मग बाळकोबा जो रस्त्याने भेटेल त्याच्याजवळ लग्नाकरिता पैसे मागूं लागला.

बाळक्याला आता पंचेचाळीसावें वर्ष लागलें होतें. एकदा रस्त्याने एक पंचावन्न वर्षांची बाई चालली होती. तिच्याजवळ त्याने लग्नाकरिता 'पैसा' मागितला. तिने एक पैसा दिला आणि चेष्टेने विचारलें, "लग्न केव्हा करणार आता बाळकोबा?"

बाळकोबाची बुद्धि आता सागरगोट्यासारखी झाली होती. त्याने त्या बाईलाच विचारलें, "तुम्हीं करतां का माझ्याशीं लग्न?"

ती बाई रागीट होती. तिने फाडकन् बाळकोबाच्या श्रीमुखांत भडकावली आणि ती चालू लागली. आणि मग बाळकोबाने ठरवलें, 'मोठ्या बाईशीं आपलें लग्न होणें शक्य नाही!' आणि आता बाळकोबाचें डोकें बिथरलें होतें. तो आता रस्त्याने लहान लहान सात-आठ वर्षांच्या मुली जात, त्यांना विचारी, "माझ्याशीं लग्न करतेस? आज मला मधुकरींत लाडू मिळाला आहे. तो देईन तुला—माझ्याशीं लग्न करशील तर!"

आता त्या आळींत रस्तोरस्तीं बाळकोबा हा चेष्टेचा विषय झाला होता. कोणी तरी सांगावें—त्या मुलीला विचार—या मुलीला विचार. बाळकोबा वेड्यासारखें विचारी. रस्त्यांत हशा पिके. मुली पळून जात—रस्त्यावरचे लोक हसत. मग बाळकोबाहि हसे आणि कंटाळून घरीं येऊन मधुकरी खात बसे.

एका दिवाळीची गोष्ट. एका टवाळाने बाळकोबाला सांगितलें, "बाळकोबा, मी सांगतों ती गोष्ट करून दाखवाल तर मी देतों तुमचें लग्न करून!"

"सांगा ना, करतों. पण लग्न नक्की करून देणार ना?" बाळकोबाने हसत हसत विचारलें, "नाही तर माझी थट्टा करतात सगळींजणं!" आणि एवढें म्हणून बाळकोबा खूप लाजला. त्याने आपले डोळे मिटून घेतले.

"छे: छे! तुमची कोण थट्टा करणार. पण बाळकोबा, तुम्हांला गाणीं

खूप येतात. म्हणून दाखवा ना एखाद गाणं म्हणजे तुम्हांला एखादी गाणारीण मुलगी पाहून देतों ! ”

बिचारा बाळकोबा गाणं म्हणूं लागला,

“ अडवळ घुंऽम । पडवळ घुंऽम ॥
मथुरेच्या बाजाराला जाईन म्हणते ॥
लाल साडी नेशिन म्हणते ॥
पोराचं लगीन करीन म्हणते ! ॥
अडवळ घुंऽम ॥ पडऽवळ घुंऽम ॥

रस्त्यांत सगळीकडे हशा पिकला.

मग त्या टवाळाने एक लवंगी फटाकड्याचा सर बाळकोबाच्या हातांत दिला आणि म्हणाला, “ बाळकोबा, मी हा आता लवंगी फटाकड्याचा सर पेटवतों; पण शेवटचा फटाकडा उडेपर्यंत हा सर हातांतून सोडायचा नाही. तुमची ही कर्तबगारी पाहून इथल्याइथेच एखादी पोरगी तुमच्याशीं लग्न करायला तयार होईल पाहा ! आणि आजच्या आज रस्त्यांतच तुमचें लग्न होईल. पण संसार चांगला कराल ना ! मग नवराबायकोकरिता तुम्हांला खूप खूप मधुकरी मागायला पाहिजे ! ”

लवंगी फटाकड्याचा सर हातांत धरीत बाळकोबा हसत म्हणाला, “ अहो मधुकरीचं काय घेऊन बसलांत ! मी चार बायका केल्या, तरी त्यांना पुरेल इतकी मधुकरी मी रोज मिळवून आणीन ! ”

“ मग तुमच्या लग्नाला हो काय पंचाईत !” त्या टवाळाने बाळकोबाच्या हातांतील लवंगी फटाकड्याला पेटती उदबत्ती लावली !

‘ फाडफाड ’ आवाज करीत बाळकोबाच्या हातांतील फटाके उडूं लागले. त्यांतील एक बाळकोबाच्या डोळ्यांवर उडाला. कांही अंगावर उडाले. एका फटाकड्याचे वातीने बाळकोबाच्या अंगातील सदरा धुमसूं लागला. दोन फटाक्यांनी त्याच्या अंगावर फोड आले. बाळकोबाने आरडाओरडा केला. पण शेवटचा फटाका आवाज करीपर्यंत बाळकोबाने हातांतील फटाकड्याचा सर सोडला नाही !

बाळकोबा खूप भाजला होता. पोळला होता रस्त्यावरची टवाळ

माणसें हसत हसत निघून गेलीं. कुणीतरी बाळकोबाच्या अंगावरचा सदरा विझवला. भाजल्या जागीं तेल लावलें.

थोडा बरा झाल्यावर बाळकोबा पुन्हा रस्त्यांनी मधुकरी आणि "लग्नाला पैसा" मागत हिंडूं लागला—पण आता तो लग्नाकरिता कुणाला विचारीत नव्हता.

आता त्याच्या तोंडावर कारुण्य भरपूर होतें !

आता त्याला आणखी एक नाद लागला. रस्त्यावर एखादा वर्तमान-पत्राचा कागद दिसला कीं तो तो उचली. त्याच्यावर बहुधा एखाद्या बाईचें चित्र असे.

आता बाळकोबाच्या दृष्टीने आजूबाजूचें जग मेलेलें होतें आणि तो एकटाच जिवंत होता ! चंद्रावर आणि मंगळावर मनुष्यवस्ती नाही म्हणतात—आता त्या दृष्टीने तो पृथ्वीवर नसून मनुष्यवस्ती नसलेल्या एखाद्या 'ग्रहावर' तो वावरत होता. उभ्या आयुष्यांत कोण त्याच्याशीं माणसासारखें वागलें होतें ? कुणी त्याच्याकडे लक्ष दिलें होतें ? एखादी अडगळीची वस्तू वापरावी तसेंच त्याचें आयुष्य वापरलें गेलें होतें आणि नंतर ती एक करमणुकीची वस्तू झाली.

आणि प्रत्येकाचें जीवनच असें अडचणींतून आणि खाचखळग्यांतून जात आहे, कीं स्वतःच्या आयुष्याकडे पाहण्याचें सोडून दुसरीकडे पहायला कुणाला सवड आहे ? आणि स्वतःच्या आयुष्याकडे तरी आपण काय पाहत आहोंत ?

आपल्याजवळ आहे तें कोणी नेऊं नये—आणि आपल्याला काय काय कमी आहे हें पाहण्याची तळमळ—आणि दुसऱ्याला किती जास्त आहे ही मळमळ !

यापेक्षा सामान्य माणसाचा दृष्टिकोन काय असूं शकतो ? त्या दृष्टीने बाळकोबा हा आदर्श 'सामान्य' माणूस होता. त्याला मिळत नव्हतें आणि हवें होतें तें त्याने मागितलें—तें मिळालें नाही—वर्तमानपत्रांतील निर्जीव चित्राकडेच पाहत त्याने आपलें राहिलेलें आयुष्य घालविण्याचें ठरविलें !

आणि एक दिवस हा कर्मयोगी शांत झाला !

त्याच्या सामानाचें गाठोडें तो गेल्यानंतर–ज्यांनी त्याला शेवटीं सांभाळला होता त्याने उघडून पाहिलें. त्यांत सुमारें साडेतीन हजार रुपये निघाले आणि रस्त्याने वर्तमानपत्रांतून कापून घेतलेले जाहिरातींतील बायकांचे आणि सिनेमा नट्यांचे शेकडो फोटो निघाले !

मी आता त्या घरांत राहत नाही. त्या घरांत आता बाळकोबाहि नाही. पण त्या घरावरून मी केव्हाहि जायला लागलों, की मला अजूनहि बाळकोबा डोळ्यांसमोर दिसूं लागतो आणि त्याचें मी ऐकलेलें पहिलें वाक्य ऐकूं येतें, " काय मामा, नवीन राहायला आलांत वाटतं? मला एक पैसा द्या ना ! "

● ● ●

# चार

भीमाताई ही एक बाल-विधवा आहे.

लग्न झालें आणि वर्षाच्या आंतच तिचें सौभाग्य या जगांतून घाईने निघून गेलें. बिचारा हसतमुख होता. स्वभावाचा दिलदार होता. भीमाताईला सुख देत होता आणि काय झालें कुणाला ठाऊक! आठ दिवस ताप आल्याचें निमित्त झालें आणि त्याने या जगाला रामराम ठोकला!

सकाळचें कोवळें कोवळें सुंदर ऊन पडलेलें असावें, हसत खेळत झाडाशीं फुलें वेचीत असावें. कांही फुलें वेचून झालेलीं असावींत, इतक्यांत आकाश एकदम ढगाळून यावें—सकाळचा सूर्य दिसेनासा व्हावा, सूर्य आणि झिम्झिम् पाऊस दिवसभर लागावा तशी भीमाताईच्या आयुष्याची स्थिति झाली. सांसारिक सुखाचा हसता सूर्योदय तिने नुकताच पाहिला होता—सांसारिक सुखाचीं फुलें तिने थोडीं फार वेचलीं होतीं—आणि लगेच पाऊस सुरू झाला! तिच्या सौभाग्याचा सूर्य दिसेनासा झाला!

—आणि कांही माणसें फार नादी असतात. पडणारा पाऊस तिच्या लक्षांत येत नव्हता—त्यांत ती भिजत होती—पण पाहिलेल्या क्षणिक सूर्योदयाने आणि हातीं आलेल्या थोड्याशा फुलांनी—म्हणजे त्या आठवणीने भीमाताईचें आयुष्य भरून गेलें होतें. ती पावसांत भिजत होती. सासरीं पाऊस पडूं लागला म्हणून ती माहेरीं आली आणि तिच्या आयुष्यांत सूर्य

पुन्हा कधीच उगवायचा नव्हता म्हणून तिला कधीच सासरीं जायचें नव्हतें.

आणि तिच्या माहेरीं तरी कोण होतें? एक भाऊ. आपली बहीण पावसाने भिजली आहे म्हणून तिच्याकडे सहानुभूतीने पाहणारा नव्हे. त्याला बहिणीबद्दल सहानुभूति होती—पण तो वृत्तीने दुबळा होता. त्याला आपल्या बहिणीकडे पाहवत नव्हतें. तो आपल्या बहिणीची आबाळ होत नाही ना, एवढी चौकशी करी—तिला कांही कमी पडूं देत नसे; पण तिच्याकडे तो पाहण्याचें टाळी. तिच्याशीं बोलण्याचें टाळी. त्याचें लग्न झालेलें होतें. आपण सांसारिक उन्हांत आणि आपली बहीण पावसांत हें त्याला सहन होत नसे.

आणि ज्याबद्दल आपल्याला कांही करतां येत नाही—तें नजरेआड करावें—त्याने आपल्या बहिणीला एक स्वतंत्र खोली दिली होती. त्याचें सत्तेचें घर होतें लहानपणीं भीमाताई आणि तिचा भाऊ खंडेराव याच वाड्यांत हसलीं, खेळलीं होतीं. दोघांनी एकमेकांच्या खोड्या काढल्या होत्या. आईवडिलांनी त्यांची समजूत केली होती.

भीमाताई आणि खंडेराव लहानपणीं खूप 'लपंडाव' खेळत. आणि त्यावेळीं 'भीमाताई' कुठे तरी घरांतल्या घरांतच लपून बसत. खंडेरावाला त्या सापडायच्या नाहीत. मग खंडेराव अंगणांत उभा राहून ओरडे,

"भीमे—मी हरलों—कुठे लपली असशील तिथून बाहेर ये!"

आणि मग हसत हसत—भीमाताई—कुठून तरी बाहेर पडे.!"

दोघे एकमेकांकडे पाहून हसत.

मग खंडेराव विचारी, "कुठे लपली होतीस ग?"

तोंडाचा चंबू करीत भीमाताई म्हणे, "एका जमतींत!"

"पण मला सांग—आता मी हरलों आहे!"

"मी नाही सांगणार! माझी लपायची जागा एकदा तुला सांगितली तर मला पुन्हा कसें लपतां येईल?" भीमाताई म्हणे.

"बरं नको सांगूस जा!" खंडेराव म्हणे आणि त्यांचा लपंडावाचा खेळ संपे.

पुढे खंडेरावाचें लग्न झालें. भिमीचें—भीमाताईचें लग्न झालें. त्यांचे

आईवडील दिवंगत झाले. आणि कांही दिवसांत भीमाताईच्या संसारांत अंधार झाला, आणि पाऊस पडूं लागला म्हणून ती माहेरीं आली. आता खंडेरावानेच तिला "लपायला" आपल्या घरांतील एक खोली दिली. त्यांत भीमाताई लपली.

भीमाताई कुठे लपली आहे हें माहीत असूनहि आता खंडेराव तिला हाक मारीत नव्हता. त्यांच्या आयुष्यांत हा 'लपंडाव' आता जन्मभर चालायचा होता !

भीमाताई आता भावाने त्यांना दिलेल्या खोलींत आयुष्य काढीत होत्या. भावानें 'भीमाताईना' आता या खोलींत लपायला सांगितलें होतें !

त्या खोलींत एक कोनाडा होता. त्यांत भीमाताई सांजसकाळ एक पणती लावीत. त्या कोनाड्याच्या मध्यभागीं असलेल्या पांढऱ्या स्वच्छ भिंतीवर त्यांनी आपल्या संसाराच्या आणि सौभाग्याच्या आठवणी स्थिर केल्या होत्या. आणि त्या आठवणींचें पूजन भीमाताई 'सांज-सकाळ' तेथे पणती लावून करीत असत. त्यांना त्यांची सांसारिक हकीगत कोणी विचारली तर भीमाताई त्या कोनाड्याकडे पाहून हसत हसत उखाण्यांत सांगत :

"समोर होता कोनाडा। त्यांत ठेवली पणती।
ते गेले वरती। आणि मी राहिलें खालती !॥"

बस्स ! याच्या उप्पर त्या आपल्या स्वतःच्या संसाराबद्दल एक अक्षरहि काढीत नसत !

दिवस येत होते आणि जात होते. दिवसांचे हात धरून भीमाताईच्या आयुष्यांतून महिने पळाले—महिन्यांच्या खांद्यावर हात ठेवून वर्षें निघून चाललीं.

खंडेरावांचा सुखी संसार वाढत होता. त्यांना मुलगे झाले. मुली झाल्या. नोकरींत त्यांचा पगार वाढत होता, तशा त्यांच्या आयुष्यांतील सुख-चैनीहि वाढत होत्या.

खंडेराव तसे स्वभावाने थोडे विलासी होते. त्यांना कपड्यांची छान-छोकी होती. परीटघडीच्या कपड्यांशिवाय त्यांनी कधी अंगांत कपडा घातला नाही. अत्तराचा फाया कानांत ठेवल्याशिवाय त्यांनी कधी घराबाहेर पाऊल टाकलें नाही. त्यांचा सकाळचा एक पोशाख—ऑफिसांत

जाण्याचा वेगळा पोशाख—संध्याकाळीं फिरायला जातांनाचा वेगळा पोशाख. आणि हें सर्व-सर्व त्यांना आयुष्यांत परवडत होतें गावांत नवीन होणाऱ्या नाटकांना ते नेहमी पहिल्या खेळांना पहिल्या दराच्या तिकिटाने सहकुटुंब हजर असत.

गावांतील कोणत्याहि नामांकित गवयाच्या होणाऱ्या जलशाला ते कधीच गैरहजर नसत.

शनिवार-रविवार ते नियमाने एका क्लबांत पत्ते खेळायला जात. त्यांना आयुष्यांत आतापर्यंत दुःख कधी फारसें भेटलेंच नाही. कधी काळीं त्यांना आपल्या बहिणीच्या-भीमाताईच्या एकाकी आयुष्याची आठवण होऊन ते बेचैन होत तेवढेच.

खंडेरावांच्या घराशेजारीं एक मोठें वडाचें झाड होतें. त्याला दरवर्षी नवी पालवी फुटे. जुनीं पानें गळून पडत. रात्रीच्या वेळीं त्या वडाच्या झाडावर अनेक पाखरें आणि पक्षी विसाव्याला येऊन बसत. कांहींनी आपलीं घरटीं तिथेच केलीं होतीं. एखाद्या दिवशीं वेळी अवेळीं त्या वडाच्या झाडावर खूप चिवचिवाट होई. एखादी घार अचानक झडप घालून त्यांतील कांही पक्षांचीं अंडीं आणि पिलें पळवी. त्यामुळे तो चिवचिवाट आणि कोलाहल भीमाताईंना ऐकूं येई.

भीमाताई एकीकडे त्या वडाचा वाढता विस्तार आणि संसार पाहत होत्या. एकीकडे आपल्या भावाचा—खंडेरावाचा वाढता संसार पाहत होत्या. आणि त्यांचें एकाकी आयुष्य अशा शेजारपाजारच्या सुखदुःखाच्या साक्षीने शांतपणाने चाललें होतें.

भीमाताई ज्या खोलींत राहत होत्या त्या खोलीला एक पोटमाळा होता. त्या पोटमाळ्यावर—भीमाताईंनी त्या खोलींत—बाळपणाचीं वर्षें सोडून एकाकी अवस्थेंत वीस वर्षें काढलीं होतीं. आज आता त्यांना बेचाळीसावें वर्ष लागलें होतें. आणि आज त्यांचा एक दात पडला होता.

तो पडलेला 'दात' हातीं घेऊन त्याकडे कुतूहलाने पाहत असतांना त्यांना सहज आठवण झाली. आपण ज्या खोलींत राहत आहोंत त्या पोटमाळ्यावर या वीस वर्षांत, घरांत वावरणारीं अनेक मांजरें व्यालीं. त्यांचीं कांही पिलें बोक्यांनी खाल्लीं. कांही वाढून मोटीं झालीं. तीं

वाढलेलीं सर्व मांजरें या घरांत राहणें शक्य नसल्यामुळे कांही त्याच शहरांत अन्य ठिकाणीं वस्तीला निघून गेलीं !

केव्हा तरी पाहिलेलें एक दृश्य त्यांना आठवलें.

एकाच मांजरीचीं दोन पिलें वाढून मोठीं झालीं होतीं. आणि एक दिवस तीं दोन पिल्लें शेपटी पिंजारून एकमेकांशी अशीं कांही भांडलीं—एकमेकांवर गुरगुरलीं—एकमेकांच्या अंगावर धावलीं—त्यांत एकाचा पराभव झाला. तें दुसरीकडे राहायला निघून गेलें—आणि ज्या मांजराचा भांडणांत जय झाला होता, तें आपल्या या खोलींत, या घरांत बादशहासारखें वावरूं लागलें.

भीमाताई कांहीतरी कल्पना येऊन त्या आपल्या पडलेल्या दाताकडे पाहून खुदकन् हसल्या. मला वाटतें, त्यांच्या डोळ्यांसमोरून त्यांच्या देखत त्या खोलीच्या पोटमाळ्यावर जन्माला आलेल्या—वाढलेल्या- निघून गेलेल्या आणि मरून गेलेल्या—बोक्याच्या भक्षस्थानीं पडलेल्या मांजरांचे नुसते रंग आले असावेत—किती चित्रविचित्र रंग होते त्या मांजरांच्या पाठींचे ! कांही काळे, कांही काळसर, कांही पांढरे शुभ्र, कांही केशराच्या रंगासारखे फिके आणि या रंगाचे पट्टे तरी किती गंमतीदार होते ! जणुं पहिल्यांदा पांढरी शुभ्र मांजरें तयार झालीं आणि तीं एकापेक्षा दुसरें वेगळें ओळखायला यावें म्हणून जगांत धाडतांना—निर्मात्याने त्यांच्या अंगावर रंगपंचमी साजरी केली आणि नंतर त्यांना जगांत धाडलें !

—या मांजरांच्या पाठीसारखेंच एखादवेळेला आकाश दिसतें, नाही ! मांजरांसारखेंच आकाशहि कित्येक वेळेला गुरगुरतें !

—आपला पडलेला दात भीमाताईंनी अंगणांत फेकून दिला; आणि पडलेल्या दातामुळे रिकामी झालेली जागा आपल्या जिभेने गोंजारीत समोरच्या रिकाम्या कोनाड्याकडे पाहत त्यांच्या मनांत आलें, आपल्या तोंडांतहि एक रिकामा कोनाडा तयार झाला आहे !

आणि हो—भीमाताईच्या आयुष्यांतील आणखी एक करमणूक सांगायची राहिली.

त्या रिकाम्या कोनाड्यांत जशी त्या रोज नियमाने पणती लावीत तसा त्या रिकाम्या कोनाड्याला कधी दुधाचा, कधी लोणी-साखरेचा, कधी

त्यांना मिळणाऱ्या फळांचा रोज नैवेद्य दाखवीत आणि तो नैवेद्य त्या कधी माजराच्या पिलांना, कधी आपल्या भावांच्या मुलांना हाक मारून देत. खंडेरावांना आयुष्यांत पहिलें मूल थोडें उशीराच झालें होतें.

खंडेरावांचें आजचें वय पन्नास वर्षांचें होतें–पण त्यांचा पहिला मुलगा फक्त एकोणीस वर्षांचा होता. खंडेरावांना मुलगे तीन, मुली तीन. प्रत्येकाने भीमाताईंनी दाखविलेला नैवेद्य खाल्लेला होता. आणि आता सर्वांत धाकटी मुलगी " उषा " भीमाताईच्या नैवेद्यावर टपलेली असे.

उषा थोडीशी बोलकी आणि हसरी असे. तिची " जिज्ञासा " अनेक छोटयामोठ्या प्रसंगांनी जागृत होत असे; आणि ती आपल्या सर्व " जिज्ञासा " भीमाताईंना विचारून पुऱ्या करून घेई.

एक दिवस उषा आपल्या मैत्रिणीकडून खेळून आली होती आणि ती भीमाताईला विचारूं लागली; " अग, त्यांच्या घरांत तुझ्यासारखी एकहि बाई नाही ! " उषेची कल्पना होती, प्रत्येक घरांत लहान मुलींना नैवेद्याचें दूध देणारी आणि " कुंकू " न लावणारी एखादी तरी बाई असतेच म्हणून !

भीमाताई आणि खंडेराव एकमेकांशीं फारसें कधीच बोलत नसत. भीमाताईला खर्चायला पैसे लागले की, ती खंडेरावाच्या पत्नीजवळ– आपल्या वहिनीजवळ मागे–आणि लगेच तिला ते मिळत. " कशाला ? " म्हणूनहि तिला कधी कोणीं विचारलें नाही.

आणि भीमाताईला तरी पैसे कशाला लागत ? ती कथापुराणाला जाई; तिथे कथेकऱ्याला–पुराणिकाला–द्यायला किंवा वाटेंत कुणी भिक्षेकरी आंधळापांगळा भेटला तर त्याला द्यायला !

एखादा ' अ ' वर्गाचा राजकीय कैदी जसा तुरुंगांत सुद्धा सन्मानाने वागवला जातो–तसें भीमाताईचें आयुष्य त्या घरांत चाललें होतें. त्या घरांत त्याचा कोणाचाहि शब्द खाली पडत नव्हता–पण त्यांना कोणी विचारीतहि नव्हतें–हवें तें मिळे–पण " कांही हवें का ? " म्हणून कोणी विचारीत नसे. खंडेराव कधी बहिणीजवळ बोलत नसे आणि भीमाताईंनी " तू माझ्याशीं मनमोकळेपणाने कां बोलत नाहीस ? " असे भावाला कधी विचारलें नाही !

वाढलेलीं सर्व मांजरें या घरांत राहणें शक्य नसल्यामुळे कांहीं त्याच शहरांत अन्य ठिकाणीं वस्तीला निघून गेलीं !

केव्हा तरी पाहिलेलें एक दृश्य त्यांना आठवलें.

एकाच मांजरीचीं दोन पिलें वाढून मोठीं झालीं होतीं. आणि एक दिवस तीं दोन पिलें शेपटी पिंजारून एकमेकांशीं अशीं कांहीं भांडलीं— एकमेकांवर गुरगुरलीं—एकमेकांच्या अंगावर धावलीं—त्यांत एकाचा पराभव झाला. तें दुसरीकडे राहायला निघून गेलें—आणि ज्या मांजराचा भांडणांत जय झाला होता, तें आपल्या या खोलींत, या घरांत बादशहासारखें वावरूं लागलें.

भीमाताई कांहीतरी कल्पना येऊन त्या आपल्या पडलेल्या दाताकडे पाहून खुदकन् हसल्या. मला वाटतें, त्यांच्या डोळ्यांसमोरून त्यांच्या देखत त्या खोलीच्या पोटमाळ्यावर जन्माला आलेल्या—वाढलेल्या- निघून गेलेल्या आणि मरून गेलेल्या—बोक्याच्या भक्षस्थानीं पडलेल्या मांजरांचे नुसते रंग आले असावेत—किती चित्रविचित्र रंग होते त्या मांजरांच्या पाठींचे ! कांही काळे, कांहीं काळसर, कांहीं पांढरे शुभ्र, कांहीं केशराच्या रंगासारखे फिके आणि या रंगाचे पट्टे तरी किती गंमतीदार होते ! जणुं पहिल्यांदा पांढरीं शुभ्र मांजरें तयार झालीं आणि तीं एकापेक्षा दुसरें वेगळें ओळखायला यावें म्हणून जगांत धाडतांना—निर्मात्याने त्याच्या अंगावर रंगपंचमी साजरी केली आणि नंतर त्यांना जगांत धाडलें !

—या मांजरांच्या पाठीसारखेंच एखादवेळेला आकाश दिसतें, नाही ! मांजरांसारखेंच आकाशहि कित्येक वेळेला गुरगुरतें !

—आपला पडलेला दात भीमाताईंनी अंगणांत फेकून दिला; आणि पडलेल्या दातामुळे रिकामी झालेली जागा आपल्या जिभेने गोंजारीत समोरच्या रिकाम्या कोनाड्याकडे पाहत त्यांच्या मनांत आलें, आपल्या तोंडांतहि एक रिकामा कोनाडा तयार झाला आहे !

आणि हो—भीमाताईच्या आयुष्यांतील आणखी एक करमणूक सांगायची राहिली.

त्या रिकाम्या कोनाड्यात जशी त्या रोज नियमाने पणती लावीत तसा त्या रिकाम्या कोनाड्याला कधी दुधाचा, कधी लोणी-साखरेचा, कधी

त्यांना मिळणाऱ्या फळांचा रोज नैवेद्य दाखवीत आणि तो नैवेद्य त्या कधी माजराच्या पिलांना, कधी आपल्या भावांच्या मुलांना हाक मारून देत. खंडेरावांना आयुष्यांत पहिलें मूल थोडें उशीराच झालें होतें.

खंडेरावांचें आजचें वय पन्नास वर्षांचें होतें–पण त्यांचा पहिला मुलगा फक्त एकोणीस वर्षांचा होता. खंडेरावांना मुलगे तीन, मुली तीन. प्रत्येकाने भीमाताईंनी दाखविलेला नैवेद्य खाल्लेला होता. आणि आता सर्वांत धाकटी मुलगी " उषा " भीमाताईंच्या नैवेद्यावर टपलेली असे.

उषा थोडीशी बोलकी आणि हसरी असे. तिची " जिज्ञासा " अनेक छोटयामोठ्या प्रसंगांनी जागृत होत असे; आणि ती आपल्या सर्व " जिज्ञासा " भीमाताईंना विचारून पुऱ्या करून घेई.

एक दिवस उषा आपल्या मैत्रिणीकडून खेळून आली होती आणि ती भीमाताईला विचारूं लागली; " अग, त्यांच्या घरांत तुझ्यासारखी एकहि बाई नाही ! " उषेची कल्पना होती, प्रत्येक घरांत लहान मुलींना नैवेद्याचें दूध देणारी आणि " कुंकू " न लावणारी एखादी तरी बाई असतेच म्हणून !

भीमाताई आणि खंडेराव एकमेकांशीं फारसें कधीच बोलत नसत. भीमाताईला खर्चायला पैसे लागले की, ती खंडेरावाच्या पत्नीजवळ–आपल्या वहिनीजवळ मागे–आणि लगेच तिला ते मिळत. " कशाला ? " म्हणूनहि तिला कधी कोणीं विचारलें नाही.

आणि भीमाताईला तरी पैसे कशाला लागत ? ती कथापुराणाला जाई; तिथे कथेकऱ्याला–पुराणिकाला–द्यायला किंवा वाटेंत कुणी भिक्षेकरी आंधळापांगळा भेटला तर त्याला द्यायला !

एखादा ' अ ' वर्गाचा राजकीय कैदी जसा तुरुंगांत सुद्धा सन्मानाने वागवला जातो–तसें भीमाताईचें आयुष्य त्या घरांत चाललें होतें. त्या घरांत त्याचा कोणाचाहि शब्द खाली पडत नव्हता–पण त्यांना कोणी विचारीतहि नव्हतें–हवें तें मिळे–पण " कांही हवें का ? " म्हणून कोणी विचारीत नसे. खंडेराव कधी बहिणीजवळ बोलत नसे आणि भीमाताईंनी " तू माझ्याशीं मनमोकळेपणाने कां बोलत नाहीस ? " असे भावाला कधी विचारलें नाही !

जणूं त्यांचा लहानपणचा लपंडावाचा खेळच अजून चालला होता. भीमाताई लपून बसली होती. पण खंडेराव आता आपल्या बहिणीला शोधीत नव्हता !

आणि ज्या दिवशीं भीमाताईचा दात पडला त्याच दिवशीं त्यांच्या मनांत आलें, ' खंडेराव ' आपल्यापेक्षा मोठा आहे—त्याचेहि आता कांही दात पडले असतील !

पण हें विचारायचें कसें ?

पण त्या आता शोधक दृष्टीने सवड काढून, संधि काढून, भावाकडे पाहूं लागल्या.

आतापर्यंत त्यांनी खंडेरावाला ' उघडा ' कधीच पाहिला नव्हता— आणि छानछोकीचे कपडे घातलेला ' खंडेराव ' चांगला दिसे.

आणि एक दिवस अचानक भीमाताईच्या नजरेस ' आंघोळीला ' जातांना खंडेराव उघडा दिसला आणि त्या मनांत चरकल्या. त्याच्या छातीचें खोकें झालें होतें. छातीच्या बरगड्या खिडकीच्या गजाप्रमाणे स्वच्छ दिसत होत्या.

भीमाताईंनी भावाकडे पाहिलें—त्याचे दात मात्र कसे पांढरेशुभ्र आणि मोत्यासारखे दिसत होते.

" अरे, खंडेरावाचा एकहि दात अद्याप पडलेला नाही ! "

त्यांना आनंद झाला ; पण तो क्षणभरच टिकला. कारण दुसऱ्याच क्षणीं खंडेरावांनी ते आपले दात धुवायला बाहेर काढले. ते बसवलेले नकली दात होते !

आणि हें सर्व आपण आतापर्यंत कां पाहिलें नाही ? भावाच्या आयुष्याचा कानोसा आपण कां घेतला नाही ? भीमाताईचा जीव कासावीस झाला. भावाने आपल्या तब्येतीची काळजी घेतली नाही. आपणहि त्याच्याकडे पाहिलें नाही—कथा-पुराणांत आपण दंग राहिलों— आयुष्यांत आपली फार मोठी चूक झाली.

—आणि मग त्या भावाकडे क्षणाक्षणाला पाहूं लागल्या. भावाला ' सिगरेट ' चें खूप व्यसन जडलेलें त्यांच्या लक्षांत आलें. आपला भाऊ कमालीचें धूम्रपान करतो हें त्यांच्या लक्षांत आलें ! त्यामुळेच त्याच्या

छातीचें खोकें झालें. अलीकडे तो खूप खोकतो ... त्याला दम लागतो... आपल्या भावाच्या शरीराचा रंगीत कपड्यांनी मढवलेला पोकळ ताबूत झाला आहे......किती उशिरा आपल्या लक्षांत आलें......याच्या आयुष्याचें पुढे काय होईल......आता तो आपलें ऐकेल कां?...... आपण त्याला सांगावें का? त्याच्या बायकोने कां लक्ष दिलें नाही?...... का, तो आपल्या बायकोचें ऐकत नाही?...भीमाताईंना या विचाराने भोवळ आली...भावाचा संसार उध्वस्त होणार काय? असें शरीर केव्हा कोलंमडून पडेल... ..

आणि नंतर कांही दिवसांनीच एक दिवस असा उगवला—

वेळ संध्याकाळची होती. उन्हें नुकतींच मावळत होतीं. खंडेराव एकटेच बाहेरून आले होते. त्यांच्या हातांत पेटलेली सिगरेट होती... शेवटचा एक झुरका ओढून ती सिगरेट फेकून देण्याच्या तयारींत खंडेराव होते. त्यांनी एक शेवटचा झुरका ओढला—

—आणि जी त्यांना खोकल्याची उबळ आली—त्यांची छाती भरून आली, त्यांना दम लागला—आणि मोठ्या कष्टाने स्वतःला सावरण्याकरिता ओटीला लागून असलेल्या घराच्या पायरीवर बसले.

भीमाताईंना हें सर्व दृश्य खिडकींतून दिसलें. त्यांचा जीव कासावीस झाला. त्यांना खोलींत बसून हें दृश्य पाहणें अशक्य झालें. त्या तावातावाने खोलीबाहेर पडल्या.

लपलेली बहीण बाहेर आली.

आणि दम लागून खोकत बसलेल्या अस्वस्थ भावाकडे, वात झालेला माणूस जसा बोलतो, त्याप्रमाणे खंडेरावाकडे हातवारे करीत भीमाताई म्हणाल्या,

" अरे खंड्या—काय शरीराची दशा करून घेतलीस ही! उद्या उताणा पडलास तर तुझ्या पोरांकडे कोण पाहणार? किती लहान आहेत तुझीं मुलं—आणि शरीराची अशी घाण करणारी तंबाखू ओढायला लाज नाही वाटत तुला? बेशरम—उडाणटप्पू बिन अब्रूचा..." पुढे भीमाताईंना कांहीच बोलवेना.

लहानपणीं रागांत आणि खेळांत भीमाताई खंडेरावांना असेंच टाकून बोलत असत.

आणि लहानपणची टाकून बोलण्याची भीमाताईची सवय अद्याप गेली नाहीं याची खंडेरावांना कल्पना नव्हती.

पहिल्यांदा खंडेरावांना राग आला. त्यांचे डोळे रागाने इंगळासारखे लाल झाले–ते भीमाताईला कांहीतरी उलट उत्तर देणार होते. त्याची तयारी करण्याकरिता त्यांनी हातांतील पेटलेल्या सिगरेटचा शेवटचा झुरका ओढला. सिगरेटचें जळतें टोक आणि खंडेरावांचे लाल लाल डोळे सारखेच दिसत होते.

खंडेरावांची बायको तिथे आली होती. खंडेरावांचीं लहान लहान मुलें तिथे आलीं होतीं. तीं आपल्या बापाकडे आणि भीमाताईकडे आश्चर्याने पाहत होतीं.

आणि भीमाताई तोंडांतल्या तोंडांत रागाने पुटपुटत होत्या,

" खंड्या–बेशरम–बिन अब्रूचा–आपल्या पोराबाळांचा कसाब...या घरांत राहायला नको...... "

" भिमे...... " हातांतील जळती सिगरेट फेकून देत खंडेराव म्हणाले.

आणि पाण्याची जशी 'वाफ' व्हावी तसें खंडेरावाच्या रागाचें रूपांतर झालें. " चांडाळणी! माझ्या मुलांदेखत मला शिव्या देतेस! माझ्या बायकोच्या देखत माझा अपमान करतेस! तुला इतक्या दिवस सांभाळली... हें फेकलें सिगरेटचें थोटूक ...... आता उभ्या आयुष्यांत सिगरेटला हात लावणार नाही. ... माझीं पोरं पोरकी होतील......कुणाच्या तोंडाकडे पाहतील......माझ्या आयुष्याचें भयंकर चित्र मला दाखवलंस.. ... चल जा आपल्या खोलींत! माझा अपमान करतेस......... "

भीमाताई पुन्हा आपल्या खोलींत जाऊन लपल्या.

आणि व्यसन जसें अचानक लागतें तसें अचानक सुटतेंहि हा 'खंडेरावांना' शोध लागला!

" भिमे–भिमे–कुठे ग हे शब्दांचे दगड संभाळून ठेवले होतेस? भीमा इतकी तापते? तुझे डोळेहि निखाऱ्यासारखे लाल होतात? "

खंडेराव केव्हा तरी बडबडत.

खंडेरावांची सिगरेट कायमची सुटली !

आणि त्या ' भडकलेल्या रागांनी ' म्हणा-भावाची स्थिति पाहून कासावीस झाल्यामुळे म्हणा-भीमाताईंचे आणखी तीन दात पडून त्यांच्या हातांत आले-पण त्यांच्या आयुष्यांत पुन्हा पूर्वीचें समाधान चालू झालें होतें !

● ● ●

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ...३५०३८९...... वि: ....................
क्रमांक ........................ नों दि: ..........

## पांच

आमच आण्णासाहेब ज्याना ज्यांना माहीत आहेत त्यांना त्यांना त्यांच्याविषयी कमालीचा आदर आहे !

कांही माणसांच्या आयुष्यांत असें भाग्य असतें की, त्यांचा शब्द कोणी खाली पडूं देत नाहीत आणि तेहि कोणाचा शब्द खाली पडूं देत नाहीत. हें भाग्य असण्याचें कारणहि त्यांच्या वैशिष्टयपूर्ण वागणुकींत असतें.

त्यांची वागणूकच अशी असते कीं, अदमास पाहूनच ते कोणाजवळहि शब्द टाकतात आणि त्यांची इतरांशीं वागणूकहि अशी संयमपूर्ण असते की, त्यांच्याजवळ कोणी जास्त सलगीहि करूं शकत नाही किंवा अव्यवहारी मागणी करूं शकत नाही !

सर्वांत मिळून मिसळून वागूनहि आपलें स्वतंत्र व्यक्तित्व ते मोठ्या गमतीदार तऱ्हेने आणि वैशिष्ट्याने टिकवूं शकतात.

शंभरांत असें एखादेंच माणूस सापडतें. अशा दुर्मिळ माणसांतील एक आमचे आण्णासाहेब होते.

आण्णासाहेबांचा पोशाखहि अगदी साधा—पांढरा स्वच्छ कोट, त्यावर पांढरें उपरणें, पांढरा सदरा, पांढरीं धोतरें आणि पुन्हा हें सर्व स्वतःच्या हातांनी धुतलेलें.

कानांत भिकबाळी नाही, की हातावर आंगठी नाही. पायांत फक्त 'करकर' वाजणाऱ्या वहाणा !

त्या आवाजावरून ओळखावें, आण्णासाहेब आले आहेत ! 'कर-कर'— जशीं कांही घड्याळाची तालबद्ध टिकटिक !

एकटी एकच चाल; पण ती सरळपणाची !

वारा सुटला, पाऊस धो धो पडला, किंवा उन्हाची रखरख सुरू झाली, किंवा चंद्राचें चांदणें पडलें तरी घड्याळाचा आवाज एकच. त्याप्रमाणे घरांत क्वचित् कुरबुर झाली, बाहेर कोणी रागावलें, संतापलें, रस्त्यांत रडणें ऐकूं आलें किंवा बाजारांत गलबला ऐकूं आला तरी आण्णा-साहेबांच्या चालींत किंवा चेहऱ्यांत फरक पडायचा नाही.

आण्णाहेबांशीं कोणी रागांत बोललें, तरी आण्णासाहेबांचा आवाज कधी चढायचा नाही किंवा आण्णासाहेब आपला मुद्दा कधी सोडायचे नाहीत !

गणिताला जशी ठराविक रीत असते, तशी आण्णासाहेबांचें आयुष्य एकाच रीतीने चाललें होतें.

त्यांच्या लहानपणीं किंवा तरुणपणीं—म्हणजे त्यांच्या आयुष्यांत रीत बसेपर्यंत—त्यांच्या वागण्याबोलण्यांत काय चलबिचल झाली असेल तेवढीच.

पण एकदा आयुष्याचा रस्ता ठरला, वाट हेरली आणि आण्णासाहेब चालू लागले——

——आणि त्यांच्या पायांतील वहाणांची तालबद्ध 'करकर' ऐकूं येऊं लागली !

— फळाफुलांनी बहरलेले वृक्ष रस्त्यांनी लागले, पक्षी गाऊं लागले किंवा कोकिळा आवाज करूं लागल्या, तरी आण्णासाहेबांची दृष्टि समोर. कधीं फुलाफळांना हात लावायची इच्छा व्हायची नाही. सरळ आणि समोर वाटचाल !

"कर-कर" आवाज.

आकाशांत फिरणाऱ्या पाखरांनाहि वाटावें, "खालून इतका कोण संथ चालला आहे ? याच्या चालीने आपण चालावें का ?"

योगायोगाने क्वचित् अशीं कांही पाखरें आण्णांच्या डोक्यावरून

फिरतांना दिसत; पण त्यामुळे आण्णांच्या डोक्यावर कांही वेळ त्यांची सावलीच पडे !

आपल्या डोक्यावर सदैव असणाऱ्या आभाळाकडे आपण बहुधा निर्विकार मनाने पाहतों, डोंगरांबद्दल आपण फारसा कधी विचार करीत नाही — वाहणारी नदी ओलांडून जातों. आपल्या मनाला वाटतें, हें सर्व असायचेंच. फार पूर्वीपासून हें आहे आणि अनंत काळपर्यंत हें असेंच राहणार आहे ! यांच्यापेक्षा आपलें आयुष्य आणि जीवनकार्य निराळें आहे !

आपली वाटचाल निराळी आहे !

" कर–कर ! कर–कर ! " आण्णासाहेब चालले आहेत !

—मानवी आयुष्य चाललें आहे !

* * *

आज अण्णासाहेबांच्या नोकरीची मुदत संपली होती. आजपासून ते पेन्शनींत निघाले होते.

उद्यापासून त्यांना ऑफिसमध्ये यायचें नव्हतें !

तरीसुद्धा उद्या ऑफिसमध्ये यायचेंच आहे या भावनेने जसे पूर्वी आण्णासाहेब घरीं जायला निघत, तसेच आण्णासाहेब आजहि ऑफिसांतून बाहेर पडले !

त्यांचे सहकारी गांगरले होते. हाताखालचीं माणसें भावनाविवश झालीं होतीं. आण्णासाहेबांचे वरिष्ठ त्यांना निरोप देतांना, " हा माणूस पुन्हा तेथे येणार नाही, " या भावनेने भारावले होते. पण खुद्द आण्णा-साहेबांच्या वृत्तींत कांहीच फरक नव्हता.

जणूं बाकीचे सर्व पेन्शनींत निघाले होते आणि फक्त आण्णासाहेबच कामावर राहिले होते.

आण्णासाहेबांनी आपलें टेबल नेहमीसारखें आवरून ठवलें.

भावना ही की, आपण इथे कामाला येणार नसलों तरी दुसरा कोणी-तरी येणार आहे. त्याला टेबल आवरलेलें आणि स्वच्छ नको का ?

* * *

दुसऱ्या दिवशीं आण्णासाहेब ठरलेल्या वेळींच जेवून घराबाहेर पडले. आण्णांना " कुठे जातां ? " म्हणून विचारण्याची कोणाला सोय नव्हती.

त्यांच्या पत्नीने धीर धरून विचारलें,

"येणार केव्हा?"

"नेहमीच्याच वेळेला!" त्यांच्या पत्नीच्या कानांवर शब्द पडले आणि रस्त्याने आण्णांच्या वहाणा नेहमीच्या पद्धतीने 'कर-कर' वाजूं लागल्या.

—आण्णासाहेब गेले कुठे?

गावाबाहेर एक आंबराई होती. आंबराई सोडली, की थोडा वेळ चालून गेल्यानंतर एक लहानसा डोंगर होता. त्या डोंगरावर एक देऊळ होतें.

ऑफिसच्या कामाकडे बारकाईने पाहावें असें आण्णासाहेब आज रस्त्यांनी पाहत चालले होते. आंबराईतील झाडांनी आज आण्णासाहेबांचें लक्ष वेधलें होतें. 'उत्तरें देण्याचीं पत्रें' अशी ऑफिसच्या फाईलमध्ये 'चिठी' घातलेली असावी असा तो आंब्याच्या झाडावरचा मोहोर आण्णासाहेबांना वाटत होता.

आण्णासाहेब नेहमी ऑफिसमध्ये सर्वांआधी जात, त्यावेळी ऑफिस-मध्ये शुकशुकाट असे; तसा तो रिकामा आणि निस्तब्ध डोंगर आण्णा-साहेबांना रिकाम्या ऑफिससारखा वाटत होता. आपण कामावर आलों आहोंत–आणखी माणसें यायचीं आहेत!

त्या दिवशीं सकाळीं आण्णासाहेबांनी नेहमीसारखेंच घरीं विचारलें होतें, "जेवायचें झालें का?" आणि त्यांच्या पत्नीने नेहमीच्या सवयीने त्यांचा फराळाचा डबा तयार करून ठेवला होता.

अण्णासाहेबांनी नेहमीसारखा तो डबा उचलला आणि मग त्यांच्या पत्नीच्या लक्षांत आलें, "आज ऑफिसमध्ये जायचें नाही!"

आण्णासाहेब रमतगमत मध्ये विसावा घेत, त्या डोंगरावरच्या देवळांत आले. त्यावेळपर्यंत त्यांची ऑफिसमधल्या मधल्या सुटीची वेळ झाली होती. देवळांत त्यांनी फराळाचा डबा सोडला. पण आज आजूबाजूला ऑफिस-मधल्या सहकाऱ्यांऐवजी दोन कुत्रीं उभीं होतीं. आण्णासाहेबांनी त्यांनाहि दोन घास टाकले.

त्यांनी ऑफिसचा राहिलेला वेळ देवळांतच काढला आणि नेहमींच्या परत येण्याच्या वेळीं ते घरीं परत आले.

एरवींचा त्यांचा आयुष्यक्रम ठरलेलाच होता. तसाच चालू होता. ऑफिसचा वेळ ' रिकामा ' झाला तो त्यांनी असा काढायचें ठरविलें.

आण्णासाहेबांचें वाचन खूप असे—पण तें रात्रीं होई. आता ऑफिसच्या वेळांत ते आपलें वाचन असें ' गावाबाहेर ' करीत आणि रात्रीं शांत झोपीं जात.

आणि झोप येईपर्यंत जो त्यांचा वेळ पूर्वी ' वाचनांत ' जात असे तो वेळ आता त्यांचा आकाशाकडे बघण्यांत जाई !

पेन्शनींत निघाल्यानेसुद्धा त्यांच्या वृत्तींत कांहीच फरक पडला नव्हता.

आपण जसे नोटा एका कप्प्यांत ठेवतों व नाणें, खुर्दा पाकिटाच्या दुसऱ्या कप्प्यांत ठेवतों, त्याप्रमाणे आण्णासाहेबांच्या ऑफिसच्या वेळेच्या नोटेचा नाणें खुर्दा झाला होता-तो त्यांनी दुसऱ्या कप्प्यांत ठेवून दिला.

पाकीट खिशांत-हिशोब बरोबर – वाटचाल चालू !

" कर–कर " आण्णासाहेबांच्या वहाणा वाजत होत्या.

" कर–कर ऽ करकर ! "

* *

आण्णासाहेब जीवनाचे असे एक नमुनेदार प्रवासी होते !

आण्णासाहेबांचा प्रपंच मोठा होता. मुलेंबाळें, सुना–नातवंडें सर्वांच्या आयुष्याला त्यांनी मार्ग लावून दिला होता--आणि आता त्यांच्या आयुष्याकडे ते फक्त पाहत बसले होते !

आण्णासाहेबांची सांपत्तिक स्थिति पहिल्यापासूनच चांगली होती. सत्तेचें वडिलार्जित घर होतें. नोकरींतहि त्यांना चांगला पगार मिळत होता, आणि आता त्यांना पेन्शन मिळालें होतें. तें सुद्धा त्यांच्या प्रपंचाला पुरेसें होतें !

पण आण्णासाहेबांची वागणूक अशी होती की, त्यांची सुस्थिति कोणाच्याहि डोळ्यांत खुपत नव्हती.

कोणाच्याहि ' खऱ्या ' अडीअडचणीला ते ' निरपेक्ष ' साहाय्याला उभे राहत.पुन्हा तें अबोल साहाय्य.

त्यांनी आपल्या मुलांना गरिबांच्या मुली केल्या होत्या आणि आपल्या मुली श्रीमंतांच्या इथे दिल्या होत्या. त्यांनी आपल्या मुलांचा हुंडा घेतला नाही, पण हें सांगून त्यांनी आपल्या मुलींना हुंडा द्यायचा नाकारला नाही !

आणि आण्णांच्या वैभवाची महत्त्वाची गोष्ट अशी होती की, त्यांचीं सर्व मुलें–स्वभावाने आणि वृत्तीने त्यांच्यासारखींच निघालीं होतीं.

जशीं झाडावरचीं फुलें ! तोच रंग आणि तोच वास !

आण्णांच्या घरीं अनेक विद्यार्थी राहून–जेवून आणि अभ्यास करून गेले होते. अनेकांचीं आयुष्यें आण्णासाहेबांनी अशा तऱ्हेने उजळलीं होतीं.

आण्णांच्या घरची सकाळ–दुपारची जेवणाची पंगत मोठी पाहण्या-सारखी असे. पानें वाढण्यापूर्वींचीं ताटें आणि जेवण झाल्यानंतरचीं ताटें ओळखायचीं नाहींत इतकी स्वच्छ असत. जेवण झाल्यानंतर कोणाच्याहि पानांत शीत दिसायचें नाही !

यज्ञांत आहुति टाकतांनाचें 'गांभीर्य आणि मांगल्य' त्यांच्या घरच्या जेवणाच्या पंगतींत दिसायचें.

* * *

जिनसा असायच्या तिथेच असतात. पण त्या सकाळच्या सूर्यप्रकाशांत निराळ्या दिसतात–दुपारच्या रखरखीत उन्हांत निराळ्या दिसतात-चांदण्यांत निराळ्या दिसतात आणि समईच्या शांत प्रकाशांत निराळ्या दिसतात. जिनसा त्याच !

तसें 'प्रकाशाचें' वैशिष्ट्य आण्णांच्या व्यक्तित्वांत होतें !

आण्णा घरांत आले–बाहेर गेले किंवा ते कुठेहि असले तरी सर्वांचें लक्ष आण्णांच्यावर केंद्रित होई ! जणुं दिवा आणि प्रकाश !

पण अशा माणसाशीं खेळायचीहि कुणाला तरी लहर येते. आण्णा-साहेबांचा एक दूरचा नातेवाईक होता.

रिकामपण सापडलें की लहान मुलांना एखाद्या स्वच्छ भिंतीवर कोळशाने रेघोट्या ओढाव्याशा वाटतात–हाताशीं दगड लागला की कुठे तरी भिरकावासा वाटतो.

त्या दूरच्या नातलगाला आण्णासाहेबांच्याबद्दल क्वचित् अशी लहर येई.

एकदा त्याने 'लोक असं म्हणतात' या नांवावर आण्णासाहेबांच्या

मुलांबद्दल—सुनांबद्दल—कांही तरी कुचाळीसारखें आण्णासाहेबांच्या कानांवर घातलें—पण आण्णासाहेब शांतपणाने म्हणाले, " असें असूं शकणार नाही. माझीं मुलें, माझीं माणसें मला पूर्ण माहीत आहेत. "

स्वतःच्या माणसांबद्दलहि इतकें खात्रीने बोलणारा माणूसहि दुर्मिळच आहे, नाही ?

आणि आता त्या माणसाला पुन्हा संधि आली होती. आण्णासाहेबांनी पेन्शन घेतल्यामुळे—त्यांना खूप मोठा ' प्रॉव्हिडंट फंड ' मिळाला होता. शिवाय त्यांनी आपलें थोडें पेन्शनहि सरकारला विकलें होतें.

आण्णांच्या त्या दूरच्या नातेवाइकाने आण्णांना बनवायचें ठरविलें.

एक दिवस तो आण्णांकडे आला आणि म्हणाला,

" आण्णा, मी जरा पैशाच्या अडचणींत आहे. मी एक धंदा करूं इच्छितों. मला पांचशे रुपये भांडवलाची गरज आहे. या वर्षीं रत्नागिरीच्या हापूसच्या आंब्याला भाव चांगला आहे. मी धंदा करीन म्हणतों—पांचशे रुपये भांडवल घातलें—तर त्याचे पांचहजार रुपये खात्रीने होतील. माझ्या तशा आणि तितक्या ओळखी आहेत. मिळेल त्यांतील निम्मा फायदा तुमचा ! "

आण्णांनी हसत म्हटलें, " उद्या येऊन घेऊन जा—पण मला फायद्याची अपेक्षा नाही ! "

" पण मी कांही तुमच्यावर उपकार करण्याकरिता फायदा देत नाही. अहो, भांडवल तुमचें—कष्ट माझे. निम्मा फायदा तुमचा, निम्मा माझा ! "

आण्णासाहेबांनी तो विषय तिथेच थांबविला. " उद्या सकाळीं घेऊन जा पांचशे रुपये—" आणि बोलणें वाढूं नये म्हणून आण्णा कपडे करून चालू लागले.

त्यांच्या पायांतील वहाणा रस्त्यावर आवाज देत होत्या,

" करऽकरऽ—"

* * *

दुसऱ्या दिवशीं सकाळीं त्या माणसाने पांचशे रुपये नेले.

"—कागदावर लिहून घ्या ना ! " तो नातेवाईक व्यवहाराची सचोटी दाखविण्याकरिता म्हणाला.

" काही जरूर नाही. मी माणसें ओळखतों ! " आण्णासाहेब शांतपणाने म्हणाले.

पहिली पावसाची सर आली !

आंब्याचा धंदा संपला आणि एक दिवस तो नातेवाईक मोठ्या खुशीने आण्णाकडे आला आणि त्याने आण्णांच्या पुढे पंधराशेच्या नोटा ठेवल्या. " आपले भाडवलाचे पांचशे रुपये–आणि हजार रुपये आपला फायद्यांतील वाटा– " आणि आण्णांच्या पायांवर डोकें ठेवीत तो म्हणाला, " आपले पैसे यशस्वी आहेत. आपणांला फायद्याचे हजार रुपये देऊन–मलाहि तितकेच मिळाले आहेत ! "

" पण फायद्याच्या आशेने मी तुम्हांला पैसे दिले नव्हते! मला खरोखरच फायद्याच्या या हजाराची गरज नाही ! " आण्णासाहेब शांतपणाने म्हणाले.

" पण मी ते पैसे घेणार नाही–ते तुमच्या मालकीचे आहेत ! आण्णा, तुमचे पैसे स्वच्छ आहेत. यशस्वी आहेत. तुम्ही ते पैसे घेतले नाहीत तर माझ्या गळ्याची शपथ आहे तुम्हांला–तुमच्या मुलाबाळांची शपथ आहे ! " आणि ते पैसे तसेच टाकून तो नातेवाईक मोठ्या दिमाखाने आण्णांना नमस्कार करून चालू लागला !

आण्णांनी शांतपणाने ते पैसे उचलून ठेवले.

यानंतर कांही महिने उलटून गेले. वास्तविक त्या नातेवाइकाला त्या आंब्याच्या धंद्यात सात–आठेश रुपयेच फायदा झाला होता; पण पुन्हा आपण जास्त पैसे धंद्याकरिता मागितले तर आण्णांनी द्यावेत म्हणून पदरचे दोनशे रुपये घालून त्यांनी आण्णांना ' फायद्याचे ' म्हणून हजार रुपये आणून दिले होते.

* * *

आता गावांत मौजीबंधनाचे समारंभ चालू होते. आण्णाच्या घरावरहि केळीचे खाब आणि तोरणें लागलीं होतीं. आण्णानी आज आपल्या घरीं काही " धर्ममुंजी " लावण्याचें ठरविलें होतें.

गरिबांचे वीस अष्टवर्षीय बटु आपल्या मातापित्यांसह आज आण्णाच्या

घरीं आले होते. मुंजीचा मुहूर्त उजळला. वीस बटूंच्या मुंजी लागल्या. आण्णासाहेबहि उत्साहांत आणि आनंदांत होते.

तो त्यांचा स्वभावधर्मच होता.

सूर—सनई निनादत होत्या.

भिक्षुकांच्या गळ्यांतून ' मंगलाष्टकांचे मंगल ध्वनि ' गर्जत होते !

त्या मंगलाष्टकांच्या ' उच्च रवाने ' जमलेलीं माणसें आपला नेहमीचा स्वभाव विसरून एका निराळ्याच भावनेंत रंगलीं होतीं !

इतक्यांत आण्णांचा तो नातेवाईक तिथे आला आणि तो समारंभ पाहून त्याने आश्चर्याने विचारलें,

" आण्णा, हें काय? तुमच्या घरीं कार्य आणि आम्हांला आमंत्रण नाही? "

" माझ्या घरचें हें कार्यच नव्हे ! माझी इच्छा नसतांना तुम्ही माझ्या घरांत हजार रुपये फायद्याचे म्हणून आणून टाकलेत., मी विचार करीत होतों या रुपयांचें काय करावें? तेव्हा परवा ठरवलें, ते हजार रुपये खर्च करून गरिबांच्या वीस धर्ममुंजी लावाव्या. हल्ली मुंजीला समारंभाचें स्वरूप आलें आहे आणि त्यांतील संस्कार लोपले आहेत ! पण ज्यांना आपल्या मुलांना हे संस्कार मिळावेत अशी इच्छा आहे पण शक्ति नाही, अशा वीस बटूंच्या मुंजी मी आज ते हजार रुपये खर्च करून लावल्या आहेत. हजार रुपये पुरले नाहीतच, माझेच शे-सवाशे वर खर्च झाले असतील ! "

आण्णासाहेबांकडून असें कांही ऐकायला मिळेल ही त्या नातेवाईकाची कल्पना नव्हती. त्यांनी थोडा वेळ तसाच जाऊं दिला आणि नंतर हळूच विषय काढला.

" आण्णा, आज मी तुमच्याकडे मुद्दाम आलों होतों. दुसरा एक धंदा आहे. पांच हजार रुपये भांडवल घालायला हवें. एक वर्षांत दहा-पंधरा हजार रुपये नक्की मिळतील ! "

आण्णासाहेबांनी कांहीच उत्तर दिलें नाही.

" विचार करून ठेवा, मी येईन पुन्हा केव्हा तरी ! " तो गृहस्थ जाऊं लागला.

" बसा जरा. आताच सांगतों—माझ्या विश्वासावर राहूं नका. माझी धंदेवाईक प्रवृत्ति नाही आणि मला अधिक पैशाची गरजहि नाही ! "

" अहो, पण–मुलांकरिता, नातवांकरिता—" तो गृहस्थ मध्येच म्हणाला.

" त्यांचें ते पाहायला समर्थ आहेत आणि मी किती पिढ्यांची काळजी करणार ? आणि खरं सांगू का, आपण प्रत्येकाचें कांही तरी ऋण लागत असतों–किंवा आमच्याकरिता इतकें बुडायला हरकत नाही, असा माझा कांही मनांत हिशोब असतो. तसं मी तुमच्याकरिता पांचशे रुपयाला बुडायचें ठरविलें होतें. ते पैसे तुम्ही मला परत केले नसते–तर मी कधीहि मागितले नसते. तुमचा आमचा ऋणानुबंध आहे एवढा ! तेव्हा ते पांचशे रुपये तुम्ही केव्हाहि घेऊन जाऊं शकतां—"

तो गृहस्थ खजील झाला.

आण्णासाहेबांच्या या स्वरूपाची आणि या स्थितप्रज्ञतेची त्याला कल्पना नव्हती !

पण आण्णासाहेब जास्त वेळ तिथे थांबलेच नाहीत. त्यांनी कपडे केले. पायांत वहाणा घातल्या. ते घराबाहेर पडले.

" तेव्हा ते तुमचे पांचशे रुपये केव्हाहि घेऊन जा. मी ते कधीहि परत मागणार नाही—"

आण्णासाहेबांच्या वहाणा रस्त्याने ' कर ऽ कर ' वाजूं लागल्या—

त्या गृहस्थाला वाटलें, " असे शब्द आपल्याला ऐकविण्यापेक्षा त्या ' कर कर कर ' वाजणाऱ्या वहाणांनी त्यांनी आपल्याला कां बडविलें नाही ?

—आण्णासाहेबांचा स्थितप्रज्ञ जीवनौघ तसाच चालू होता !

●●●

## सहा

कांहीं चांगलीं पाहिलेलीं स्वप्नें लक्षांत राहावींत, पावसाळ्यांत कधी तरी पाहिलेल्या इंद्रधनुष्याचे रंग डोळ्यांसमोर चमकावेत, एखाद्या पावसाळ्यांत पडलेला प्राजक्तांच्या फुलांसारखा गारांचा सडा मनासमोर यावा—त्या गारांतील आपण वेचून खाल्लेल्या कांहीं गारांचा गारवा लक्षांत राहावा—त्याप्रमाणे रिकाम्या वेळीं गतायुष्याकडे पाहिलें कीं, अशीं वैशिष्टयपूर्ण अनेक माणसें डोळ्यांपुढे उभीं राहतात !

आणि पाहतां पाहतां हीं माणसें—हीं स्वप्नें—गेलीं तरी कुठे—अशी मनाला एक गोड हुरहूर लागते !

कापसाचें सूत काढतांना सुताचा धागा जसा मागील कापसाला ओढींत असतो—त्याप्रमाणे—तीं कालचीं स्वप्नें - विरून गेलेलीं इंद्रधनुष्यें—वितळून गेलेल्या गारा—आज जें आपल्या हातीं आहे—डोळ्यांसमोर आहे त्यालाहि स्वप्नसृष्टींत ओढीत आहेत असें वाटतें !

उद्यांच्या सत्य सृष्टींत ती पळालेली—विरलेली स्वप्नसृष्टि पुन्हा तशीच आल्हादकारक रूपें घेऊन पुन्हा अवतरणार आहे का ?

—काळाची ओढ—काळाचें रिंगण—केवढें वर्तुळ !

आपणहि त्यांतच फिरतों आहोंत—धावतों आहोंत !

आपला डावा हात कुणीं धरला आहे ? आणि उजवा हात कुणीं धरला

आहे? गेलेल्या काळाच्या सुखद आठवणींशीं आपण विसाव्याकरिता थोडें थांबलों आहोंत–घुटमळतों आहोंत–पण काळाची भिंगरी आपले दोन्ही हात धरून आपल्या वेगांतच फिरते आहे!

मामा पिंपुटकर म्हणून एक गृहस्थ आमच्या घरीं माझ्या लहानपणापासून येत असलेले मला आठवतात. गृहस्थ होता अगदी खुजा. अंगानेहि बारीक. ते पोस्टांत व्हिलेज पोस्टमन म्हणून नोकरीला होते.

खेडेगावांत–या गावाहून त्या गावीं पत्रें वाटीत जायचे. मधले गाव म्हणून ते एक दिवसाआड आमच्या घरीं उतरायचे. फराळाचा डबा बरोबर आणलेला असायचा. कांहीतरी तोंडीं लावणें आमच्या घरचें घ्यायचें–बोलायचे. वेळ आली की निघून जायचे.

मी त्यावेळीं फार लहान होतों; पण मामा पिंपुटकरांची येण्याजाण्याची माझ्याहि मनाला ओढ असायची!

कधी मला ते एखाद्या दुध्या पेन्सिलीचा तुकडा देत–कधी माझ्या थोरल्या बहिणीला सागरगोटे खेळायला आणून देत.

लहान मुलांना आपण जसे खेळविण्याकरिता ‘ उंच ’ धरतों आणि त्यांच्याकडे पाहून हसतों, त्याप्रमाणे ते प्रत्येक माणसाच्या भविष्याबद्दल नेहमी ‘ उंचावरून ’ बोलत!

माझ्या बहिणीबद्दल ते म्हणायचे, “ काय बाईसाहेब–उद्या मोठ्या झालांत की मोठ्या घरीं पडाल–तुमचें सत्तेचें घर असेल–दाराशीं गाईगुरें असतील–अंगावर सोन्यामोत्याचे दागिने असतील–त्यावेळीं मी म्हातारा झालेलों असेन–त्यावेळीं मी तुमच्या दाराशीं येईन–तेव्हा ओळखाल ना मला?–उन्हाचा आलों तर पाणी तरी द्याल ना प्यायला? ” आणि मग केवढ्यांदा तरी मनमोकळें हसत.

ती माझी थोरली बहीण मामा पिंपुटकर म्हातारे व्हायच्या आंतच फार मोठ्या घरीं निघून गेली!

माझ्याबद्दलहि ते असेंच कांहीतरी ‘ उंचावरचें ’ बोलत. तें आता माझ्या लक्षांत नाही–पण मामा पिंपुटकर माझ्या अजून लक्षांत आहेत–पण तेहि आता मोठ्या घरीं गेले आहेत!

[library stamp]

वयाच्या तिसाव्या वर्षींच मामांची पत्नी त्यांना सोडून गेली. त्यांना फक्त एक मुलगा होता. मामांनी पुन्हा लग्न केलं नाही. ते नोकरीवर होते तोपर्यंत आपल्या मुलाला 'या घरीं ठेव, त्या घरीं ठेव' असें करीत त्यांनी आपल्या मुलाची जोपासना केली.

मामांचे नातेवाईक कोण आणि किती होते हें मला माहीत नाही—पण आपल्या गोड वागणुकीने त्यांनी अनेक नातेवाईक निर्माण करून ठेवले होते.

पुढे मामा पेन्शनींत निघाले. मग ते आपल्या मुलाला घेऊन एका गावीं राहिले. मुलगा मॅट्रिक झाला. मुलाला त्यांनी कॉलेजमध्ये घातलें आणि कॉलेज 'हॉस्टेल' मध्येच त्याच्या राहण्याची सोय केली. आणि आपण पुन्हा फिरतीचें आयुष्य पत्करलें. आज या गावीं—उद्या त्या गावीं. या गावच्या कांही दुर्मिळ वस्तू त्या गावीं नेऊन विकाव्या—कुणाचीं कांही कामें करावीं. कुणाच्या माहेरवाशिणीला परगावीं सासरीं पोचवायचें असेल—अन् सोबत नसेल—तर मामा केव्हाहि तयार!

अशा तऱ्हेने आयुष्य-अखेरपर्यंत मामांनी पोस्टमनचेंच काम केलें. 'प्रामाणिकपणा' हें त्यांचें भांडवल—मामांनी कोणच्याहि गावीं कधी खाणावळींत जेवण्याचा प्रसंग आला नाही. दरगावीं त्यांची आपुलकी कुठे तरी गुंतलेली असेच. बरं, एखाद्या घरीं ते उतरले तरी कुणाला कधी जड वाटायचे नाहीत.

सकाळीं उठल्याबरोबर त्या घरची मंडई आणून देतील-घरांत लहान मुलें असलीं तर त्यांना संध्याकाळीं 'रामरक्षा' म्हणायला शिकवतील. मामा पोस्टमन होते तरी त्यांचें पाठांतर जबर होतें. कधी मुलांमुलींशीं कवितेच्या भेंड्या लावीत बसतील, तर कधी घरमालकिणीला म्हणतील, "हें काय, अजून या वर्षांचें आंब्याचें लोणचें घातलें नाही! मी उद्या बाजारांतून छानदार—दळदार कैऱ्या आणून देतों——" लगेच दुसऱ्या दिवशीं सकाळीं कैऱ्या आणून देतील. आणि दुपारीं दुसऱ्या गावीं निघून चालायला लागतील आणि जातांना हसत म्हणतील, "तुमच्या इथलं लोणचं छान असतं—माझ्याकरिता राखून ठेवा हो थोडं! मी येईन पुन्हा केव्हा तरी लोणचं खायला!"

"अरे, तुम्ही कामाचीं माणसं. कुठे कुठे लक्ष द्याल! हें पाहा, या

कपाटामागे किती केर पडला आहे—" आणि लगेच ते केर काढायला लागतील. जातांना हसत हसत घरांत चार सुधारणा सुचवितील. "हें कपाट इथल्यापेक्षा तिथं ठेवलं तर चांगलं दिसेल नाही?"

प्रत्येक गावांत मामांच्या ओळखी खूप. कुणाच्या घरचीं तुळशीचीं रोपं कुणाच्या तरी घरीं आणून लावतील—कुठं अंगणांत मोगऱ्याचं रोप आणून लावतील आणि जातांना हसत म्हणतील, "या तुळशी—हा मोगरा माझा आहे हं! मी वाटेल तेव्हा याच्या तुळशी आणि मोगऱ्याचीं फुलं हक्कानं नेत जाईन!"

आणि हसत हसत अंगावरचें उपरणें झाडींत मामा पिंपुटकर पुढच्या गावीं चालू लागतील!

मामा कधींहि कोणाबद्दल वाईट बोललेले कोणीं ऐकलें नाही. कुणी साधें जरी म्हणालें, "त्यांना पत्ते खेळायचा किती नाद आहे?" तर मामा लगेच म्हणतील, "पण एरव्ही काम किती करतो? संसारांत त्याचें किती बारीक लक्ष आहे?" आणि हसतील. कोणत्याहि गोष्टीकडे—पानांकडे —फांद्यांकडे मामांचें नेहमी दुर्लक्ष—फक्त फुलांवर नजर! त्यांचेंच वर्णन.

मामांच्या मुलाचें कॉलेजचें शिक्षण संपलें आणि मामांच्याच ओळखी-मुळे त्याला चांगली नोकरी लागली. मामांनी त्याचें बिऱ्हाड थाटून दिलें. जवळ काय होतें नव्हतें तें त्याच्या स्वाधीन केलें.

एकाने थट्टेने मामांना म्हटलें, "मामा, आणि समजा, मुलाने पुढे तुम्हांला विचारलें नाही तर?"

मामा हसत म्हणाले, "छे! असं व्हायचं नाही. माझा बाळू मला विचारणार नाही? आणि मी कुणावर अवलंबून आहे? माझं पेन्शन मला पुरेंसें आहे की! परमेश्वराने शेवटपर्यंत माझे हातपाय फक्त धड ठेवावेत; मग मला काय कमी आहे?"

आणि मामांचें शरीर वाळलेल्या खारकेसारखें तयार होत होतें.— आयुष्यांत आळस त्यांना कधी भेटलाच नाही!

आणि एक दिवस प्रवासांत असतांनाच त्यांच्या मुलाचें त्यांना पत्र आलें. एका श्रीमंताच्या मुलीशीं त्याचा प्रेमविवाह जमला होता. मुलाने आडपडद्याने लिहिलें होतें व मामांची संमति मागितली होती.

मामांनी लगेच उलट टपालीं संमति पाठविली. पण मुलाच्या लग्नाला ते हजर राहिले नाहीत. मुलाच्या लग्नाच्या दिवशीं ज्या गावीं, ज्या घरीं ते होते, तिथेच त्यांनी 'गोड' करून खाल्लें आणि हसत म्हणाले, "बाळू आता मोठा झाला. त्याला मोठ्याची मुलगी मिळाली. त्याच्यांत सासऱ्याला कोणी नाही. त्याची इस्टेट बाळूलाच मिळणार. मी कशाला जाऊं तिथे— त्यांच्या मोठमोठ्या ओळखी असणार—मी कशाला व्याही म्हणून जाऊं तिथे —मी आहे पोस्टमन! पण आमच्या बाळूच्या कधी असं मनांत येत नाही हं—बाळू—नव्हे आता त्याला बाळासाहेब म्हणायला पाहिजे!—अनायासे शेवटच्याच मूहूर्तावर लग्न ठरलें आहे—शेवटचाच मूहूर्त हे माझ्या फायद्यावर पडलें—मी बाळूला—आमच्या बाळासाहेबांना लिहीन—लग्न आनंदाने करून घे—माझी तब्येत सध्या थोडी बरी नाही—पण काळजीचें कारण नाही—लग्न लांबवूं नकोस आणि मी येथे गुरुचरित्राचे सप्ते करायला सुरुवात केली आहे—ते टाकून मधेच कसा येऊं? आणि लग्नांत फोटो काढालच—तेव्हा सुनबाईंचा आणि तुझा काढलेला फोटो मला पाठव—माझे गुरुचरित्राचे सप्ते संपले, की मी लगेच तुमचा सुखी संसार पाहायला येतों—"

आणि त्यांच्या मुलाचें लग्न झालें. त्यांचा मुलगा बाळू—आता बाळासाहेब —मनाने चांगला होता. त्याला आपल्या वडिलांबद्दल कमालीचा आदर होता. पण 'सहवास प्रेम' फारसें नव्हतें. मामांनी आपला सहवास त्याला फारसा लाभूच दिला नव्हता. लांबून लांबून बाळूच्या आयुष्यावर त्यांची पाळत आणि देखरेख होती.

मामांचीं आपल्या मुलाला पत्रें जात. तीं मात्र बाळासाहेबांनी जपून ठेवलीं होतीं. थोडें चेष्टेने लिहायचें झालें तर बाळासाहेबांचें आपल्या वडिलांपेक्षा वडिलांच्या 'पत्रांवर' फार प्रेम होतें!

लग्नमुहूर्तावर मामांनी आपल्या मुलाला एक लांबलचक उपदेशपर पत्र धाडलें होतें. आणि वेळेवर पोहोचणारी तार केली होती. आणि लग्नघटी झाली त्यावेळीं मामांनी 'शुभेच्छापूर्वक' जिथे होते तिथेच टाळ्या वाजवल्या होत्या! आणि हसत म्हणाले होते, "चला, बाळूचें लग्न झालें! छान झालें. मी डोळे मिटले आणि सर्व लग्नसोहळा मला पाहायला मिळाला!"

आणि नंतर दीड महिन्यांनी मामा आपल्या मुलाचा संसार पाहण्या-

करिता मुलाच्या बिऱ्हाडीं आले. घराचें दार बंद होतें. त्यावर हाताने आवाज काढीत मामा हसत म्हणाले, " बाळू-मी आलों आहे-येऊं का रे ? "

लगेच दार उघडलें गेलें.

बाळूने आणि त्याच्या पत्नीने मामांचें सहर्ष स्वागत केलें. ' सूनबाई-" सुनेच्या हातावर पेढे ठेवीत मामा म्हणाले, " यांतला एक तूं घे-आणि एक बाळूला दे-" आणि मुलाकडे पाहत मामा म्हणाले, " बाळू-तूं आता आमचा बाळासाहेब हं--हं. ही माझी छत्री आता कुठे ठेवूं ? तुमच्या संसाराची मांडणी निराळी दिसते आहे ? "

" चहा करतें हं !— " सूनबाईने नमस्कार करीत म्हटलें.

" मी चहा घेत नाही— "

मामांनी गार पाण्याने आंघोळ केली — गडी धोतर धुवायला नेण्याकरिता आला — पण मामांनी सांगितलें- " अरे- साहेब लोकांनी कपडे धुवायला टाकायचे असतात- मी टाकतों माझें धोतर धुऊन— "

जेवणाची वेळ झाली.

मामा आनंदाने खुलले होते.

जेवणाचीं ताटें टेबलावर वाढलीं होतीं.

तेवढें मात्र मामांना चमत्कारिक वाटलें !

" अरे, टेबलावर जेवतां यायचं नाही मला बाळू-नव्हे बाळासाहेब- माझा पाट कुठे आहे ? माझें खाली पान वाढा-आणि तुम्ही घ्या जेवून- माझी अजून संध्या वगैरे व्हावयाची आहे ! "

आणि पुढेसुद्धा मामांच्या स्वभावांत कांहीच फरक पडला नाही. ते नेहमी-प्रवासांतच असत. मधून मधून मुलाकडे जात. त्यांची तब्येत होती तशीच ठणठणीत होती ! मामा नंतर पुष्कळ वर्षे जगले. त्यांनी नातवंडें पाहिलीं; पण त्यांनी आपलें प्रवासी आयुष्य शेवटपर्यंत सोडलें नाही !

शेवटीं ते आमच्या घरीं आलेले जे मला आठवतात-ते असे—

" रखमाई, मी आज जेवायला आलों आहे ग-आहे ना सोय— " मामांनी हसत हसत माझ्या आईला म्हटलें.

त्यावेळीं मामांचा मुक्काम दोन दिवस आमच्याकडे होता.

सगळ्या जुन्या ओळखीच्या माणसांचे इतिहास एकमेकांनी एकमेकांना सांगून झाले. कुणाकुणाचें काय चांगलें झालें आहे तें मामांनी सांगितलें.

" पण मामा, सूनबाई नीट वागते ना ? नातवंडांचा लळा नाही का लागत तुम्हांला ? बाळू अजून कसा तुम्हांला असें फिरतें आयुष्य घालवूं देतो ? "

" वा...वा ! माझीं नातवंडें खूप हुशार आणि देखणीं आहेत.सून–बाईहि फार हुशार आणि प्रेमळ; पण मला हेंच आयुष्य आवडतें ! कुठेहि लहान पोर पाहिलें की, मला तें माझ्या नातवंडांसारखेंच वाटतें ! बाळूला आता पगारहि खूप वाढला आहे–पण रखमाई फार चांगलें चालायला लागलें की, टेबलावर जेवायला लागतें म्हणतात. आमचे बाळासाहेब आणि सूनबाई टेबलावर जेवतात–पण मला नाही जमत तें–माझा पाट बाळा-साहेबांनी अजून जपून ठेवला आहे. मी घरीं गेलों की, खाली जमिनीवर पाट मांडून जेवायला बसतों–सोवळं ओवळं कुठे टिकलं आहे जगांत आता तर बाळूच्या घरीं तरी टिकणार ? पण मी धाबळी नेसूनच जेवायला बसतों ! अग, सोवळं ओवळं हें आपल्या मनाच्या समाधानाकरिता असतं–दुसऱ्याच्या नव्हे ! "

आणि त्यावेळीं–प्रसंगाप्रसंगाने व बोलण्याच्या ओघांत " आमचा बाळू टेबलावर जेवतो " हें सात-आठ वेळा तरी मामांच्या तोंडून मीं ऐकलें. उभ्या आयुष्यांत मामांना एवढीच गोष्ट लागली होती.

त्याबद्दलहि त्यांनी तक्रार केली नव्हती. टेबलावर बसून जेवण्याचें ते वर्णनच करीत–पण आपला बाळू ' टेबलावर ' जेवतो याचा त्यांना मनापासून विशाद वाटत होता हें स्वच्छ दिसत होतें.

मला आश्चर्य वाटलें–एवढ्या वैराग्यशील आणि सांसारिक ' साधु-पुरुषाला ' हें एवढें लहानसेंच कां झोंबावें ?

—पण तें झोंबलें होतें–मामांनी तें पचविलें होतें–पण त्यांच्या ओळखीचीं सर्व माणसें हसत हसत एकमेकांना विचारतात, " का हो, परवा मामा आले होते, तेव्हा त्यांनी आपला बाळू ' टेबलावर ' जेवतो हें सांगितलें की नाही ? "

कुठेहि आणि केव्हाहि मामा जिथे असतील तिथे बोलण्याच्या ओघांत एकदा तरी कुणाला तरी ते सांगतात,

“ आमचा बाळू आणि सूनबाई टेबलावर जेवतात. हं–असं चालायचंच! तो आता मोठा साहेब झाला आहे–चार मोठीं माणसें त्याच्याकडे येणार, तेव्हा टेबलावर जेवायला नको का ? ”

आणि माझ्या दृष्टीने ‘ मामा ’ हें साध्या आयुष्यांतलें एक फार मोठें जीवन होतें !

आणि असे हे सत्यसृष्टींत एकदा जगून गेलेले मामा स्वप्नसृष्टींत कसे जमा झाले ?

आपल्या मुलाच्या घरीं !

त्यांच्या सुनेने त्यांचा पाट मांडला होता. पुढे जेवणाचें ताट ठेवलेलें होतें. सून प्रेमळपणाने पान वाढण्याकरिता उभी होती.

मामा पाटावर बसलेले होते. त्यांच्या हातांत जपाची माळ होती. डोळे मिटलेले होते. आणि पाहतां पाहतां मामांच्या हातांतून जपाची माळ खाली पडली–आणि मामांनी आपली मान मागच्या भिंतीवर टेकली !

आणि एका क्षणांत मामांच्या सुनेच्या आणि मुलाच्या लक्षांत आलें–सत्यसृष्टीची स्वप्नसृष्टि झाली आहे म्हणून !

—मामा पिंपुटकर !

● ● ●

## सात

त्या गृहस्थाकडे पाहिलें की, मला अजूनहि गंमत वाटते. तो गृहस्थ मला नेहमीच भेटतो असें नाही. भेटतो केव्हा केव्हा. पण फार दिवसांत जर तो मला भेटला नाही तर मला त्याच्या भेटीची हुरहूर लागते आणि मग मी वेळांत वेळ काढून त्याच्याकडे जाऊन तास दोन तास यथेच्छ गप्पा मारून, चहा पिऊन, ताजातवाना होऊन येतों.

पूर्वी तो आणि मी स्नेही होतों. आजहि आहोंत. निदान मी तरी त्याला स्नेही समजतों. पूर्वी चार-आठ दिवसांनी आम्ही एकमेकांना भेटत असूं. चार-आठ दिवसांत रस्त्यांत जर आमची एकमेकांची गाठ पडली नाही, तर अगत्याने तो तरी माझ्या घरीं येई अगर मी तरी त्याच्याकडे जाई. आमच्या खूप गप्पा चालत.

त्या गृहस्थाचें नांव होतें नारायणराव.

त्याचें आडनांव—

पण छे ! तें सांगायचें नाही असें मी ठरविलें आहे. कारण त्याचें आडनांव जर मीं सांगितलें तर अनेकजण त्याला ओळखतील आणि मग कदाचित्—त्याला अलीकडे माझ्या घरीं येऊन मला भेटण्याची इच्छाच होत नाही—पण अजून मी त्याच्या घरीं गेलों तर तो मला आज जो

अगत्याने " ये–जा " करतो तेंहि नाहीसें होईल–आणि मला तसें व्हायला नको आहे !

नारायणरावांचा स्वभाव किती चांगला आहे ! तो मैत्रीला किती गोड आहे !

पण चार-पांच वर्षांपूर्वी काय झालें, मला नारायणराव रस्त्यांत भेटले. आम्ही मजेने रस्त्यांतच गप्पा मारीत उभे होतों. इतक्यांत माझे दुसरे एक मित्र, केळकर मला रस्त्यांत भेटले.

केळकरांनी मला नमस्कार केला. केळकर हे एक श्रीमंत गृहस्थ होते. वृत्तीचे उदार होते. केळकरांचं वडिलार्जितच इतकें होतें की, त्यांना चरितार्थाकरिता आयुष्यांत दुसरें कांही करण्याची गरज नव्हती आणि ते कांही करीतहि नसत !

केळकर आपलें आयुष्य हसत खेळत घालवीत होते !

मी केळकरांना एकदा हसत हसत विचारलें होतें,

" काय हो, या रिकाम्या आयुष्याचा कंटाळा येत नाही तुम्हाला ? कांही धंदा, नोकरी कां करीत नाही तुम्ही ? "

केळकरांनी हसत हसत उत्तर दिलें होतें,

" अहो, जगांत किती बेकारी आहे...आणि मला नोकरीची गरज नाही ! कुठे तरी नोकरी पत्करून कोणातरी एका रिकाम्या माणसाच्या पोटावर मी काय म्हणून पाय आणूं ?...हसतों–खेळतों वाचतों. मुलां-बाळांत रमतों ... व्याख्यानाला जातों. कुणी मदत मागायला आला तर शक्य ती मदत करतों !

कधी शेजारपाजारचीं मुलें गोळा करतों–त्यांचा माझ्या मुलांबरोबर अभ्यास घेतों–या आयुष्याचा थोडा कंटाळा आला कीं प्रवासाला जातों !

आयुष्याचा आंबा कुजणार नाही एवढी काळजी घेतों !

पुढचें पुढे पाहतां येईल–पण माझ्या आयुष्याची गोडी अद्याप कमी झाली नाही; आयुष्याचा कंटाळा आला नाही. कुणाबरोबर केव्हा तरी रघुवंश वाचतों. रामचरित परवा एकाला शिकविलें..."

असे होते केळकर. एक गमतीदार आयुष्य. त्यांनी अनेकांवर उपकार केले होते. पण केळकरांच्या तोंडून कधी ऐकायला यायचे नाहीत !

दुसऱ्या कुणींतरी सांगावें, "अहो, केळकरांनी माझ्या मुलाला फी दिली, म्हणून त्याचें शिक्षण पुरें झालें—" दुसरा म्हणे, "अहो, माझी मुलगी आजारांतून उठली म्हणजे काय—माझ्याजवळ कुठे पैसे होते औषधपाण्याला? पण ते केळकर आहेत ना ......" असें परस्पर ऐकायला येई.

असें केळकरांचें आयुष्य ऐकायलासुद्धा दुर्मिळ होतें!

आणि माझे मित्र नारायणराव हेहि कांही वाईट नव्हते. खूप शिकलेले. नामांकित पदवीधर. त्यांना चांगली मोठ्या पगाराची नोकरी आहे. चार मुलाबाळांचा संसार आहे. मिळविलेल्या विद्वत्तेकडेहि दुर्लक्ष नाही. पुस्तकांचा खूप षोक. दर महिन्याला कांहीतरी पुस्तकें विकत घेतीलच. त्यांची चैन म्हणजे कपड्यांची आणि पुस्तकांची!

कुणाच्याहि अंगांत नवीन तऱ्हेच्या कापडाचा कोट पाहिला की, नारायणरावांनीहि तसल्या कापडाचा कोट लगेच केलाच म्हणून समजावें. गरज असो–नसो.

बायकांना जसा पातळाचा षोक असतो तसा!

घरांत भाराभर कपडे असूं द्यात. त्यांना केव्हा लहर येईल आणि नारायणराव नवीन कपडे करतील याचा नियम नाही!

पुस्तकांचेंहि तसेंच...आज हजारबाराशेच्या किंमतीची पुस्तकांची त्यांची स्वतःची लायब्ररी आहे!

खाण्याचेंहि तसेंच...दर आठवड्याला त्यांच्याकडे कधी श्रीखंड, कधी बासुंदी–कांहीतरी पक्वान्न व्हायचेंच!

मी विचार करी, कितीहि पगार मिळत असला तरी त्यांना हें परवडतें कसें? नारायणरावांनी आपल्या पुढील आयुष्याचा कांही विचार केला आहे का? पण अशा बाबतींत मी नारायणरावांशीं कधी बोलत नव्हतों—आणि त्याला त्यांची वागणूकच कारणीभूत होती!

कारण नारायणराव असा कपड्याचा षोक करीत म्हणून त्यांच्या मुला-बाळांच्याहि कपड्यांची चंगळ होती असें नाही!

मुलांचे कपडे अगदी साधे. तीं मुलें आणि हे वडील नारायणराव—एकदम पाहायला मिळाले तर कपड्यांवरून हीं नारायणरावांचीं मुलें

अनुक्रम ३०३०९ दि:

आहेत असें कुणालासुद्धा वाटायचें नाही !

कुणालाहि वाटेल हीं मुलें नारायणरावांचीं नाहीत—आहेत कुणातरी गरिबाचीं—नारायणरावांनी विद्येकरिता सांभाळलेलीं—मधुकरी-वारकरी !

आणि नारायणरावांच्या बायकोकडे पाहिलें तर वाटेल ही नारायणरावांच्या घरांतील स्वैंपाकाची बाई आहे ! स्वतःशिवाय नारायणरावांनी कोणाचेहि कपड्यालत्त्याचे लाड केले नाहीत !

नारायणराव बाहेर बोलके—घरांत अबोल. नारायणरावांचीं मुलेंबाळें कधी त्यांच्याशीं लाडीगोडीने बोलतांना दिसलीं नाहीत. बायकोहि तशीच. घरांत कुणाला कांही कमी नव्हतें—पण घरांत मोकळेपणा नव्हता !

जणूं नारायणराव हे त्या घराचे 'साहेब' आहेत आणि घरांतील मंडळी नारायणरावांच्या हाताखालील नोकरवर्ग आहे !

सर्व चैन नारायणरावांची—आणि त्यांतून जें उरेल—गळेल तें घरांतल्या माणसांचें.

पण हें सर्व माझ्या मनाला बोचत असूनसुद्धा—आणि नारायणरावांच्या आणि माझ्या स्वभावांत खूप फरक असूनसुद्धा—मला नारायणरावांच्या मैत्रीचा लोभ होता. नारायणरावांच्या बोलण्यांत नेहमी एक बोचक खुमारी होती किंवा असें म्हणा ना, नारायणरावांच्या बोलण्यांतील बोचक खुमारीवरच मी खूष होतों—लुब्ध होतों. तें खोचक बोलणें ऐकायला मिळावें म्हणूनच मी नारायणरावांची मैत्री टिकविली होती !

—आणि आज गेलीं चार-पांच वर्षें नारायणराव मला मोकळ्या मनाने भेटत नव्हते. मीच चार-सहा महिन्यांनी त्यांच्याकडे लोचटासारखा जायचा; नारायणरावांना अळेंबळें बोलवायला लावायचा ! नारायणराव माझ्याशीं बोलणें लौकर संपविण्याचा प्रयत्न करीत—पण मीच दाद देत नसे.

पण अलीकडे अलीकडे एक गोष्ट माझ्या लक्षांत आली होती. मी कधी नारायणरावांकडे गेलों, की बोलतां बोलतां नारायणराव मला एकदा तरी विचारीत, " काय, केळकरसाहेब केव्हा भेटले होते? फार चांगला आणि सज्जन माणूस आहे, नाही ? "

मग मीहि केळकरांची स्तुति करायचा. केळकरांच्या स्तुतींत नारायणराव मनमोकळेपणाने भर घालायचे.

पण या बोलण्यावरून माझ्या लक्षांत आलें की, केळकरांविषयी नारायणरावांच्या मनांत कुठे तरी बोच आहे !

आणि मग एक दिवस मी केळकरांना माझ्या घरीं चहाला मुद्दाम बोलाविलें आणि नारायणरावांनाहि बोलाविलें.

केळकर ठरल्या वेळीं आले. पण चार बोलावणीं पाठवूनहि नारायणराव आले नाहीत. पहिल्यांदा मला वाटलें, हें सहज झालें असेल; पण नंतर चारपांच वेळां प्रयत्न करूनहि असेंच झालें.

मग एक दिवस मी केळकरांनाच विचारलें, " नारायणरावांचें आणि तुझें कांही वाकडें आहे का ? "

पण केळकर आश्चर्यानें आणि प्रसन्नपणानें म्हणाले, " छे ! त्यांचें-माझें वाकडें असायचें काय कारण ? नारायणराव किती हुशार आणि चांगला आहे ! "

मग एक दिवस मी नारायणरावांनाहि तेंच विचारलें. पण त्यांनीहि तसेंच उत्तर दिलें !

" मग केळकरांचें आणि तुमचें जर कांही वाकडें नाही तर चार-पांच वेळां केळकर माझ्याकडे आलेले असतांना—मीं तुम्हांला चहाला बोलाविलें होतें तर तुम्हीं कां आला नाहीत ? "

" अहो, त्या त्या वेळीं मला अचानक कामें निघालीं ! " नारायणराव गंभीरपणानें म्हणाले.

" मग आता तुम्हांला केव्हा वेळ आहे ? "

" केव्हाहि ! " नारायणरावांनी बेफिकीरपणानें उत्तर दिलें.

" असें अधांतरी नको—नक्की दिवस आणि वेळ सांगा ! "

माझ्या या प्रश्नानें नारायणराव कावरेबावरे झाले. पण माझ्यापासून तें लपविण्याचा प्रयत्न करीत नारायणराव म्हणाले, "येत्या रविवारीं सकाळीं आठ वाजतां—"

" ठीक आहे ! " मी शांतपणानें म्हणालों. " येत्या रविवारीं सकाळीं आठ वाजता मी आणि केळकर तुमच्याकडे चहाला येतों ! "

" या— या— जरूर या— म्हणजे तरी तुमची खात्री पटेल की, केळकरांचें आणि माझें कांही वाकडें नाही ! येत्या रविवारीं...बरोबर

आठ वाजतां या हं– मी वाट पाहतों...'' आणि भाषण तसेंच अर्धवट सोडून नारायणराव चालूं लागले.

मी त्यांच्या जाण्याकडे पाहतच राहिलों.

आणि माझ्या कल्पनेप्रमाणेच झालें.

शनिवारीं रात्रीं माझ्या घरीं नारायणरावांच्या मुलाबरोबर निरोप आला, '' अचानक कांहीं कारणाकरिता मी गावीं जात आहे, तरी आपण उद्या सकाळीं माझ्याकडे चहाला येऊं नये. पुन्हा केव्हा यायचें तें मी परत आल्यावर कळवीन ! ''

मी शांतपणाने तो निरोप ऐकून घेतला. माझी खात्री होती, नारायणराव गावाला गेलेले नाहीत. पण त्यांना केळकरांना टाळावयाचें आहे !

कां ?

मी केळकरांना, '' आज नारायणराव गावाला गेले आहेत '' असा निरोप पाठविला आणि नारायणरावांच्या घरीं एकटाच गेलों. माझ्या कल्पनेप्रमाणे नारायणराव गावाला न जातां घरींच होते. नारायणराव आठ वाजतां कुठे तरी बाहेर निघून जातील या कल्पनेनं मी सकाळीं सातलाच त्यांच्या घरीं गेलों.

नारायणराव घराबाहेर पडण्याच्या तयारींत होते.

'' मी आलों आहे— '' मी बाहेरूनच आरोळी दिली आणि घरांत शिरलों आणि शांतपणाने एका खुर्चीवर बसलों.

नारायणराव माझ्याकडे पाहतच राहिले. माझ्याशीं एक शब्दहि बोलण्याचा त्यांनी प्रयत्न केला नाही !

माझ्या समोरच्याच खुर्चीवर एक सिगारेट ओढीत नारायणराव शांतपणानं बसून राहिले.

अर्ध्या तासाने ती स्तब्धता नारायणरावांनाच असह्य झाली. रडवेल्या आवाजाने नारायणराव म्हणाले, '' कां असें माझ्या मागे लागला आहांत ? माझ्याबद्दल केळकरांनी तुम्हांला कांही सांगितलें नाही ? ''

'' नारायणराव फार चांगले आणि हुशार आहेत; एवढेंच त्यांनी मला सांगितलें आहे ! ''

" आणखी कांही नाही ? " नारायणरावांनी मला खोचून विचारलें.

" कांही नाही ! " मीं शांतपणाने उत्तर दिलें.

" आणि जोशीबुवा, हेंच मला डाचतें आहे ! " नारायणरावांच्या डोळ्यांत अश्रू आले. " थांबा, चहा सांगतों अगोदर. " नारायणराव केविलवाणेपणाने म्हणाले.

मी शांत होतों. नारायणराव घरांत चहा सांगून आले आणि पुन्हा माझ्यासमोरच्या खुर्चीवर शांत बसले.

कांही वेळाने घरांतून चहा आला. आम्ही दोघांनीहि अबोलपणानेच चहा घेतला.

नारायणरावांनी नंतर एक मोठा उसासा टाकून बोलायला सुरुवात केली. " जोशीबुवा, मी माझ्या विद्यार्थिदशेंत केळकरांच्याकडे अनेक वर्षे वारकरी म्हणून जेवलों आहे ! मला त्यांनी फार चांगलें वागवलें. माझें शिक्षण सगळें वारावरच झालें आहे !...अंगांत धड कपडे नाहीत. शाळेचीं पुरीं पुस्तकें नाहीत...जेवायची सोय नाही. केळकरांच्या घरच्या माणसांनी मला कपडे दिले आहेत–पुस्तकें दिलीं आहेत–जेवायला घातलें आहे...आता मी चांगले कपडे करतों–पण हे भारी कपडे घालून मी हिंडत असतांना केळकर जर मला रस्त्यांत भेटले तर मला लाज वाटते... मी त्यांचे उपकार घेतले आहेत. ते उपकार फेडून टाकावेत अशी मला इच्छा आहें–पण ते फेडणार कसे ? त्यांना काय कमी आहे ? केळकर मला दिसले की, माझें मिंधेपण माझ्या डोळ्यांपुढे उभें राहतें–त्यांच्या डोळ्याला मी डोळा देऊं शकत नाही !......

...केळकर दिसले की, मी अद्याप वारकरी आहे असेंच मला वाटतें !" नारायणरावांना आपले अश्रू आवरत नव्हते !

" मोठे विचित्रच आहांत तुम्ही ! घरच्या गरिबीने लहानपणीं काय तुम्ही एकटेच वाराने जेवले आहांत ? अशीं कितीतरी आयुष्यें आहेत ! आणि तुम्हांला जर अद्याप त्यांचा मिंधेपणाच वाटत असेल, तर आता तुमची स्थिति चांगली आहे—तुम्ही दोन विद्यार्थ्यांना मदत करा–दोन वारकरी जेवायला ठेवा ! आणि आपल्या मनाचा मिंधेपणा फेडून टाका ! " मी आवेगाने सांगितलें.

"जोशीबुवा, हें माझ्याहि मनांत वारंवार येतें आणि माझ्या मनाला पटतेंहि–पण मनाचा धीर होत नाही! अजून मला वाटतें, मलाच आयुष्यांत कांहीतरी कमी पडणार आहे!...सध्या मला कांही कमी नाही...पण लहानपणची कपड्यांची–अन्नाची–पुस्तकांची माझी भूक अजून शमलेली नाही! ...मी कपड्यांत किती पैसे घालवतों——पुस्तकें विकत घेण्यांत किती पैसे घालवतों? दर आठ दिवसाला घरांत कांहीतरी पक्कान्न करून खातों; पण अद्याप माझ्या त्या सर्व भुका निवलेल्या नाहीत! अद्याप त्या सर्व भुकांची वखवख कायम आहे!

..आणि मनांतला एक दंश सांगतों– विचित्र वाटेल तुम्हांला तें ऐकून –पण वाटतें, केळकर कधी तरी अडचणींत यावेत...आणि मला त्यांच्या उपकारांची फेड करायची संधि देवाने द्यावी...पण या जन्मांत तें शक्य नाही! आणि हें झाल्याशिवाय माझ्या मनाचा मिंधेपणा कधी संपणार नाही! आणि तें या जन्मांत होईल असें मला वाटत नाही!···

.. जोशीबुवा, असा मी मनाचा पाजी आहे! हें सगळें वाईट आहे हें मलाहि पटतें...मला बुद्धि आहे– पण ती माझ्या मनाची समजूत घालूं शकत नाही! अरे, केळकरांशींच काय– मी माझ्या बायकोशीं–मुलां-बाळांशीं तरी कुठे नीट वागतों आहे? सगळी चैन माझी··· माझीं बायकामुलें दिलेल्या अन्नावर आणि कपड्यावर जगताहेत नुसतीं!··· आणि मला जास्त काय बोचतें आहे सांगूं का? केळकर-कुटुंब माझ्याशीं फार चांगलें वागलें...माझ्या परिस्थितीची त्यांनी मला कधीहि जाणीव दिली नाही...दर वेळेला मी तुम्हांला विचारीत होतों...केळकर माझ्या-बद्दल कांही बोलले का? ते बोलणार नाहीत ही माझी खात्री होती... पण मनाला वाटत होतें, त्यांनी बोलावें. पण ते कधीच बोलणार नाहीत. पण मी आज माझ्याच तोंडाने सांगतों आहे, केळकरांच्या घरचा मी वारकरी आहे! –मी त्यांचा मिंधा आहे– आणि हें मिंधेपण माझ्या आयुष्यांतून कधीच जायचें नाही!

——मी थोडा का प्रयत्न केला असेल, मनाचा हा मिंधेपणा घालवायचा! पण मला तें अद्याप जमलें नाही आणि या आयुष्यांत तें जमेलसें वाटत नाही! अहो, मी परीक्षा पास झालों–आनंदाने गावभर पेढे वाटले–पण

केळकरांच्या इथे इच्छा असून मला जाववलें नाही—मनाचा पळपुटेपणा सावरण्याकरिता तेव्हा मी ठरविलें—नोकरी मिळाल्यावर नोकरीचें पेढे द्यायला जाऊं. नंतर मला चांगली नोकरी लागली. मी चांगले कपडे केले. पेढ्यांचा पुडा घेऊन केळकरांच्या दाराशीं गेलों. आणि सहज माझें माझ्या कपड्यांकडे लक्ष गेलें आणि वाटलें, मी या घरचा वारकरी. मी असे कपडे घालून गेलों तर त्यांना काय वाटेल ? मी केळकरांच्या घरांत गेलों नाही —त्यांना माझ्या लग्नाला बोलाविलें नाही—आठवण होऊन. इच्छा असून माझ्या आयुष्यांत जेव्हा जेव्हा चांगली घडामोड होते तेव्हा तेव्हा— माझ्या अन्नदात्याची—केळकरकुटुंबाची आठवण होते. पण लगेच मनाचा मिंधेपणा उभा राहतो. मी त्यांना टाळतों—

मनाचा हा कोंडमारा टाळण्याकरिता मी एकदा परगावीं बदली करून घेण्याचासुद्धा प्रयत्न केला, पण जमलें नाही. केळकर फार चांगला माणूस आहे—पण मी वारकरी आहे !”

नारायणरावांचे हे उद्गार ऐकून मलाहि कांही बोलतां येईना. मी कुठेतरी पाहायचें म्हणून रस्त्यावर पाहूं लागलों.

रस्त्यावर एक कुत्रा आपल्या शेपटीवर बसलेली गोचीड धरण्याकरिता आपली शेपटी चावण्याचा प्रयत्न करीत होता. ती शेपूट त्या कुत्र्याच्या तोंडांत येत नव्हती. कुत्र्याचा प्रयत्न चालू होता आणि या प्रयत्नांत तें कुत्रें आपल्याभोंवतींच गरगर फिरत होतें !

● ● ●

# आठ

पुष्कळ वेळेला असें होतें की, साध्या गोष्टीहि आपल्या लक्षांत राहत नाहीत! मग पुढे केव्हा तरी त्या साध्या गोष्टीलाच महत्त्व येतें आणि मग ती आठविण्याचा आपण प्रयत्न करतों—आणि ती आठवतां आठवत नाही. आपल्या डोक्याला गमतीदार त्रास होतो आणि जी गोष्ट आठवण्याचा आपण प्रयत्न करीत असतों ती सोडून अनेक अवांतर गोष्टी आपल्याला आठवतात—मग त्याच वेळीं एक गोष्ट आपल्या मनाला पटून जाते की, आपण आपली दिनचर्या लिहून ठेवली असती तर ?—

मग पुढे जरी दिनचर्या लिहून ठेवण्याचा आपण मनाशीं निश्चय करतों-तरीहि जी गोष्ट आपण आठविण्याचा प्रयत्न करीत असतो ती तर आपल्याला आठवतच नाही—आणि आपला मानसिक पराभव कबूल करून आपण आपल्या नेहमीच्या उद्योगाला लागतों !

आपली अनेकांशीं ओळख असते—मैत्री असते—पण त्या मैत्रीला सुरुवात कशी झाली ? आपली पहिली भेट केव्हा झाली ? कांही लक्षांत राहत नाही. कारण त्यांपैकी एखाद्याच मैत्रीला पुढे महत्त्व येईल हें त्या वेळीं आपल्या लक्षांत येत नाही—आणि मग अशा एखाद्याच मैत्रीला महत्त्व आलें की, आपण त्या मैत्रीची सुरुवात आठवूं लागतों आणि मग आपली

आठवण आपल्याला दगा देते—आपण निराश होतों—दिनचर्या लिहायचें ठरवतों—आणि कधीच्च लिहीत नाही !

इतरांचें काय होतें कुणाला ठाऊक—पण माझें मात्र असें होतें. लेखन—प्रकाशनाच्या व्यवसायामुळे माझ्या अनेक लोकांशीं ओळखी झाल्या आहेत—कांहींचें मैत्रींत रूपांतर झालें आहे—पण आता जर मी कित्येकांच्या मैत्रीची सुरुवात आठवूं लागलों—तर, खरं म्हणजे मला कांही आठवत नाही !

आणि आज हें सर्व आठवायचें कारण म्हणजे माझा मित्र बापू पुरंदरे काल मला भेटला—त्यानें आपल्या घरीं मला चहाला बोलाविलें—आणि त्यावेळीं मला एवढेंच आठवलें की, आज दहा-पंधरा वर्षें याची माझी ओळख आहे—पण हा कधीं माझ्या घरीं आलेला आठवत नाही की मीहि कधी त्याच्या घरीं केव्हा गेल्याचें स्मरत नाही !

माझे अनेक स्नेही त्याचेहि स्नेही होते—त्यांच्या घरीं आमची गाठ पडे—खाणें, चहा वगैरे होई आणि अशा तऱ्हेनें आमचा स्नेह वाढत होता !

आणि आज मी त्याच्या घरीं गेलों. वेळ सकाळची नऊ-साडेनवाची होती. आम्ही दोघेहि त्याच्या घरीं गेलों. पण त्याच्या घराला कुलूप पाहून मला आश्चर्य वाटलें !

बापू पुरंदरेने शांतपणाने दार उघडलें आणि दार उघडतांच उदबत्त्यांच्या वासाचा खूप घमघमाट सुटला !

बाहेरची खोली बहुतेक बापू पुरंदऱ्याची बसायची खोली होती. टेबल-खुर्च्या—त्याच्या आवडत्या पुस्तकांचें कपाट सर्व व्यवस्थित होतें. टेबलावरच्च दोन उदबत्त्या जळत होत्या. मला वाटलें, आज गुरुवार आहे—दत्ताच्या तसबिरीसमोर—

मी खुर्चीवर बसलों—आणि आजूबाजूच्या भिंतींवर पाहूं लागलों—भिंतींवर कुणाचीच्च तसबीर नव्हती आणि टेबलावरच्च लावलेले दोन बायांचे फोटो होते. त्या फोटोंना हार घातलेले होते आणि दोन उदबत्त्या त्या फोटोंपुढेच्च जळत होत्या.

एक फोटो होता सत्तर-बहात्तर वर्षांच्या वृद्ध बाईचा आणि एक होता अठ्ठावीस-तीस वर्षांच्या बाईचा. वृद्ध बाईच्या कपाळीं कुंकू नव्हतें—अठ्ठावीस

तीस वर्षांच्या बाईच्या कपाळीं कुंकू होतें—तोंडावर हास्य होतें—अंगावर खूपच अलंकार होते.

मला अंदाज आला असतांनासुद्धा मीं कुतूहलाने बापू पुरंदऱ्यांना विचारलें, "कुणाचे हे फोटो?"

"एक माझ्या आईचा आणि एक माझ्या पत्नीचा!"

"म्हणजे दोघींपैकी आज कोणीच—" मीं वाक्य अर्धवट सोडलें.

"आज दोघीहि जिवंत नाहीत. आई गेल्याला पांच-सहा वर्षें झालीं—बायको मेल्याला वीस-बावीस वर्षें झालीं! आनंद आहे. सध्या माझा प्रपंच म्हणजे एकटा मी! हातांनीच करून खातों—आता पाहा फर्स्ट क्लास चहा करून देतों तुम्हाला—अगदी गोल्डन टी! आज आयुष्यांत पहिल्यांदा तुम्ही माझ्या घरीं येत आहांत—पण आज तुम्ही माझ्या हातचा चहा प्यायलांत की, सवडींत सवड काढून माझ्याकडे चहाला येत जाल तुम्ही!" बापू पुरंदऱ्यांनी अंगांतील कपडे काढून ठेवले आणि आंतल्या खोलींत जाऊन—स्टो पेटवायला सुरुवात केली.

स्टो पेटला.

स्टोचा 'फर्रर्र', 'फर्रर्र' असा आवाज होऊं लागला. मीहि आंतल्या खोलींत गेलों—किती व्यवस्था आणि टापटीप दिसली तिथे.

—पण त्या व्यवस्थितपणाचीहि मला चीड आली. घरांत माणसें नाहीत आणि व्यवस्थितपणा आहे—काय त्या व्यवस्थितपणाचें कौतुक? रिकाम्या घरांत दिवा तेवत असावा—काय त्या दिव्याचा आणि प्रकाशाचा उपयोग?

आणि चहा खरंच चांगला झाला होता. लक्षांत राहण्याइतका चांगला झाला होता—भोवतालची शांतता त्या चहाला—चहांत चवीकरिता मिठाचा खडा टाकावा—तशी एक निराळी चव आणीत होती.

आम्ही चहा घेत होतों त्या वेळीं तोहि बोलत नव्हता आणि मीहि बोलत नव्हतों. फक्त सभोवतालची शांतता बोलत होती आणि आम्ही दोघे ऐकत होतों. चहा झाला तरी बापू पुरंदऱ्यांनी अजून स्टो पेटलेलाच ठेवला होता. त्या स्टोचा आवाज त्या विचित्र शांततेला साथ करीत होता!

त्या उगाचच जळणाऱ्या स्टोकडे माझें लक्ष गेलें.

मीं विचारलें, "स्टो नाही विझवलांत?"

" राहीना का जळत–पुष्कळ वेळेला स्वैपाक झालेला असतो–मी वाढून घेतलेलें असतें आणि सोबतीकरिता मी स्टो जळत ठेवतों–तुम्हांला अनुभव नसेल–पण पेटत्या ' स्टो ' ची सुद्धा–रिकाम्या आणि एकाकी माणसाला सोबत होते ! "

माझें बापू पुरंदऱ्यांच्या बोलण्याकडे लक्ष नव्हतें. मी रिकाम्या डोळ्यांनी त्या खोलींतलीं भांडीं–खिडक्यांचे गज–जें नजरेंत येईल तें मोजीत होतों ! पांच-दहा माणसांचा संसार होईल एवढीं भांडींकुंडीं दिसत होतीं–पण माणसेंच कुठे होतीं ?

माझा चहा घेऊन झाला होता–बापू पुरंदऱ्यांनी राहिलेला सर्व चहा आपल्या बशींत ओतला. त्या चहांत आपलें छोटेसें दिसणारें प्रतिबिंबच ते पाहत बसले !

एकीकडे स्टो जळतच होता.

" जोशीबुवा, तुमचीं ' लक्षांत राहिलेलीं माणसें ' मीं वाचलीं. बरीं असतात. मी लक्षांत राहणारा नाही, पण माझें आयुष्य तसें आहे असें मला वाटतें. मलाहि आज लहर आली आहे–माझें आयुष्य तुम्हांला सांगण्याची. वाटल्यास लेखनाकरिता उपयोग करा–वाटल्यास नुसतेंच लक्षांत ठेवा–अगर विसरून जा ! "

बशींत ओतलेल्या चहांत स्वतःचें प्रतिबिंब पाहणें त्यांचें चालूच होतें. नव्हे, त्यांत ते रमले होते–किंवा कुणाला ठाऊक त्या प्रतिबिंबांत त्यांना त्यांचें पूर्वायुष्य दिसत असेल !

' स्टोचा ' आवाज चालूच होता–स्टो नुसताच जळत होता. विनाकारण पेटत राहणाऱ्या ' स्टोची ' उष्णता जाते कुठे ?

"माझ्या जन्मानंतर-दोन चार वर्षांतच माझे वडील वारले. मला भाऊ-बहीण कोणीच नव्हतें. जे मला मदत करतील असे नातेवाईकहि मला कोणी नव्हते. वडिलोपार्जित कांहीतरी होतें-काय होतें तें मला त्या वेळींहि कळलें नाही-आणि अजूनहि माहीत नाही. मी दिसायला देखणा होतों–अभ्यासांत हुशार होतों. माझी आई अत्यंत कष्टाळू आणि काटकसरी होती–वडिलार्जित जें कांही होतें नव्हतें तें विकून टाकून–तिने रोख रक्कम तयार केली आणि त्यांत आम्ही मायलेकरें दिवस काढीत होतों. माझें शिक्षण चालू होतें.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे



अनुक्रम ३६३०६ दि: ७१

वार्षिक परीक्षांत मला मिळणारे चढते वाढते "मार्क" पाहून तिला आनंद वाटे, आणि आयुष्यअखेरीस तरी आपण सुखाचे दिवस पाहूं असें माझ्या आईला खात्रीनें वाटूं लागलें !

आणि पुष्कळशीं माणसें मनोराज्यावरच जगतात ! व्यवहारांत जें होऊं शकत नाही—पण माणसाला व्हावेंसें वाटतें—तें केव्हा तरी होणार आहे.

व्हावें—होणारच—असें माणसाला वाटत असतें—माणसाचें मन त्या कल्पनेशीं खेळत असतें—तीं मनोराज्यें 'उद्यांची सत्यसृष्टि' आहे असा त्याला भ्रम निर्माण होतो आणि त्याची आजची वागणूक—त्या भावी भ्रमानें भारलेल्या मनस्थितींत होते. माझ्या आईच्या वागणुकीकडे पाहून असे विचार माझ्या मनांत येत होते. तिच्या मनांत अनेक मनोराज्यें फुलत होतीं—आणि त्या मनोराज्यांचीं काल्पनिक फुलें वेचीत तिचा आयुष्याचा प्रवास चालला होता.

मी एम्. ए. झालों. चार शिकवण्या वगैरे करून मी आता पैसे मिळवूं लागलों होतों. माझ्याहि मनांत माझ्या आयुष्याचीं कांही मनोराज्यें होतींच. आमचे दिवस मोठे आनंदाने चालले होते.

आणि एक दिवस मी संध्याकाळचा घरीं आलों. घरांत आईकडे तिच्या चार मैत्रिणी आल्या होत्या. एक श्रीमंत रावबहादुर होते. त्यांची मुलगी लग्नाची होती. तिच्या लग्नाचा विषय बोलण्यांत निघाला होता आणि आईने सहज थट्टेनेच म्हटलें, ' मग आमच्या बापूला देतील का ने आपली मुलगी ? '

मला तें ऐकून कसेसेंच वाटलें. मला माझ्या आईची ती मानसिक लाचारी वाटली आणि मनाला बरें वाटलें नाही.

आईच्या मैत्रिणी निघून गेल्या. आम्ही मायलेकरें बोलत बसलों. लग्नाचाच विषय निघाला. आई आज मोकळ्या मनाने माझ्या लग्नाचीं तिचीं मनोराज्यें मला ऐकवीत होती—मी ऐकत होतों. आईने बोलतां बोलतां हाताने कांही काम चालविलेंच होतें. ती कसल्या तरी मानसिक आनंदाने तर्रर झाली होती. खाली काढून घेतलेलें दुधाचें भांडें ती दुधाच्या फडताळांत ठेवीत होती आणि कधी नव्हे तें पहिल्यांदाच तिच्या हातून दुधाचें भांडें खाली पडलें—सर्व दूध सांडून गेलें !

आणि माझ्या मनाला मात्र तो अपशकून वाटला !

आईला कांहीच वाटलें नाही. ती म्हणाली, ' धरती मातेला तहान लागली वाटतें—दूध पिऊन आज ती तृप्त झाली ! '

आणि आईच्या मैत्रिणीच्या मध्यस्थीने ती रावबहादुरांचीच मुलगी मला सांगून आली. ते रावबहादुर खूप श्रीमंत होते. आम्ही त्यांच्या मानाने गरीब होतों. मला ती मुलगी नको होती. श्रीमंत आणि गरीब—या कल्पनेच्या द्वंद्वाकरिता नव्हे—त्यांच्या घरची राहणी—आमच्या घरची राहणी—सास्वा-सुना हें नातें—आईला या लग्नापासून सुख मिळणार नाही.

पण आईने आग्रह धरला. त्या आग्रहाला मी बळी पडलों. त्या रावबहादुरांच्या मुलीशींच माझें लग्न त्यांनी सालंकृत कन्यादान करून दिलें. मुलगी वाईट नव्हती. शिकलेली होती—चांगली होती.

पण त्या लग्नापासून कोणालाच सुख झालें नाही. आईचें आणि तिचे पटेना. मी कोणत्याच बाजूने बोलू शकत नव्हतों. मला आईला दुखवायचें नव्हतें—बायकोला दुखवायचें नव्हतें. कारण दोघींचीहि माझ्याशीं वागणूक चांगली होती.

पण दुर्दैवाची गोष्ट अशी की, क्षुल्लक कारणावरून त्या दोघींमध्ये जी मानसिक तेढ निर्माण झाली ती इतकी विकोपाला गेली की, त्या तेढीने माझ्या आयुष्याची धूळधाण झाली !

आम्ही तीनच जीव होतों- पण एकत्र सुखासमाधानाने नांदू शकलों नाही. मला चांगली नोकरी लागली, माझी सांपत्तिक परिस्थिति खूप सुधारली; पण उपयोग काय ?

आई म्हणे, माझे देवाने लौकर डोळे मिटावेत म्हणजे माझ्या मुलाला सुख लागेल.—बायकोहि तेंच म्हणे. मला कळेना, संसार कुणाचा आहे ? कोण कुणाकरिता जगतो आहे ? वितुष्ट कशाकरिता ? मी संसारांत बोलायचेंच सोडून दिलें.

—आणि मानसिक तापाने म्हणा—कशानेहि म्हणा—माझी बायको खंगत चालली-आणि एक दिवस तिने या जगांतून प्रयाण केलें !

—आई म्हणाली, ' दुसरें लग्न कर. '

मी म्हटलें, ' आई, मी दुसरें लग्न करीन—पण तुझ्या देखत नाही.

तुझें आणि माझ्या बायकोचें पटायचें नाही–आणि कुणालाच सुख होणार नाही !'

पुन्हा तिने माझ्या लग्नाचा विषय काढला नाही. आम्ही दोघे वरपांगी सुखाने जगत होतों- पण मनांत झुरत होतों–आणि माझ्या बायकोच्या मृत्यूनंतर सोळा वर्षांनी माझ्या आईने आपले डोळे मिटले.

माझ्या डोळ्यांपुढे अंधार निर्माण झाला !

आता का माझें लग्नाचें वय होतें ? नंतर मीं लग्न करावयाचें नाही असें ठरविलें. ठरवायला कशाला पाहिजे होतें ! आता मला कोण मुलगी देणार होतें ?

आता मी जगतों आहे ! माझ्या आईचें आणि बायकोचें एकमेकींचें अहिनकुलवत् वाकडें होतें. पण दोघींच्याबद्दलहि मला जिव्हाळा होता !

––आई म्हणून एखादी बाई–चांगली असेल–नव्हे नव्हे देवतेइतकी पूज्य आणि पवित्र असेल–पण सासू म्हणून ?

––पत्नी म्हणून एखादी बाई चांगली असेल–पण सून म्हणून ?

––माझ्या दृष्टीने दोघीहि चांगल्या होत्या. पण त्या चांगुलपणाचा उपयोग काय ? कुणाला आयुष्यांत सुख मिळालें ? प्रत्येकजण आपल्या दृष्टीने विचार करी...कारण नसतांना आमचीं तिघांचीं आयुष्यें भाजून निघालीं...सून इतकी वाईट असेल ? सासू इतकी वाईट असेल ?

––प्रत्येकीने आपली वागणूक सोडली नाही–अखेर दोघी दोन दिशांनी निघून गेल्या.

––आणि मी–मी-मी–मी––"

––ही हकीगत सांगेपर्यंत त्याचा चहा निवला होता–गारढोण झाला होता–खिन्न मनाने अश्रू ढाळीत तो थंड चहा पीत पीत बापू पुरंदरे मला म्हणाला, " जोशीबुवा, असा आहे माझा संसार !"

• • •

# नऊ

सुमारे पस्तीस वर्षांपूर्वीची एक आठवण माझ्या डोळ्यांपुढे उभी राहिली !

माझ्या एका मित्राची बहीण लग्नाची होती आणि त्याने मला एका स्थळाची चौकशी करायला सांगितलें. तें स्थळ नुकतेंच माझ्या माहितीचें झालें होतें.

" दत्तोपंत, आज मी आपल्याकडे एका निराळ्याच कामाकरिता आलों आहें— " मीं जरा गंभीरपणाचा आव आणीत विचारलें, " तुम्हांला लग्न कर्तव्य आहे काय ? "

उत्तर हशाच्या गडगडाटाने आलें. खिडकींतून वाकून खालच्या हॉटेलांत चहा सांगितला गेला. दत्तोपंतांनी एक विडी शिलगावली. टेबलावर आनंदाने आणि आश्चर्याने हात आपटीत आणि खुर्चीवर आरामशीर बसत दत्तोपंतांनी मला विचारलें, " कोणचा गाढव आपली मुलगी मला द्यायला तयार झाला आहे ? त्यापेक्षा मुलीला विहिरींत कां नाही लोटून देत ? " इतक्यांत चहा आला. " हं, चहा घ्या. "

मीं चहा घ्यायला सुरुवात केली.

दत्तोपंत फटकळ होते, हें मला माहीत होतें. पण या विषयावर ते असें बोलतील याची मला कल्पना नव्हती.

दत्तोपंतांचा चहा पिऊन झाला होता. बोटांनी टेबलावर कसल्या तरी

गाण्याचा ताल धरीत खुषींत येऊन दत्तोपंत बोलूं लागले, "माझं लग्न? मला काय वेडा समजतां की काय तुम्ही? कुणी सांगितलं माझं स्थळ तुम्हांला? जोशीबुवा, आज माझं वय बत्तीस वर्षांचं आहे. मला इथे तीस रुपये मिळतात. वाढून वाढले तर आयुष्याच्या शेवटीं पन्नास रुपये मिळतील. तेव्हा आयुष्याच्या शेवटीं चार पोरंबाळं फाटके कपडे घालून कडेवर घेऊन हिंडण्यापेक्षा, मी अविवाहित राहायचें ठरविलें आहे!" दत्तोपंतांनी पुन्हा एकदा चहा सांगितला आणि म्हटलें,

"पण जोशीबुवा आज माझ्या आयुष्यांतील आनंदाचा दिवस. मी लग्न करायचें नाही असें ठाम ठरविलें होतेंच. पण मला आजपर्यंत कोणी लग्न करतां का, असें विचारलें नव्हतें. तो मात्र मला अपमान वाटत होता. आज माझ्या मनाचें समाधान झालें. बस्स, आपल्याला लग्न-कर्तव्य नाही! मुलगी अगदी गरिबाची आहे म्हणतां? तिचें लग्न ठरवा. तिच्या लग्नाकरिता हा दत्तू फडके शक्य तर पांचपन्नास रुपयांची मदत करील!" दत्तोपंत खुषींत येऊन कसलेंतरी गाणें गुणगुणूं लागले.

दत्तोपंतांच्या पूर्वायुष्याची मला त्या वेळींहि कांही माहिती नव्हती आणि आजहि नाही. जी काय थोडी फार माहिती आहे ती अशी—दत्तो-पंतांना तसा जवळचा नातेवाईक कुणी नाही. लहानपण वर्तमानपत्रें—उजबत्त्या विकण्यांत गेलें. लिहिण्यावाचण्यापुरतें शिक्षण. पुढे शाहूनगरवासी नाटक मंडळींत—चित्ताकर्षक नाटक मंडळींत—आयुष्याचीं कांही वर्षें काढलीं. आजचे प्रसिद्ध नट 'दामूअण्णा मालवणकर' हे त्या वेळीं त्यांचे बरोबर होते. पुढे त्या आयुष्याचा दत्तोपंतांना वीट आला.

कांही तरी धंदा शिकायचा म्हणून ते 'ब्लॉकमेकिंगचा धंदा' पुण्याच्या सहस्रबुद्धे यांच्या बालोद्यान प्रेसमध्ये शिकले. त्यांत त्यांनी चांगलें कसब पैदा केलें. स्वतंत्र धंदा करायची इच्छा होती, पण भांडवल नव्हतें.

दत्तोपंत आपल्याकडे नोकरीला असावेत अशी अनेकांची इच्छा होती. दत्तोपंतांना प्रलोभन वाटावें अशी एका छापखानेवाल्याने त्यांना अट सांगितली, "नोकर म्हणून तुम्ही आमच्याकडे राहूंच नका. आम्हीं जो गिऱ्हाइकाकडून दर घेऊं त्याच्या इतका हिस्सा तुम्हाला देऊं. फूटतूट त्यांतून कापून घेऊं. काय, पसंत आहे तुम्हांला?"

दत्तोपंतांनी मिस्किलपणाने हसत उत्तर दिलें, “ पसंत आहे आपल्याला; पण सुरुवातीला भांडवल म्हणून थोडें पाहिजे--”

“काय--” मासा गळाला लागतो आहे या भावनेने छापखानेवाल्याने खूष होऊन विचारलें.

“ एक चौकोनी फडकें, एक ताट आणि एक वाटी ! म्हणजे चार घरें मधुकरी मागून पोट भरतां येईल आणि हौस म्हणून आपल्याकडे धंदा करतां येईल ! ”

पुढे मनुष्य कर्तबगार आणि नेकीचा आहे हें जाणून पुण्याच्या डेक्कन प्रिंटिंग प्रेसचे मालक कै. मामा गुद्रे यांनी दत्तोपंतांना ‘डेक्कन फोटो झिंको’ या नांवाने स्वतंत्र धंदा काढून दिला. दत्तोपंतांच्या आयुष्याला वळण लागलें.

पुरंदरे मास्तर म्हणून पुण्याला एक प्रसिद्ध ड्रॉइंग मास्तर व आर्टिस्ट होते. धंद्यानिमित्त त्यांची आणि दत्तोपंतांची ओळख झाली आणि एक दिवस दत्तोपंत पुरंदरे यांच्या घरीं राहायला गेले आणि त्यांच्या कुटुंबांत सामील झाले. फटकळपणांत पुरंदरे मास्तर आणि दत्तोपंत फडके एकमेकांना हार जाणारे नव्हते. पण दोघेहि स्वभावाने दिलदार.

पुरंदरे मास्तर माझ्याहि ओळखीचे होते. मी एक दिवस त्यांना विचारलें, “ दत्तोपंतांचा आणि तुमचा इतका लोभ कसा ? ”

पुरंदरे मास्तर मिस्किलपणे हसत म्हणाले, “ काय सांगूं जोशीबुवा ! दत्तू फडके म्हणजे एक अल्लड खोंड आहे. एक दिवस घरीं आला, बांधला दावणीला; पण कधी लाथ झाडीत नाही, डोळे तांबारीत नाही किंवा शिंगाने धिंगामस्ती करीत नाही. अरे ए दत्तू ! जोशीबुवा आले आहेत. चहा टाक ना त्यांना ! ”

दत्तोपंतांच्या आयुष्याचीं क्षितिजें मर्यादित होतीं. त्यांनी आपला मित्रपरिवार कधी वाढविला नाही. दत्तोपंतांचा एक स्नेही होता. मधे वर्षभर त्याला नोकरी नव्हती. मागे थोडा प्रपंच. आजच्या जगांत कुणाला सांगूनहि खरें वाटणार नाही, त्या वर्षभर दत्तोपंत आपला पगार झाला की वीस रुपये आपल्याला खर्चाला ठेवीत आणि तीस रुपये त्या मित्राच्या घरीं पोहोचते करीत. “ अरे मला एकट्या जिवाला वीस रुपये पुरे होतात. तुला नोकरी लागेपर्यंत घेत जा...... ”

दत्तोपंतांचा खिसा जरी बारीक होता तरी तो त्यांच्या स्नेह्यांकरिता सदोदित मोकळा असे. दत्तोपंतांनी आपल्या आयुष्याच्या महत्त्वाकांक्षा मर्यादित केल्या होत्या. आपल्या आयुष्याचें झाड आहे अशी त्यांनी कल्पना केली होती. त्याला किती पानें-फुलें येणार ही त्यांना कल्पना होती. त्या झाडाखाली बसणारीं माणसें मोजकीं होतीं. पानें-फुलें खुडण्यास—हातीं येतील त्याच्या—मोकळीक होती. पुरंदरे मास्तरांचें घर हें त्यांनी आपलें घर मानलें होतें. पुरंदरे मास्तरांचें घर झाडण्यापासून त्यांच्या घरांतील आजारपण, मुलें संभाळणें, वेळ पडल्यास स्वैंपाक करणें, सर्वसर्व त्यांनी केलें. लाचारीने नव्हे—मालकी हक्काने, प्रेमाने. दत्तोपंत फडके म्हणजे पुरंदरे कुटुंबाचें भाग्य होतें !

मीहि त्यांचा एक स्नेही. माझ्याविषयी त्यांना फार आपुलकी आणि त्यांच्या मित्रपरिवारांत मला जरा नांवलौकिक मिळालेला; त्यामुळे त्यांना माझ्याबद्दल जरा जास्त अभिमान !

मी 'प्रसाद' मासिक काढलें. माझें ब्लॉक—मेकिंगचें सर्व काम त्यांच्याकडेच असे. पहिल्या अंकांतील ब्लॉक्स त्यांच्याकडेच दिले. महिनाअखेरीला मीं "बिल किती झालें ?" म्हणून विचारलें.

दत्तोपंतांनी आपुलकीच्या उमेटपणाने माझ्याकडे पाहत म्हटलें, "कां ? पैसे फार झाले आहेत ? माझे पैसे वेगळे ठेवा. मला लागले म्हणजे मागेन."

वर्षभर त्यांनी बिल मागितलेंच नाहीं. वर्षाखेर माझ्याकडे दत्तोपंत फडके आले व त्यांनी विचारलें, "काय, प्रसाद काय म्हणतो आहे ?"

"पहिल्या वर्षात...इतका तोटा आला आहे—" मीं सहज सांगितलें.

"आला ना तोटा ? आणि दर महिन्याला बिल मागत होतां ! हें आणलें आहे वर्षाचें बिल करून ! वरचे एकावन्न रुपये फक्त देऊन टाका. म्हणजे चुकती पावती देतों ! प्रसाद तोट्यांत आहे तोपर्यंत तुम्ही द्याल तें माझ्या कामाचें बिल. पण प्रसाद चालवा !" दत्तोपंतांनी समाधानानं विडी ओढीत म्हटलें.

माझ्या मुलाची मुंज झाली. दत्तोपंत फडके यांचें यादींत नांव असूनहि कार्याच्या घाईगर्दीत दत्तोपंताना आमंत्रण जायचें राहिलें; पण न बोलवितांहि गृहस्थ कार्याला हजर ! आणि पानसुपारी घेऊन जातांना मला

एकीकडे बोलावून दत्तोपंतांनी मला कानांत सांगितलें, " बोलावण्याशिवाय आलों आहे आणि जेवायलाहि येणार आहे ! "

असें वागणारें मन किती निर्मळ आणि उदात्त असेल याची कल्पनाच करा ! पण दत्तोपंतांकडे पाहिलें तर दिसायला ते किती ओबडधोबड होते. देहाचा काळा वर्ण, तोंडावर देवीचे वण, स्थूल शरीर, शरीरधारणेपुरतेच कपडे, कपड्यांना ना आकार ना रंग, डुलत डुलत चालण्याची सवय. कुणाला त्यांच्याशीं बोलावेसेंहि वाटलें नसतें !

आणि दत्तोपंत फडके हा मनुष्य असा फटकळ होता की, कुणाचाहि त्यांच्याविषयी पहिल्यादा गैरसमज व्हावा; पण त्याच माणसाला पुढे अनुभवाने कळें की, दत्तोपंत हें माणुसकीचें एक चांगलें फळ आहे. पण पहिल्या भेटीनंतर ज्यांना त्याच्याशीं बोलण्याचा पुन्हा प्रसंगच येणार नाही किंवा आला नसेल ते खात्रीने म्हणत असतील, " दत्तोपंत फडके एक विचित्र नाठाळ माणूस आहे ! "

त्याच्या स्वभावाची आणखी एक सूक्ष्म छटा सांगतों. माझ्या ' वहिनींच्या बांगड्या ' या चित्रपटाचें पहिल्या खेळाकारिता मी त्यांना लेखी आमंत्रण धाडलें. तें त्यांनी समक्ष येऊन परत केलें आणि अभिमानाने म्हणाले, " जोशीबुवा, आज तुमचीं मोठीं मोठीं नांवलौकिकाची मित्रमंडळी येणार, माझ्यासारखा फटिंग त्या गर्दींत कशाला ? मला तुमचा चित्रपट पाहायचा आहे, पण पहिली गर्दी ओसरली, की मी आपणहून पास मागून नेईन आणि पाहीन ! "

परिस्थितीने वाव मिळाला नाही, म्हणून दत्तोपंत हे लहान आयुष्य जगले; पण केवढें मोठें आयुष्य होण्याची त्यांत पात्रता होती ! पण तसें झालें नाही. पण विस्तारावर काय आहे—पाण्याचा ओहळ–ओढा–नदी–समुद्र–पण मूलभूत जीवनच ना ?

दत्तोपंत हे एक रसरसणारें आणि सळसळतें जीवन होतें !

ज्या पुरंदरे मास्तरांकडे दत्तोपंतांनी आयुष्य काढलें, ते पुरंदरेहि गेले. यांच्या एका मुलाने आपल्या भावाला लिहिलेलें एक पत्र खाली देत आहे.

' तीर्थरूप श्री. रा. भाऊसाहेबांच्या चरणीं, सा. न. वि. वि.

तुमचं पत्र वाचलं. ढसढसून रडलों. आज आपला एक खरा नातलग

गेला. काय लिहूं भाऊ मी ? किरकोळ पडशा–तापा व्यतिरिक्त दुखण्याच्या अंगणांत न फिरकणारे आप्पा आज एकदम लक्ष्मण-रेषा ओलांडून गेले. नागपुरास येण्यापूर्वी त्यांना मीं केलेला नमस्कार अन् घेतलेलं दर्शन अखेरचंच. आता ते पुन्हा दिसणार नाहीत. कोणाला कांहीहि कष्ट करायला न लावतां गेले.

अगदी सहज अन् बिनबोभाटपणे ते आपल्या घरांत आले आणि अगदी सहज अन् बिनबोभाटपणे ते आपल्या घरांतून एका पहाटे गुपचूप निघून गेले.

अडीच तपें झालीं. पुरंदऱ्यांच्या घरासाठी फडके राबले. आपल्यांत आले आणि आपले होऊन वागले–आपल्यासाठी आप्पांनी सगळं कांही केलं. चुलीपासून कोर्टापर्यंत, अमृतांजनापासून हॉस्पिटलपर्यंत, फरासखान्या-पासून तुरुंगापर्यंत आणि घर झाडण्यापासून घराचें बांधकाम पाहण्यापर्यंत सगळं कांही आप्पांनी केलं.

१९२६–२७ सालच्या ती. श्री. काकूच्या भयंकर दुखण्यांत आप्पांनी घेतलेले श्रम अजून मला आठवताहेत. चि. मनोहरपंताचें सर्व आईपण आप्पांनीच केलें. ती. सौ. माईच्या लग्नांत त्यांनी घेतलेले कष्ट अगदी ठळक, जसेच्या तसे माझ्या डबडबलेल्या डोळ्यांना दिसताहेत. रात्रीं कढी-भाताचीं चुलीवरचीं कडाडलेलीं भांडीं, सोवळं नेसून भर रस्त्याने घेऊन जाणारे आप्पाच होते. त्यांना अपमान वाटलाच नाही, कारण घर आपलं मानलं होतं ना !

प्रत्यक्ष लग्नांत आप्पांना काय विलक्षण घाव बसला होता ! आप्पांचा कोणी तरी ‘ हे उपरे आहेत ’ असें समजून झणझणीत अपमान केला होता. विनाकारणच, पण तो त्यांनी चहाच्या घोटासारखा सहज गिळला. आचाऱ्यांनीहि असा अपमान सहन केला नसता. पण आचाऱ्याचीं कामें करूनहि आप्पांनी हें सोसलं. आणि पुन्हा सर्वांचे फोटो काढायला हसत हसत आलेच ! आठवतात का ते आप्पा ?

१९३१ मधील आपल्या घरच्या सर्वांचींच भयंकर दुखणीं स्मरणांत अजून आहेत. ती. कु. मंदू त्यांतच गेली. ती सिंधूताईचें दुखणें त्यांतच चढत्या पायरीला लागलें. ह्या सर्व बाबतींत आप्पा किती तळमळून झटत

होते ! ह्याला साक्षीदार आपणच आहोंत. फडक्यांचे पुरंदरे झाले होते. त्यांनी आपल्या तनामनाच्या फडक्याचें पुरंदऱ्यांच्या सुखानंदासाठी-अगदी राजीखुषीने—आपल्याच हाताने पोतेरें करून टाकलें होतें.

१९३३ च्या प्लेगमध्ये ती. मामांच्या साथीला उभे राहून पुण्यांत भर प्लेगच्या धुमाकुळांत घर सांभाळणारे आणि ती. मामांना आधार देणारे आपल्याला एकच नातलग होते—आप्पा. दुसरं कुणी नव्हतं.

त्यावेळी पुण्याहून डोणज्याला हेलपाटे मारणारे, तिथल्या नाठाळ गावकऱ्यांशीं भांडणारे, पर्वतीच्या वाटेवर काची—मंडळींशीं झालेल्या तंट्यांत तुम्हांला अन् मला पाठीशीं घालून झगडणारे, आळींतल्या लहान-मोठ्या संघर्षांत आपली बाजू चढाईने धरणारे आप्पा; रेशनच्या काळांत तासन् तास रॉकेल—साखरेसाठी बारींत उभे राहणारे आप्पा, तुम्हांला कौतुकाने शास्त्रीबुवा म्हणणारे, मनोहरपंतांना ‘ मणुराम ’ म्हणणारे अन् मला शेवटपर्यंत ‘ बन्या ’ म्हणणारे आपले आप्पा गेले !

१९३५ सालीं XXX यांनी पुण्याला येऊन केवढं भयंकर भांडण मांडलं होतं. आठवतं का ? तेव्हाहि ती. मामांच्या बरोबरीनं अन् कणभर वरचढीनं आप्पाच अटीतटीने त्यांच्याशीं भांडले होते. त्यांनाच XXX अखेर नमावं लागलं होतं.

१९३८ सालीं तुमच्या लग्नांत आणि १९३७ सालीं मनोहरपंतांच्या मुंजींत आप्पांनी केवढा सर्वांगीण कष्टांचा भार उचलला होता ! मनोहर-पंतांची मुंज अशा रुबाबांत झाली याचं श्रेय आप्पांनाच आहे. तुमच्या लग्नांतहि अगदी अस्से राबत होते. पुन्हा एकदा महाभयंकर जळता अपमान आप्पांच्या पदरांत पडला. विनाकारणच ! कोणीतरी पुरंदऱ्याच्या कुळांत हा कोण ‘ गाढव ? ’ असें म्हणालें. त्यावेळची आप्पांची ती दयनीय मूर्ति आठवून भडभडून येत आहे. आता किती अश्रू गाळावेत ?

१९४२ सालीं रेशन सुरू झालं. त्यांनी स्वतःचं कार्ड काढलं तें दत्तात्रय बळवंत पुरंदरे या नांवानेच. ४२ सालीं ती. मामांचा साठावा वाढदिवस साजरा करतांना मित्रांच्या वरून छटाक-पावशेर साखरेचे पुडे आणि वाण्याकडून तांदूळ मिळवून आणणारे आप्पा हे मोरेश्वर बळवंतांचे कोण, हें पाहायला रेशन कार्डावरचें नांव पाहण्याचीहि जरूर नव्हती. ते त्यांच्या

वागण्यांतूनच दिसे. त्यांनी पुरंदऱ्यांना आपलं म्हटल्यानंतर सख्ख्या व चुलत भावा–भावजयांनाहि जवळ केलं नाही. हातचं राखून कोणावरहि प्रेम केलं नाही. त्यांनी फक्त " पुरंदरे पाहिले, पुरंदरे साहिले, पुरंदरे ध्यायिले । ध्यानीं मनीं ॥ "

१९४८ च्या गांधी–दंगलींत घर व आपण बचावले जावेत म्हणून किती धडपड चालली होती त्यांची. अगतिक होऊन त्यावेळीं त्यांनी सुचवलेल्या कांही कल्पना आठवल्या, की आईच्या दुखण्यांत अडीच-तीन वर्षांच्या मुलाने करावेत तसे प्रयत्न व सुचवाव्यात तशा कल्पनांची स्मृति होते.

सत्याग्रहांत ते तुरुंगांत गेले. तेथे मिळत आम्हांला पंजाच्या पिसाऱ्या-एवढ्या आकाराच्या दोन भाकरी. आप्पांना त्या चावत नसत. मक्याच्या भाकरी त्या. दाढेखाली चावतांना होणाऱ्या वेदना त्यांच्या चेहऱ्यावर व्यक्त होत. ती चेहऱ्यावरची वेडीवाकडी हालचाल मला पाहवत नसे. मला ते अगदी नियमाने, न विसरतां–त्यांच्यांतली पाऊण एक भाकरी आणून देत. माझे पोट भरे.

घरमालकाचं आणि आपलं प्रकरण निर्माण झालं, तेव्हा आप्पांनी कोर्टांत किती हेलपाटे मारले, याला काय सीमा आहे का? सर्व पायपीट टाचांच्या वेदना सहन करीत करीत त्यांनी केली.

ते किंचित् डुलत, मधूनच खोकत, दातांची कवळी आंतल्याआंत दाबीत चालणारे, " काय बाप्पू ऽ ! " म्हणून मुलांना हाका मारणारे, कदाचित् लहर फिरली तर एखाद्याशीं उगीचच वाकडं भांडण भांडणारे, हात मागे बांधून रस्याने चालणारे, घरांत कोणाशीं फारसें न बोलणारे, पण मुकाट्याने सर्वांच्यावरच प्रेम करणारे आप्पा गेले. कायमचे गेले. आता ते पुन्हा दिसणार नाहीत ही खात्री झाली आहे. तरीहि माझें मन आकांडतांडव करीत आहे. कारण, मला त्यांच्यासाठी कांहीतरी करण्याची फार फार तळमळ लागून राहिली होती.

मागे एकदा मी मुकाट्याने रडलों होतों. तुळशीबागेपासल्या एका हॉटेलांत आप्पा नेहमी चहा घेत. एक दिवशीं ते त्या हॉटेलपाशीं उभे असतांनाच मी त्या रस्त्याने चाललों होतों. त्यांनी मला केविलवाणी हळूच हाक मारली.

होते ! ह्याला साक्षीदार आपणच आहोंत. फडक्यांचे पुरंदरे झाले होते. त्यांनी आपल्या तनामनाच्या फडक्याचें पुरंदऱ्यांच्या सुखानंदासाठी-अगदी राजीखुषीने–आपल्याच हाताने पोतेरें करून टाकलें होतें.

१९३३ च्या प्लेगमध्ये ती. मामांच्या साथीला उभे राहून पुण्यांत भर प्लेगच्या धुमाकुळांत घर सांभाळणारे आणि ती. मामांना आधार देणारे आपल्याला एकच नातलग होते–आप्पा. दुसरं कुणी नव्हतं.

त्यावेळी पुण्याहून डोणज्याला हेलपाटे मारणारे, तिथल्या नाठाळ गावकऱ्यांशीं भांडणारे, पर्वतीच्या वाटेवर काची–मंडळींशीं झालेल्या तंट्यांत तुम्हांला अन् मला पाठीशीं घालून झगडणारे, आळींतल्या लहान-मोठ्या संघर्षांत आपली बाजू चढाईने धरणारे आप्पा; रेशनच्या काळांत तासन् तास रॉकेल–साखरेसाठी बारींत उभे राहणारे आप्पा, तुम्हांला कौतुकाने शास्त्रीबुवा म्हणणारे, मनोहरपंतांना 'मणुराम' म्हणणारे अन् मला शेवटपर्यंत 'बन्या' म्हणणारे आपले आप्पा गेले !

१९३५ सालीं XXX यांनी पुण्याला येऊन केवढं भयंकर भांडण मांडलं होतं. आठवतं का ? तेव्हाहि ती. मामांच्या बरोबरीनं अन् कणभर वरचढीनं आप्पाच अटीतटीने त्यांच्याशीं भांडले होते. त्यांनाच XXX अखेर नमावं लागलं होतं.

१९३८ सालीं तुमच्या लग्नांत आणि १९३७ सालीं मनोहरपंतांच्या मुंजींत आप्पांनी केवढा सर्वांगीण कष्टांचा भार उचलला होता ! मनोहर-पंतांची मुंज अशा रुबाबांत झाली याचं श्रेय आप्पांनाच आहे. तुमच्या लग्नांतहि अगदी अस्से राबत होते. पुन्हा एकदा महाभयंकर जळता अपमान आप्पांच्या पदरांत पडला. विनाकारणच ! कोणीतरी पुरंदऱ्याच्या कुळांत हा कोण 'गाढव ?' असें म्हणालें. त्यावेळची आप्पांची ती दयनीय मूर्ति आठवून भडभडून येत आहे. आता किती अश्रू गाळावेत !

१९४२ सालीं रेशन सुरू झालं. त्यांनी स्वतःचं कार्ड काढलं तें दत्तात्रय बलवंत पुरंदरे या नांवानेच. ४२ सालीं ती. मामांचा साठावा वाढदिवस साजरा करतांना मित्रांच्या घरून छटाक-पावशेर साखरेचे पुडे आणि वाण्याकडून तांदूळ मिळवून आणणारे आप्पा हे मोरेश्वर बळवंतांचे कोण, हें पाहायला रेशन कार्डावरचें नाव पाहण्याचीहि जरूर नव्हती. ते त्यांच्या

३८३७



वागण्यांतूनच दिसे. त्यांनी पुरंदऱ्यांना आपलं म्हटल्यानंतर सख्ख्या व चुलत भावा–भावजयांनाहि जवळ केलं नाही. हातचं राखून कोणावरहि प्रेम केलं नाही. त्यांनी फक्त " पुरंदरे पाहिले, पुरंदरे साहिले, पुरंदरे ध्यायिले । ध्यानीं मनीं ॥ "

१९४८ च्या गांधी–दंगलींत घर व आपण बचावले जावेत म्हणून किती धडपड चालली होती त्यांची. अगतिक होऊन त्यावेळीं त्यांनी सुचवलेल्या कांही कल्पना आठवल्या, की आईच्या दुखण्यांत अडीच-तीन वर्षांच्या मुलाने करावेत तसे प्रयत्न व सुचवाव्यात तशा कल्पनांची स्मृति होते.

सत्याग्रहांत ते तुरुंगांत गेले. तेथे मिळत आम्हांला पंजाच्या पिसाऱ्या-एवढ्या आकाराच्या दोन भाकरी. आप्पांना त्या चावत नसत. मक्याच्या भाकरी त्या. दाढेखाली चावतांना होणाऱ्या वेदना त्यांच्या चेहऱ्यावर व्यक्त होत. ती चेहऱ्यावरची वेडीवाकडी हालचाल मला पाहवत नसे. मला ते अगदी नियमाने, न विसरतां–त्यांच्यांतली पाऊण एक भाकरी आणून देत. माझे पोट भरे.

घरमालकाचं आणि आपलं प्रकरण निर्माण झालं, तेव्हा आप्पांनी कोर्टांत किती हेलपाटे मारले, याला काय सीमा आहे का ? सर्व पायपीट टाचांच्या वेदना सहन करीत करीत त्यांनी केली.

ते किंचित् डुलत, मधूनच खोकत, दातांची कवळी आंतल्याआंत दाबीत चालणारे, " काय बाप्पूऽ ! " म्हणून मुलांना हाका मारणारे, कदाचित् लहर फिरली तर एखाद्याशीं उगीचच वाकडं भांडण भांडणारे, हात मागे बांधून रस्त्याने चालणारे, घरांत कोणाशीं फारसें न बोलणारे, पण मुकाट्याने सर्वांच्यावरच प्रेम करणारे आप्पा गेले. कायमचे गेले. आता ते पुन्हा दिसणार नाहीत ही खात्री झाली आहे. तरीहि माझें मन आकांडतांडव करीत आहे. कारण, मला त्यांच्यासाठी कांहीतरी करण्याची फार फार तळमळ लागून राहिली होती.

मागे एकदा मी मुकाट्याने रडलों होतों. तुळशीबागेपासल्या एका हॉटेलांत आप्पा नेहमी चहा घेत. एक दिवशीं ते त्या हॉटेलपाशीं उभे असतांनाच मी त्या रस्त्याने चाललों होतों. त्यांनी मला केविलवाणी हळूच हाक मारली.

" अरे बन्या, तुजजवळ एक-दोन आणे आहेत का ?--इथला चहा चांगला असतो ! "

भाऊ, पुढचं सांगत नाही. पण मला त्यांचं तें मागणं ऐकून रडूं आलं. मी मुकाट्याने रडलों.

आजहि नागपुरांत मी मुकाट्याने रडतों आहें. आप्पांनी माझ्यासाठी, माझ्या घरासाठी काय काय केलं याचा इतिहास डोळ्यांपुढं अगदी जस्साच्या तस्सा उभा राहतो आहे, आणि मी रडतों आहें.

काय लिहूं ? इच्छा श्रीशक्तीची.

आप्पांचा
बन्या

शके २८३
श्रावण शु. ४
९-८-५६
नागपूर.

मी आज स्नान-संध्या केली. ती. आप्पांसाठी रामनामाचा जप केला. पूर्ण उपवास व थोडाबहुत दानधर्म केला. गीतेचा एक अध्याय वाचला. महाभारताचा थोडा भाग वाचला. माझें दुःख मीच विसर्जन करण्याचा प्रयत्न करीत आहें. मी आप्पांचें मरणसमयीं तेथे असावयास हवें होतें. त्यांच्यासाठी सबंध आयुष्यांत कांहीच घडलें नाही. त्यांच्या मृत्यूपेक्षा याचेंच दुःख मला फार होत आहे. "

( हे बन्या पुरंदरे म्हणजे प्रसिद्ध देशभक्तिपर-इतिहासलेखक. -जळत्या ठिणग्या, लालमहाल, मुजऱ्याचे मानकरी इ. पुस्तकें त्यांनी लिहिलीं आहेत. )

होय, परवा ता. ६ । ८ । ५६ सोमवार. पहाटे साडेपांच वाजतां माझा हा जिव्हाळ्याचा मित्र निघून गेला. मला न सांगतां निघून गेला ! गृहस्थ होताच तसा तऱ्हेवाईक. ते जेव्हा माझ्याकडे येत, तेव्हा बोलतां बोलतां कांही तरी कामाची आठवण होऊन असेंच मधूनच एकाएकी निघून जात, पण ते पुन्हा परत येण्याकरिता जात. आजहि दत्तोपंत फडके असेच निघून गेले आहेत, पण परत न येण्याकरिता !

या महिन्याचें ' लक्षांत राहिलेलीं माणसें ' हें सदर लिहायला घेतलें

होतें. एक दोन पानें लिहून झालीं होतीं, तोंच दत्तोपंत गेल्याची बातमी मला कळली. मीं लिहिलेलीं पानें फाडून टाकलीं. दत्तोपंत हा असा 'लक्षांत राहण्यासारखा माणूस आहे' हें अति सहवासाने माझ्या लक्षांत आलें नव्हतें, पण आता तें पूर्णपणे माझ्या लक्षांत आलें आहे! आणि म्हणूनच 'लक्षांत राहिलेलीं माणसें' या सदरांत मीं माझ्या दिवंगत मित्राला जागा करून दिली आहे!

पुण्यांत मी घर बांधलें. दत्तोपंत एक दिवस घर पाहण्याकरिता आपणहून आले. आपल्या मित्राचें तें घर पाहून त्यांचे डोळे अश्रूंनी भरून आले. कावरेबावरेपणाने इकडे तिकडे पाहत दत्तोपंतांनी माझ्या हातांत अकरा रुपये ठेवीत म्हटलें, "तुमच्या घरांत माझे हे अकरा रुपये असूं देत. केव्हाहि हक्काने पांच मिनिटें बसायला मी येत जाईन!" मित्राचें निर्मळ मनाने छोटेंमोठें वैभव पाहणारे ते दत्तोपंत— कांहींना 'नाठाळ' वाटणारा तो 'दत्तू फडके' अजून माझ्या डोळ्यांपुढे उभा आहे—मित्रा, आता निदान माझ्या आठवणींतनं तरी हलूं नकोस!

● ● ●

# दहा

सीतारामपंतांविषयी तसें फारसें कुणाचेंच चांगलें मत नव्हतें. " तसें त्यांनी कुणाचें काय वाईट केलें आहे ? " असें जर एखाद्याला हडसून-खडसून विचारलें, तर कुणाला कांही सांगतांहि येत नव्हतं. मग फक्त गुळमुळीत उत्तर येई– " पण तो कांही चांगला मनुष्य नाही. "

– म्हणजे काय ?

– मीं त्यांना लहानपणापासून ओळखीत होतों. ते लहानपणापासून श्रीमंतींत वाढलेले – स्वभावाने चांगले. पण लहानपणच्या स्नेह्यासोबत्यांत-सुद्धा 'श्रीमंताचा मुलगा' म्हणून त्यांची हेटाळणी होई. पण सीताराम-पंतांची वागणूक तशी नव्हती. त्यांना एखाद्या विषयांत चांगले मार्क मिळाले की मुलांनी म्हणावें, " मग, आम्हांला असा ऐषआरामांत अभ्यास करायला मिळाला असता तर आम्ही कधी पहिला नंबर सोडला नसता ! "

एकदा आजारीपणामुळे सीतारामपंत परीक्षेंत नापास झाले. मुलें म्हणालीं, " श्रीमंताचीं मुलें अशींच ! असं परीक्षा नापास होऊन बापाची इस्टेट कशी टिकायची ? पांच-सात पिढ्यांची श्रीमंती आहे. आता उतार लागायचाच. सीतारामपंतांच्या आयुष्यभर ही श्रीमंती टिकली तरी पुष्कळ झालें ! "

एकदा त्यांनी आपल्या विद्यार्थि-मित्रांना दिवाळींत फराळाला घरीं

बोलाविलें होतें. मुलें जातांना म्हणालीं, "आम्हांला वाटलं, श्रीमंताचं घर आहे. कांही मोतीचूर, जिलबी, श्रीखंड, बासुंदी मिळेल. पण काय, आमच्यासारखंच. मग त्यापेक्षा आम्ही गरीब बरे! आम्हांला जर श्रीमंती असती तर आम्ही असं दरिद्र्यासारखं फराळाला बोलावलं नसतं. जेवायलाच बोलाविलं असतं सगळ्यांना." तोंड पुशीत कांही मुलें म्हणालीं. इतरांनी त्यांना साथ दिली. मोठा हशा झाला. सीतारामपंतांनी तो ऐकला.

आपली वागण्यांत काय चूक होते आहे हें त्यांना कळेना.

पण तेव्हापासून त्यांचा स्वभाव एकलकोंडा होत चालला. ते बरोबरीच्या मुलांत मिसळत नाहीसे झाले.

लहानपणीं कुणी त्यांच्याकडे पाहून हसलें, -हसण्यानेंच त्यांनी उत्तर द्यावें आणि खाकेंतील दप्तर सावरीत घरीं निघून जावें.

एकदा वार्षिक परीक्षा झाली होती. त्यांच्या एका मित्राला त्यांची जुनीं पुस्तकें पाहिजे होतीं. सीतारामपंतांनी तीं दिलीं.

"याचे किती पैसे देऊं?" मित्राने विचारलें.

सीतारामपंतांनी हसण्यानेच निःशब्द उत्तर दिलें.

त्या मित्राने थोडेसे पैसे सीतारामपंतांच्या हातावर ठेवले. सीतारामपंतांनी मुकाट्याने घेतले आणि हसले. तो मित्रहि हसत हसत निघून गेला.

पण नंतर त्यांच्या कानावर आलें, "दरिद्रि लेकाचा! मला वाटलं, श्रीमंत आहे. पुस्तकं फुकट देईल. दहा-बारा रुपयांचीं तर पुस्तकं होतीं. मीं त्याच्या हातावर सहा आण्यांचे पैसे ठेवले. भिकाऱ्यासारखे तेवढेच त्याने घेतलेन्. बापाच्या न कळत चोरून सिनेमा पाहायचा असेल जुनीं पुस्तकं विकून!"

या आणि अशा अनुभवांतून त्यांचें लहानपणापासूनचें आयुष्य पोसलें गेलें होतें. त्यांच्या मित्रांना त्यांच्या श्रीमंतीचा आसरा पाहिजे होता, पण तो त्यांच्या श्रीमंतीला शिवी देऊन हवा होता.

पण त्यांची वडिलार्जित श्रीमंती अशी 'शिवी' देण्यासारखी नव्हती! त्या श्रीमंतीला सात्त्विकतेचें तेज होतें. दुसऱ्याच्या उपयोगी पडण्याची इच्छा होती-पण 'श्रीमंत' म्हणून सीतारामपंतांच्या स्नेहासोबत्यांनी त्यांना आपुलकींतून बाजूला काढलें होतें. त्यांचा स्वभाव लहानपणापासून

'एकाकी' बनत चालला होता. त्यांना मित्र नको होते असें नव्हे; पण लोकांच्या या वृत्तीने त्यांना कुणाशींच स्नेहभाव ठेवावासा वाटला नाही. ते आपल्या कुटुंबांतच रमत.

पुढे त्याचें लग्न झालें. त्यांना चार मुलेंबाळें झालीं, पण त्यांचा स्वभाव एकलकोंडाच बनला. बाहेर त्यांना कोणी मित्र नव्हता. खरें, घरच्या माणसांची संगतसोबतहि केव्हा तरी कंटाळवाणी वाटणारच. म्हणून त्यांनी स्वतःला बागेचा नाद लावून घेतला. घरामागच्या मोकळ्या अंगणांत त्यांनी स्वकष्टाने लहानशी बाग तयार केली होती आणि आयुष्यांतील आपला रिकामा आणि कंटाळवाणा वेळ ते या बागेंत घालवीत. बागेंतलीं झाडें त्यांना मित्रासारखीं वाटत. स्नेह्यासोबत्यांशीं गप्पा मारण्याचें जें सौख्य असतें तें त्यांना स्वतः हातांनी लावलेल्या आणि वाढवलेल्या झाडांकडे पाहत बसतांना मिळत असे!

पण माणसाला केव्हा तरी माणसाचा मोहच जास्त आकर्षक ठरणार. 'शिवराम' म्हणून त्यांचा एक बालमित्र होता. त्याची मैत्री सीतारामपंतांनी त्याची बोलणीं आणि मतभेद विसरूहि टिकवली होती.

'श्रीमंत' कसे वाईट असतात हें शिवराम त्यांना प्रसंगाप्रसंगाने नेहमी समजावून सांगे. पण 'मैत्रीच्या' भुकेकरिता ती समजलेली गोष्ट 'शिवरामकडून' सीतारामपंत पुन्हा पुन्हा समजावून घेत!

आपला सुखी संसार शिवरामला डाचूं नये म्हणून सीतारामपंत नेहमी त्याच्या घरींच भेटायला जात. स्वतःला आवडत नसे तरी त्याच्या घरचा कमी दुधाचा आणि धुरकट चहा आनंदाने पीत. शिवरामच्या घरच्या कार्यांत कष्ट करायला जात.

पण शिवरामशिवाय सीतारामपंतांना कोणी स्नेही नव्हता. त्यांच्या सर्व स्नेह्यांनी 'श्रीमंत' म्हणून त्यांना वाळीत टाकलें होतें. कुणीहि वर्गणी गोळा करण्याच्या वेळीं–केव्हाहि पैसे मागायच्या वेळीं –म्हणावें, "यांना काय झालें आहे?" त्या मागण्या-बोलण्यांत सहानुभूतीचा स्पर्श नसायचा. जणूं मागायला येणाऱ्यांचे पैसे 'सीतारामपंत' बळकावून बसले आहेत आणि ते आता परत करीत नाहीत!

आणि लोकांच्या या निर्बुद्ध मनोवृत्तीच्या आघाताने सीतारामपंतांचें

मन तयार झालें होतें. आता त्यांना लोकांच्या अशा वागण्यामुळे मनस्ताप होत नाहीसा झाला होता, तर " चिमण्या चिवचिव करून ओरडतात, " कावळे " कावकाव " करतात—त्याप्रमाणे " दुसऱ्याजवळचें " मागतांना लोक असेंच बोलतात अशी त्यांची खात्री झाली होती.

आणि सीतारामपंतांच्या तोलाचे कांही कांही श्रीमंत जेव्हा वर्गणी गोळा करायला येत तेव्हाहि ते श्रीमंतसुद्धा 'श्रीमंतीबद्दल' असेंच बोलतांना पाहून सीतारामपंतांना आश्चर्य वाटे. पण त्यावेळीं ते श्रीमंतहि आपली गरिबीच जाहीर करीत. आणि सीतारामपंतांना म्हणत, " तुमच्यासारख्यांनी निदान या देशकार्याकरिता हजाराचा तरी आकडा टाकायला हवा होता ! "

पण सीतारामपंत कुणालाच उत्तर देत नसत. कार्याची जाणीव ठेवून त्यांना योग्य वाटेल तें त्या कार्याला देत आणि लोक काय म्हणतील तें मुकाट्याने ऐकून घेत.

तात्पर्य, सीतारामपंत हा 'असा वाईट माणूस' होता !

यालाहि अनेक दिवस झाले. वर्षें झालीं !

"शिवराम" मागेच धंद्याला लागला होता. त्याची परिस्थिति बदलत होती. त्याचीहि श्रीमंतांत गणना होण्याइतकी मिळकत वाढत होती; पण तरीहि 'श्रीमंतांबद्दल' त्याचें मत बदलत नव्हतें. अजूनहि वेळप्रसंगीं " तुम्ही काय बुवा, श्रीमंत लोक ! " म्हणून सीतारामपंतांना हिणविण्यांत शिवराम चुकत नसे आणि तें मनापासून असे.

कांही वर्षांपूर्वी शिवरामच्या वाढत्या वैभवाने आनंदून सीतारामपंतांनी 'शिवरामला' 'शिवरामपंत' म्हणून हाक मारली.

पण त्यावर शिवराम नम्रपणाने म्हणाला, " सीतारामपंत, मला आपलं तुम्ही 'शिवरामच' म्हणत चला. 'पंत, साहेब' हीं विशेषणें श्रीमंतांकरिता आहेत. आम्ही गरीब माणसें. मला आपला शिवरामच राहूं द्या !"

सीतारामपंत पुढे त्यांना 'शिवरामच' म्हणूं लागले.

शिवरामच्या घरच्या माणसांच्या अंगावर आता शे-दीडशे तोळे सोनें दिसूं लागलें. त्यांनी घर बांधलें. त्यांचीं मुलें मोठीं झालीं. उच्च शिक्षणाकरिता परदेशीं रवाना झालीं. तरी शिवरामची गरिबी नाहीशी होईना.

तो आता ‘ लोकांचा सेवक ’ असें स्वतःला म्हणवून घेऊं लागला. गरिबां-बद्दल जास्तच कीव दाखवूं लागला आणि उसासे टाकीत सीतारामपंतांना म्हणे, “ काय ही आपल्या लोकांची स्थिति !-- किती लोकांना अन्न नाही. पुरेसे कपडे नाहीत -- पण तुमच्यासारख्या श्रीमंतांना त्याचें कांही वाटत नाही ! ”

श्रीमंत सीतारामपंत आणि गरीब शिवराम यांचीं दोन्ही आयुष्यें मी जवळून पाहत आहे, तरीहि एक गोष्ट मला समजली नव्हती-ती परवा समजली आणि मी आश्चर्यानें थक्क झालों !

शिवरामचा धंदा कॉन्ट्रॅक्टरचा होता. तो एका कॉन्ट्रॅक्टरशीं भागीदारींत हा धंदा करी. त्या भागीदारींतच त्याचें वैभव वाढलें. पण त्याने एक हुषारी ठेवली होती. त्याच्या परिस्थितीची श्रीमंती जसजशी वाढत होती तसतशी आपल्या परिस्थितीबद्दल बोलण्याची गरिबी वाढत होती ! वागण्यांतील अजीजी वाढत होती. स्वतःला आता तो अभिमानाने ‘ गरीब ’ म्हणवून घेऊं लागला होता.

त्या गरीब शिवरामने आता धंद्यांतील भागीदारी तोडून धंदा स्वतःच्या मालकीचा केला होता. त्या शिवराम-गरिबाने आता स्वतःची गाडी घेतली होती आणि ती आपल्या मित्राला — सीतारामपंतांना -दाखविण्या-करिता घेऊन आला होता. धंदा खूप वाढला होता.

सीतारामपंत मैत्रीच्या नात्याने म्हणाले, “ शिवराम, आता धंद्याचा जास्त व्याप वाढवूं नकोस-”

तोंच सीतारामपंतांचें बोलणें अर्धवटच तोडीत शिवराम डोळ्यांत अश्रु आणून म्हणाला, “ सीतारामपंत, काय हा माझ्याबद्दल गैरसमज ! तुमच्यासारखं श्रीमंत होण्याकरिता का माझी धडपड आहे ? माझ्या हाता-खाली किती मजूर पोटासाठी काम करीत आहेत ? त्यांच्या पोटासाठी मला हा धंदा चालू ठेवायलाच पाहिजे ? मी उद्या धंदा बंद केला तर हे मजूर कुठे जाणार ? कुठे पोट भरणार ? ” सीतारामपंतांनाहि शिवरामची ती बोलण्यांतील केविलवाणी परिस्थिति असह्य झाली त्यांनी शिवरामचें बोलणें थांबवीत म्हटलें, “ शिवराम, खरं आहे तुझं म्हणणं ! ”

गरीब शिवराम आपल्या गाडींतून निघून गेला.

श्रीमंत सीतारामपंत आपल्या मनाचा तोल सावरण्याकरिता ' रेडिओ ' लावून मनाची करमणूक करूं लागले.

त्या दिवशीं अवचित मी सीतारामपंतांच्याकडे गेलों होतो. मी सहज म्हणालों, " शिवरामने भागीदारी तोडली. तो स्वतंत्र झाला. खूप नशीब काढलं नाही शिवरामनं ! "

भरपूर जेवण झाल्यानंतर तोंडांत माशी जावी आणि एखाद्याला एकदम भडभडून यावें तशी या माझ्या बोलण्याने सीतारामपंतांची स्थिति झाली.

" होय, शिवराम आत्ताच येऊन हें सांगून गेला ! आणि मलाहि खूप वाईट वाटलं ! कालच त्याने ती भागीदारी तोडली. तो भागीदारहि माझा स्नेहीच होता ! "

" फार वर्षांपूर्वीची गोष्ट आहे. शिवरामची परिस्थिति नीट नव्हती. त्याला कुठे नोकरी लागत नव्हती. धंदा नव्हता. त्याची स्थिति हलाखीची होती. पण शिवराम तसा स्वाभिमानी होता. मला कित्येकदा त्याला मदत करावीशी वाटे; पण त्यामुळे कदाचित् त्याचा स्वाभिमान डिवचला जाईल, म्हणून मी कांही करूं शकलों नाही. कारण शिवराम नेहमी म्हणे—हेहि दिवस जातील. पण आपण कोणापाशीं तोंड वेंगाडणार नाही, किंवा हात पसरणार नाही. परमेश्वराला माणुसकी असेल तर तो आपल्याला कांही मार्ग दाखवील. नाहीतर आपण उपाशी मरूं. पण कुणापुढे तोंड पसरणार नाही........मला कल्पना होती की, या वरवर कणखर दिसणाऱ्या वाक्यामागे केविलवाणेपणा आहे. त्याने न मागतां मी त्याला मदत करावी ही त्याची इच्छा आहे.....पण त्याचा तेवढाहि स्वाभिमान दुखावला जाऊं नये असें मला वाटलें........शिवराम ज्याचा भागीदार झाला त्या भागीदाराला मीच शिवरामला त्याने भागीदारी द्यावी म्हणून मांडवलाकरिता पांच हजार रुपये दिले. पण शिवरामला हें सांगूं नकोस असें सांगितलें. पुढे दोघांनीहि कष्ट करून धंदा नांवारूपाला आणला. कांही वर्षांनी त्या भागीदाराने माझे पांच हजार रुपये परत केले..... दोघांचेंहि बरें झालें; पण तो भागीदार आता थकला आहे. त्याला आता काम होत नाही, म्हणून शिवरामने त्याची भागीदारी अनेक कारणें

दाखवून आणि खुसपटें काढून परवाच तोडली. वास्तविक, याला कामें मिळत गेलीं, तीं त्या भागीदाराच्या ओळखीने.....पण तो भागीदार आज त्याला नकोसा झाला! त्यांच्या धंद्याचे सुरुवातीचें भांडवल माझें होतें हें शिवरामला अजूनहि माहीत नाही.—तो अजाणतेमुळे अजून मला आपली कर्तबगारीच ऐकवतो. अजूनहि माझ्या आणि जगांतल्या श्रीमंतीला शिव्याच देतो! 'वास्तविक आज तो माझ्यापेक्षा दुप्पट श्रीमंत आहे!"

"तात्पर्य, मनुष्यस्वभाव हा असा आहे! कोणचेंहि तत्त्वज्ञान तो बदलूं शकणार नाही. मनुष्यस्वभावाचे फार तर कानेकोपरे आणि कंगोरे बदलतील! आपल्या मुलांच्या चुका आपण सहन करून घेतोंच ना! या मित्राचें वय लहान आहे–निदान मन लहान आहे असें समजून मी मैत्री कायम ठेवण्याचें ठरविलें आहे.

–कित्येक माणसांना दुसऱ्यांना आरसे दाखविण्याची सवय असते–पण स्वतः ते कधीच आरशांत पाहत नाहीत!"

–पण त्याने अद्याप माझा स्नेह सोडला नाही, हा त्याचा मोठेपणा; आणि 'मैत्रीची' भूक पुरी करण्याकरिता मी सगळें त्याचें म्हणणें शांतपणे ऐकून घेतों!"

हें बोलत असतांना सीतारामपंतांचा 'रेडिओ' चालूच होता. तो बंद करण्याचें भानहि सीतारामपंतांना राहिलें नाही. 'रेडिओ' चालू असतांनाहि सीताराम-पंतांचें तें बोलणें कांही तरी 'आवेगाचें' असल्यामुळे मला स्पष्ट ऐकूं येत होतें.

सितारामपंतांचें बोलणें संपलें.

रेडिओ चालूच होता.

मनुष्यस्वभावाच्या त्या दोन वृत्ति माझ्या डोळ्यांपुढे नाचत होत्या. त्यामुळे रेडिओवर कांही 'मराठीच' गाणें चाललें होतें, पण त्या मराठी गाण्याचासुद्धा मला अर्थ कळत नाहीसा झाला होता.

–दोघेहि माझे स्नेहीच होते!

मराठी ग्रंथ सं...
अनुक्रम ... दि: ...
...

## अकरा

१९२० सालीं एका संध्याकाळीं २४ वर्षांचा एक कॉलेज–तरुण व्यासपीठावर उभा राहून बोलतांना जीं वाक्यें बोलला तीं अद्यापहि माझ्या कानांत–अगदी आता कुणीतरी बोलत आहे इतक्या स्पष्टतेने–मला आता हें लिहितांना ऐकूं येत आहेत.

" लोकमान्य टिळक उद्‌गारले–"

तो तरुण म्हणाला,

" ज्यूरीने कसाहि निकाल दिला तरी मी पूर्ण निर्दोषी आहें असें माझी मनोदेवता मला सांगत आहे ! पण वस्तुजाताच्या नियतीचें नियमन करणारी सत्ता याहूनहि श्रेष्ठ आहे ! आणि मी ज्या कार्याचा प्रतिनिधि आहे त्या कार्याचा माझ्या हालअपेष्टांनीच अधिक उत्कर्ष व्हावा अशी जर भगवंताची इच्छाच असेल–"

लोकमान्यांचीं हीं वाक्यें त्या तरुणाने अशा अभिनिवेशांत उच्चारलीं होतीं की, जणूं तो तशाच प्रसंगांत आहे–लोकमान्यांच्या आणि त्याच्या मनाची घडण एकच आहे ! लोकमान्यांसारखेंच चारित्र्य आणि धैर्य तो स्वत:च्या आयुष्यांत दाखविणार आहे !

त्या तरुणाची शरीरयष्टीहि दिसायला लोकमान्यांसारखीच गंभीर आणि ठेंगू होती. हा तरुण पुढे नांवलौकिक मिळविणार—भारताच्या

इतिहासांत आपल्या नांवाची एक तरी ओळ लिहायला लावणार—अशी आशा त्यावेळीं जमलेल्या श्रोतृवृंदाला वाटली !

त्या तरुणाने आपलें भाषण संपविलें. टाळ्यांचा प्रचंड कडकडाट झाला तो अजून माझ्या कानांत दुमदुमत आहे !

त्या तरुणाचें नांव होतें श्रीवास्तव !

त्याचें वक्तृत्व चांगल्यापैकी होतें. कॉलेजांत सर्व कामांत त्याचा पुढाकार असे. त्याची वृत्ति बाणेदार होती प्राध्यापकांचा आणि विद्यार्थ्यांचाहि तो अत्यंत लाडका होता.

१९२० सालीं लोकमान्यांच्या निधनानिमित्त भरलेल्या त्याच्या कॉलेजच्या सभेंत श्रीवास्तवने वरील भाषण केलें होतें !

ते त्याचे त्या वेळचे शब्द—तो प्रसंग—अजूनहि मी जेव्हा स्मरण करतों तेव्हा माझ्या डोळ्यांपुढे उभा राहतो !

तें दृश्य आणि ते शब्द अजूनहि कुठे हवेवर तरंगत असतील का ? कुठेतरी असलेच पाहिजेत. एरवीं मला कसे स्पष्ट ऐकूं येतात ?—हें दृश्य अजूनहि कसें माझ्या मनासमोर उभें राहतें ?

काळाची गुंडाळत आलेली सतरंजी पुन्हा कुणाला उलगडतां येईल का ? आणि अशी जर उलगडतां आली तर कितीतरी गोष्टींचा उलगडा होईल !

श्रीशिवाजीमहाराजांच्या जन्मदिनाचा वाद थांबेल, तुकाराममहाराजांच्या सदेह वैकुंठागमनाचें कोडें उलगडेल, श्रीज्ञानेशांचें जन्मग्राम कोणचें होतें तें पाहायला मिळेल, श्रीसमर्थांनी राजकारण केलें कां नाही—शिवबांची आणि त्यांची भेट केव्हा झाली होती—श्रीनामदेवमहाराज पूर्वायुष्यांत खरोखरच दरोडेखोर होते का नव्हते ?

—आणि लोकमान्य टिळकहि पुन्हा पाहायला मिळतील !

—असा शोध शास्त्रज्ञ पुढे कदाचित् लावतीलहि; पण माझ्या डोळ्यांसमोर १९२० सालचा तो तरुण श्रीवास्तव अजूनहि जसाच्या तसा दिसतो आहे !

—तो श्रीवास्तव अजूनहि जिवंत आहे !

—पण आता तो म्हातारा झालेला आहे !

——त्याच्या घरांत जिकडे तिकडे त्याच्या तरुणवयाचेच फोटो लावलेले आहेत—पण त्याच्या सध्याच्या वयाचा आणि स्थितीचा एकहि फोटो त्यांत लावलेला नव्हता !

त्या त्याच्या तरुणपणच्या फोटोकडे आणि सध्याच्या स्थितीकडे पाहून माझ्या मनाची मोठी तारांबळ उडते.

——उदबत्ती जळून जावी आणि उदबत्तीच्या आंतील राखेची काडी जशीच्या तशीच उभी राहावी !

माझ्या दृष्टीने त्याच्या आयुष्याची उदबत्ती जळाली होती—पण त्या जळून गेलेल्या उदबत्तीचा खरा वास कुणालाच आला नव्हता !

घरांत डी. डी. टी. मारलेली असावी आणि तिथे एक उदबत्ती जळत राहावी !

——वास येतो डी. डी. टी. चा आणि उदबत्ती मात्र जळून जाते !

मला अजूनहि वाटतें, श्रीवास्तव जगाला कळला नाही, त्याचें तरुणपणचें एकहि मनोराज्य फळा-फुलाला आलें नाही.

——श्रीवास्तवचें मनोराज्य——मनोराज्य हा शब्द चूक आहे—श्रीवास्तवचें हक्काचें स्थान त्याला आयुष्यांत मिळालें नाही !

——श्रीवास्तवच्या खणखणीत आणि तेजोगर्भ वक्तृत्वाला खऱ्या आयुष्यांत सार्वजनिक व्यासपीठ कधी लाभलें नाही !

——कारण त्याला ‘ शिक्षकाचें ’ आयुष्य जगावें लागलें – परिस्थितीने पत्करावें लागलें !

श्रीवास्तवचीं मनोराज्यें आणि तारुण्य रंगत होतें तोंच त्याचे वडील वारले-घरच्या माणसांकरिता त्याला शिक्षण अर्धवट सोडून शिक्षक व्हावें लागलें !

——देशाचें कल्याण—लोकांचें कल्याण !

——खरें आहे !

—पण आपल्या आईचें काय ? बहीण-भावंडांचें काय ? माझ्या महत्त्वाकांक्षेकरिता—मनोराज्याकरिता—यांना कुठे वाऱ्यावर सोडूं ? देशांतल्या माणसांची काळजी करायची—मग माझ्या घरांतलीं हीं माणसं नव्हत का ?

श्रीवास्तवचें मन घुसमळलें. घरच्या माझ्यावर अवलंबून असलेल्या

माणसांना वाऱ्यावर सोडून मी माझ्या महत्त्वाकांक्षांच्या मागे धावूं ?

– यांत मला समाधान मिळेल का ?

– श्रीवास्तव इथे घुटमळला. त्याने आपल्या भावी आयुष्यांतील महत्त्वाकांक्षांच्या माना स्वतःच्या हाताने मुरगळल्या आणि त्याने ठरविलें आपल्या कुटुंबाकरिता आपण सामान्यच आयुष्य घालवायचें ! आणि त्याने एका शाळेंत शिक्षकाची नोकरी धरली !

– आणि श्रीवास्तवच्या दुर्दैवाने तो प्रामाणिक होता !

– आणि त्या प्रामाणिकपणाच्या दुर्गुणाने शाळा हाच त्याच्या आयुष्याचा पिंजरा ठरला !

– जें पत्करलें तें प्रामाणिकपणाने केलें पाहिजे ही त्याची मनोधारणा आणि भावना–त्यामुळे शिक्षकाच्या आयुष्याशीं तो प्रामाणिक राहिला. शिक्षक म्हणजे नोकरी ही त्याची भावना कधींच नव्हती. तें एक ‘ आयुष्य ’ आहे–विशाल परिणाम करणारें एक लहानसें ‘ आयुष्य ’ आहे ही त्याची भावना !

– पालकांनी मुलें आपल्या ताब्यांत दिलीं आहेत–त्यांच्या आयुष्याशीं आपण खेळायचें नाही–त्यामुळे आपल्या आयुष्याचा खेळ झाला तरी चालेल, नव्हे आपल्या आयुष्याचा खेळ, खुळखुळा त्याने आपल्या हातानेच करून घेतला.

श्रीवास्तव वर्गांत शिकवितांना तल्लीन होई ! नुसतीं पुस्तकें शिकवितात ते शिक्षक ही अलीकडची भावना त्याची कधींच नव्हती.

विद्यार्थ्यांना पुस्तकी ज्ञानाबरोबरच ‘ संस्कार ’ द्यायचे असतात ही त्याची भावना–आणि विद्यार्थ्यांना संस्कार द्यायचे म्हणजे ते शिक्षकाच्या जीवनांत दिसायला नकोत का ?

श्रीवास्तवने आपलें वाचन वाढविलें. तो शाळेंत जितक्या वेळ शिकवी तितका वेळ त्याचा घरीं वाचनांत जाई.

आणि शिक्षकाचें आयुष्य म्हटलें की, माझ्या डोळ्यांपुढे एक भयाण कल्पना उभी राहते !

एक खूप मोठी अत्यंत विशाल अशी दरी असावी, त्या दरीच्या एका बाजूला विशाल असें सृष्टिसौंदर्य–निसर्गाने उधळलें आहे. त्या दरीचा

भयाणपणा वाढविण्याकरिता पाठीशीं केवढा तरी विशाल डोंगर उभा आहे. डोंगराची उंची आणि भव्यता आकाशाला भिडूं पाहत आहे, आणि हा डोंगर आता आपल्याला चिकटणार की काय या भीतीने आकाश फाटत चाललें आहे—त्या फाटलेल्या आकाशाची सावली पडून ही विशाल दरी निर्माण झाली आहे की काय असा भास मनाला होत आहे—पलीकडे मानवी जीवनाला धुंद करणारा आणि 'माज' आणणारा समुद्र खेळतो आहे, डरकाळ्या फोडतो आहे.

—ती दरी कांही माणसांना तरून जायची आहे—ती दरी तरून जाण्याकरिता एक जीवनाशेचा दोर टाकला आहे—आणि त्या एकाकी दोराला धरून कांही माणसांचें प्रवास चालू आहेत—तो दोर मध्येच तुटेल की काय, या धास्तीने—त्या दोराला लटकलेल्या माणसांना—आजूबाजूच्या सृष्टिसौंदर्याकडे पाहतां येत नाही—सागराची गर्जना सहन होत नाही—आणि अगदीं डोळे मिटून सरकत जावें तर आपण कुठून चाललों आहोंत याची त्या माणसांना जाणीव देण्याकरिता आपल्या घरच्या अंगणांत कुत्रीं—मांजरीं खेळावींत त्याप्रमाणे वन्यश्वापदें त्या दरीभोवतीं डरकाळ्या देत हिंडत आहेत—त्या दोरावरून माणसें सरकत सरकत चाललीं आहेत—जरा कुठे लक्ष विचलित झालें की, पडला दरींत आणि मेला——

—शिक्षकाचें आयुष्य इतकें भयाण आणि खडतर आहे असें मला वाटतं !

पण तो माझा प्रश्न नाही !

—आता माझ्या डोळ्यांसमोर आहे फक्त श्रीवास्तवचें आयुष्य !

—अशा दरीवरचा दोर धरून त्याने आपल्या साऱ्या आयुष्याचा प्रवास केला !

तें आयुष्य आता पेन्शनींत निघालें होतें. म्हातारें झालें होतें !

—पण अद्यापहि म्हाताऱ्या श्रीवास्तवचा उत्साह मात्र तरुणपणचाच होता. निराशा त्याच्या तोंडावर दिसत नव्हती ! त्याच्या बोलण्याला धार पहिल्यासारखीच होती. पण आता त्या बोलण्याला चारित्र्यवान् आयुष्याचें तेज आलें होतें !

—मला फक्त त्याच्या म्हातारपणची हळहळ वाटत होती ! म्हातारपणची नव्हे—डोळ्यांत न भरण्यासारखें कर्तृत्वशून्य तारुण्य घालवून असें म्हातार-

पण आल्याबद्दल हळहळ वाटत होती.

—श्रीवास्तवने संसार केला. बिचाऱ्याला चांगली बायको मिळाली. त्याचीं मुलें सद्‌गुणी निघालीं. श्रीवास्तवच्या मुलांनी आपल्या बापाचें दारिद्य कधी उघडें पडूं दिलें नाही. आहे त्यांत आनंद मानायचा आणि परिस्थितींतून मार्ग काढायचा या तत्त्वज्ञानावर त्यांनी आनंदानं दिवस काढले!

त्यांना आपल्या बापाचा अभिमान होता.

आणि श्रीवास्तवच्या मुलांना जितका त्याचा अभिमान होता—तितकाच अभिमान त्याच्या हाताखाली शिकून गेलेल्या मुलांना—विद्यार्थ्यांना त्याचा अभिमान होता.

श्रीवास्तव या शिक्षकाची आठवण कोणीहि विद्यार्थी विसरला नव्हता.

आणि श्रीवास्तवच्या हाताखाली तयार झालेल्या चार-पांच विद्यार्थ्यांना त्यांच्या आयुष्यांत पुढे जें यश मिळालें त्याला सर्वस्वी श्रीवास्तवचे परिश्रम कारणीभूत होते. ते चार-पांच विद्यार्थी तर 'श्रीवास्तवला' देव मानीत!

——आणि योग असा आला होता की या वर्षी (१९५६) लोकमान्य टिळकांची जन्मशताब्दि साजरी झाली, त्याच दिवशीं श्रीवास्तवच्या आयुष्याला साठ वर्षे पूर्ण झालीं होतीं.

त्याच्या विद्यार्थ्यांनी श्रीवास्तवच्या साठीचा उत्सव करावयाचें ठरविलें. श्रीवास्तव संमति देईना.

——पण विद्यार्थ्यांनीं त्यांचें ऐकलें नाहीं.

——जमलेल्या विद्यार्थ्यांनी आपापल्या ऐपतीप्रमाणे श्रीवास्तवला आहेर केले. श्रीवास्तवचे डोळे पाण्याने भरून आले. तो म्हणाला, "आज मोठ्या झालेल्या माझ्या विद्यार्थ्यांनो, माझ्या मुलांइतकेच तुम्हीं मला प्रिय आहांत—तुम्हीं मला या देणग्यांनी बांधून काढलें आहे—याचा मी कसा उतराई होऊं?"

विद्यार्थ्यांनीहि गहिवरून म्हटलें——

"गुरुजी, आम्हीं जें कांही दिलें त्यापेक्षा विद्येच्या रूपाने आम्ही तुमच्यापासून जास्त घेतलें आहे! तरीहि तुम्हांला आमच्या करणीने जर भारावल्यासारखें वाटत असेल तर आम्हांला या प्रसंगाच्या निमित्ताने तोंड

भरून आशीर्वाद द्या—आणि आमच्या शालेय-जीवनांत—होऊन गेलेल्या थोर पुरुषांच्या—जयंतीच्या निमित्ताने आपण जीं व्याख्यानें देऊन आम्हांला भारून टाकीत असा—तसा या प्रसंगाने आम्हांला उपदेश करा-तो उपदेश आमच्या आयुष्याची सोबत करील !"

विद्यार्थ्यांची ही विनंती ऐकून—श्रीवास्तवांना भारावल्यासारखें झालें. त्यांचा कंठ दाटून आला. ते तिरमिरीने उभे राहिले आणि भावनातिरेकाने म्हणाले, "माझ्या एके काळच्या प्रिय विद्यार्थ्यांनो, नव्हे माझ्या मुलांनो, आज तुम्हीं मोठे मोठे झाला आहांत? आयुष्यांत मार्गी लागला आहांत! जीवनाचा स्वतंत्र अनुभव घेत आहांत ! मी जितकें वाचलें नसेल इतकें आज तुमच्यापैकी अनेकांचें वाचन असेल.

—तेव्हा तुम्हांला उपदेश करण्याच्या भानगडींत मी पडत नाही—आशीर्वाद मागत आहांत—तो माझ्या वाढलेल्या वयाचा फायदा घेऊन मी तुम्हांला देत आहे !

—तुम्हां सर्वांचें सर्वदा कल्याण व्हावें !

पण आज मी या प्रसंगाच्या निमित्ताने माझ्या आयुष्यांतील अनुभवाचें सार तुम्हांला सांगणार आहे. तुम्हांला तें कदाचित कटु वाटेल—किंवा ज्या मोकळेपणाने मी सांगणार आहे, त्यामुळे तुम्ही माझ्याविषयी जो आदर ठेवलांत तो चूक होता असेंहि कदाचित् तुमच्यापैकी कांहींना वाटेल !

—पण मी आज आपलें अंतःकरण तुमच्यापुढे उघडें करणार आहें !

—आज ज्या विभूतीचा जन्मशताब्दि साजरा होत आहे त्या लोकमान्य टिळकांचे जन्मशताब्दीच्या दिवशीं माझ्या वयाला साठ वर्षे पूर्ण होत आहेत हा एक गंमतीदार आणि मला अभिमान वाटण्यासारखा योगायोग आहे !

—पण ज्या वर्षी लोकमान्य दिवंगत झाले त्या वर्षी माझें वय चोवीस वर्षांचें होतें. माझ्या शालेय जीवनापासून माझ्या अंगीं बऱ्यापैकी वक्तृत्व होतें ! लोकमान्यांच्या निधनानिमित्त आम्ही कॉलेज—विद्यार्थ्यांनी एक सभा घेतली होती आणि त्या दिवशीं "ज्यूरीने कसाहि निकाल दिला —तरी मी निर्दोषी आहे—अशी माझी मनोदेवता मला सांगत आहे—पण वस्तुजाताच्या नियतीचें नियमन करणारी सत्ता याहूनहि श्रेष्ठ आहे—ही

'सिंहगर्जना' मीं उद्गारून दाखविली होती आणि त्या वेळचा माझा अभिनिवेश असा होता—माझ्या आयुष्याची महत्त्वाकांक्षा अशी होती—की त्या महाभागासारखें थोडेंतरी आपल्याला आयुष्य घालवायला मिळेल !

—पण आयुष्यांत मला अशी संधि आली नाही. घरच्या परिस्थितीमुळे मी कांही करूं शकलों नाही—मी माझ्या जीवनांत जखडलों गेलों—मी स्वतः माझें आयुष्य बांधून घेतलें. माझ्या बरोबरचे जे सहप्रवासी होते—त्यांतील कांहींना—कर्तबगार आयुष्य लाभलें !

—आणि खरं सांगूं, प्रथम प्रथम मला त्यांच्या आयुष्याचा हेवा वाटत होता ! मी माणूसच आहे !

'ज्यूरीनें कसाहि निकाल दिला तरी मी निर्दोषी आहे !' असें तो लोकमान्य महाभाग म्हणाला—माझ्याहि अंगांत अनेक गुण असून—माझ्या कुटुंबाकरिता मी माझ्या महत्त्वाकांक्षेचा त्याग केला——कारण देशाचें हित पाहणें हें जसें कर्मवीर महाभागांचें काम आहे—तसें कुटुंबाचें हित—चांगलें हित-पाहणें हें माझ्यासारख्या सामान्याचें काम होतें ! पण, आपण आयुष्यांत असामान्य ठरणार आहोंत असें प्रत्येक तरुण सुशिक्षिताला वाटत असतें. माझाहि लोकभ्रम होता ! पण माझा भ्रमनिरास लौकरच झाला !

—सर्वांनाच लोकमान्य—शिवाजी—महात्मा गांधी होतां येणार नाही—आणि कोणत्याहि देशाला इतक्या अनेक लोकमान्यांची, असंख्य—शिवाजींची—आणि लाखो महात्मा गांधींची गरजहि नाही !

——खरें जीवन आहे—तें सामान्य आयुष्यांत आहे !

सर्वांना सारखी संधि हें भ्रमवाक्य आहे !

सृष्टीची रचनाच अशी आहे की, सर्वांना सारखी संधि कधी मिळणेंच शक्य नाही !

——रशियांत स्टॅलिनच्या बुद्धिमत्तेचा काय एकच माणूस होता? रशियाचे बाकीचे बुद्धिमत्तेचे स्टॅलिन कुठे गडप झाले? कुठे कुणाला पत्ता लागला—त्यांच्या नशिबीं कोणती संधि आली त्याचा?

—तेव्हा सर्वांना सारखी संधि हें भ्रमवाक्य आहे !

सामान्य आयुष्यांत अनेकांना असामान्य होतां येईल ते फक्त चारित्र्याने !

कदाचित् सर्वांना सारखें अन्न, वस्त्र आणि निवारा मिळूं शकेल—पण सर्वांना सारखी संधि अशक्य—अशक्य—त्रिवार अशक्य !

......सर्वांना सारखा निवारा—तेंहि कठीणच ! पूर्वींच्या राजांचें राजवाडे—आता लोकांच्या डोळ्यांत भरतात ! ते त्यांनी प्रजेची पिळवणूक करून बांधले असें आज प्रचारांत सांगितलें जातें—पण लोकनेता स्टॅलिन काय झोपडींत राहत होता ?

——फक्त शब्दांचा फरक !

पूर्वी अशा माणसाला राजा म्हणत—आता लोकनेता म्हणतात !

——नांवें बदललीं पण मनःप्रवृत्ति तीच !

पूर्वी राजेलोक आपल्या लहरीने माणसांच्या कत्तली करीत !

स्टॅलिनच्या राज्यांत कत्तली झाल्या—पण त्याला कत्तली म्हणायचें नाही; त्याला म्हणायचें, पक्षाचें शुद्धीकरण. फक्त शब्दांचा फरक—घोषवाक्यांचा फरक !

परिस्थितींत फरक झाला आहे तो विज्ञानाच्या शोधामुळे झाला आहे—मनुष्यस्वभावाच्या सुधारणेमुळे नव्हे !

—पूर्वी विजेचा शोधच नव्हता—आता लागला म्हणून मजुरांच्याहि झोपड्यांत वीज आली हा टेंभा मिरवितां येतो—पण पूर्वीहि मजूर दिवे लावीतच होते ! आणि राजेहि दिवेच लावीत होते. पणती आणि झुंबर असा फरक पूर्वी होता—निराळ्या स्वरूपांत आजहि तो कायम आहे !

—तेव्हा अर्थकारण, राजकारण याच्यावर माणसाचें सुख अवलंबून नाही—तें आहे सच्चारित्र्यावर—माणसाच्या शिलावर आणि वागण्यांतल्या माणुसकीवर !

——परवाच रशियाचे पाहुणे हिंदला भेट देतांना कोपरखळी देत म्हणाले, ' हिंदुस्थानांतला ताजमहाल निर्माण झाला श्रमजीवि मजुरांच्या रक्तावर ! ' आणि स्टॅलिनचे राजवाडे काय स्वतः त्यांनी—क्रुश्चेव्ह—बुल्गॅनिन—मोलोटोव्ह यांनी आपल्या हातांनी बांधले ?

—श्रमविभाग हे कोठेहि राहणारच !

—तेव्हा विद्यार्थि मित्रांनों—मुलांनो ! लक्षांत ठेवा, भारताचा वारसा अध्यात्माचा आहे—चारित्र्यसंपन्नतेचा आहे !

सामान्यांत असामान्यत्व पाहण्याचा आहे ! अनेकांत एकत्व पाहण्याचा आहे–आणि तसें जागण्याचा आहे !

—मी असामान्यच आयुष्य जगलों–स्वार्थत्यागाने जगलों–माझ्या आयुष्यांतली निराशा, मनोभंग विचाराने मागेच संपली आहे !

तुम्हीं जें प्रेम मला दिलेंत पूर्वींहि देत आलांत–आज जी माझ्याबद्दल सार्वजनिक कृतज्ञता दाखविलीत–आज लहानशा लोकमान्यांचें आयुष्य जगल्याचा आनंद मला मिळाला आहे !

—हा आनंद मला श्रीमंतीने मिळाला नसता–आयुष्यांत असा आनंद मिळविण्याचा–निर्माण करण्याचा–ध्यास घ्या !

—मला आता कांही बोलायचें नाही ! आणि मला बोलतांहि येत नाही. माझा कंठ गहिंवरून आला आहे ! ”

श्रीवास्तवांचें भाषण संपलें.

सर्वत्र शांत–शांत होतें !

वातावरण आनंदाने भरून गेलें होतें !

जणूं समुद्रमंथनांतून निघालेला एकेक अमृतकलशच तिथे जमलेल्या प्रत्येकाच्या हातीं आला आहे !

—आणि हा प्रसंग कळल्यानंतर श्रीवास्तवच्या आयुष्याबद्दल मला जी विनाकारण हळहळ वाटत होती ती संपली–आता माझ्या डोळ्यांसमोरचा तो म्हातारा श्रीवास्तव अदृश्य झाला आहे–आणि क्षणोक्षणीं वाटणाऱ्या आणि विकास पावणाऱ्या एखाद्या रम्यमनोहारी आणि निरागस वार्धिष्णु बालकासारखा श्रीवास्तव माझ्या डोळ्यांपुढे नाचतो आहे !

● ● ●

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ३५६५४...... दि: ..................
क्रमांक ........................ नों दि ........
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
४५२३६

# बारा

आज ज्या माणसाची मी हकीगत सांगणार आहे, त्या माणसाची तशी मला फारच थोडी माहिती आहे. तरीहि तो माणूस माझ्या फारच चांगला लक्षांत राहिलेला आहे हें जितकें खरें, तितकेंच हें खरें आहे की, इतर लक्षांत राहिलेलीं माणसें मी एक वेळ विसरेन; पण प्रयत्न करूनहि आज ज्या माणसाची मी हकीगत सांगणार आहे तो माणूस मी विसरणें शक्य नाही.

त्या माणसाचें नांव......खरें नांव नाही सांगत. त्याचें आम्हीं जें टोपणनांव ठेवलें आहे, तें सांगतों. आम्हीं गमतीने त्या माणसाचें नांव ठेवलें होतें ' यांत्रिक माणूस '.

होय ! यांत्रिक माणूस.

दिसायला गोरा-गोरापान. उंचीने लक्षांत राहण्यासारखा. कपडे नेहमी परीटघडीचे. डोक्यावरची टोपी एका ठराविक कोनांत वाकडी आणि नेहमी तशीच ! शिक्षणांत त्याने कांहीतरी पदवी मिळविलेली होती. त्या पदवीच्या अद्याक्षरासुद्धा त्याच्या नांवाची पाटी त्याच्या घरावर झळकत होती !

तो घरचा सुखवस्तु होता. आज त्याचें वय पन्नाशीच्या जवळ-जवळ आहे. वयाच्या तेविसाव्या वर्षी त्याचें लग्न झालें. पण आजतागायत तीं नवरा-बायको दोघेंच आहेत !

त्याचें सत्तेचें घर आहे. घर आहे लहानसेंच; पण तें त्यांनी सुस्थितींत ठेवलें आहे. घराला ठराविक वेळीं रंगसफेती होते. त्यांनी आपल्या घराचा रंग कधी बदलला नाही, तसा त्यांनी आपल्या अंगांत घालण्याच्या कपड्यांचाहि रंग कधी बदलला नाही. दिवसांतला कांही ठराविक वेळ तो आपल्या घराच्या दरवाजांत उभा राही. तीहि वेळ त्याने कधी बदलली नाही !

सकाळचें ऊन अंगावर घेत तो रोज सकाळीं आपल्या घराच्या दरवाजांत उभा राही. संध्याकाळीं मावळतीकडे तोंड करून तो आपल्या घराच्या दारांत उभा असे.

अर्थात् त्या वेळीं रस्त्याने रहदारी वाहत असायचीच. त्यांत याच्या ओळखीचे अनेक असायचे. कुणाला नुसताच नमस्कार करायचा–कुणाकडे नुसतें हसत हसत पाहायचें–कुणाकडे तरी पाहून "अरे वा !" म्हणायचें, हें सुद्धा त्याचें ठरलेलें असे !

त्याची माझी ओळख झाली पंचवीस वर्षांपूर्वी !

–अशाच एका सकाळीं !

–तो आपल्या दारांत सकाळचें ऊन अंगावर घेत उभा असतांना !

त्या वेळीं माझी 'कोणती तरी' एक कथा प्रसिद्ध झाली होती आणि लोकांना त्या वेळीं ती आवडली होती. त्या आवडणाऱ्या लोकांत तोहि होता. त्या वेळीं मला नुकतीच प्रसिद्धि मिळाली होती !

–इंग्रजींत 'लोकांशीं कसें वागावें' या विषयावर कांही गाजलेलीं पुस्तकें आहेत वाटतं ! मला माहीत नाही; पण त्यांत असें लिहिलें आहे म्हणे की, "कुणाबद्दलहि चांगलं बोलावं–नेहमी हसतमुख असावं–प्रत्येकाला आपुलकी दाखवावी–दुसऱ्याबद्दल बोलतांना स्तुतीची काटकसर करूं नये, तर थोडें झुकतेंच माप द्यावें–बोलून चालून शब्दच ते ! चार चांगले शब्द दुसऱ्याबद्दल जास्त वापरले म्हणून आपलें काय बिघडलें ?"

मलाहि प्रसिद्धि नुकतीच मिळाली होती–आणि त्यानेहि तें 'इंग्रजी पुस्तक' नुकतेंच वाचलें होतें !

[ हा महत्त्वाचा संदर्भ लक्षांत ठेवून वाचकांनी पुढील मजकूर वाचावा अशी नम्र विनंती आहे. ]

" वाः वाः ! जोशीबुवा, मराठीचे तुम्ही युगप्रवर्तक कथालेखक आहांत ! वाः ! काय तुमची भाषा–जणूं काव्यच. फक्त त्यांत ठराविक अंतराने चरणरेघा टाकलेल्या नसतात म्हणून त्याला गद्य म्हणायचें– तुमच्यासारखा लेखक मराठीला मिळाला हें मराठीचें भाग्य आहे ! " आणि या बोलण्यानंतर त्याचें साखरेसारखें गोड हास्य !

त्या त्याच्या ' आगाऊ ' भाषणाचा माझ्यावर बिलकूल परिणाम झाला नाही–पण त्याच्या ' हास्याचा ' मात्र परिणाम झाला !

तें हास्य नेहमी पाहत राहावें–नेहमी ऐकायला मिळावें–हा आपला मित्र असावा–अशी भावना माझ्या मनांत निर्माण झाली. मी त्याच्याकडे ओढला गेलों–आम्ही मित्र झालों.

पण ती आमची मैत्री फक्त वर्ष दोन वर्षंच टिकली. अजूनहि आम्ही एकमेकांशीं बोलतों. तो अजून माझ्याकडे पाहून तसंच हसतो !

–अगदी बालवयांत रस्त्याच्या कोपऱ्यावर कोणत्याहि दगडाला शेंदूर लावलेला पाहिला की, मुलें त्या दगडाला नमस्कार करतात. पुढे मुलें मोठीं झालीं की, त्या ' शेंदूर लावलेल्या ' दगडाकडे त्यांचें लक्षहि जात नाही–पण तो दगड तिथेंच असतो–ठराविक वेळेला त्यालाहि शेंदूर लागतो– मोठीं झालेलीं मुलें जरी त्या दगडाला नमस्कार करीत नाहीशीं होतात – तरी नवीन ' बाल्य ' जन्म घेतच असतें– त्या रस्त्यांनी जातच असतें– त्या दगडाला नमस्कार होतच राहतात ! त्या दगडालाहि आपल्याला कांही कमी पडलें आहे याची जाणीव कधीच होत नाही !

वर्ष दोन वर्षांतच ' अशा शेंदूर थापलेल्या दगडांत ' आणि माझ्या त्या मित्रांत कांहीहि फरक नाही असें मला आढळून आलें !

त्याच्या डोक्यावरची टोपी–जशी ठराविक कोनांत वाकडी ठेवलेली असे; तसें त्याचें हसणेंहि नेहमी मोजकें–आणि घड्याळ लावून दहा सेकंद टिकणारें असें !

–लोकांबद्दल एवढेंच हसायचें त्याने ठरविलेलें होतें !

–आणि माझ्याबद्दलच नव्हे–प्रत्येक ओळखीच्या माणसाबद्दल तो असें मोजकें आणि मापलेलेंच हसे !

लोकांची स्तुति करण्याचे त्याचे शब्द ठरलेले होते–त्या शब्दांची लांबी-

रूढी ठरलेली होती !

माझ्याप्रमाणेच त्याचे अनेक लेखक स्नेही होते. लेखकालेखकांत फरक असतोच—पण प्रत्येकाबद्दल त्याचें दिखाऊ मत एकसारखेंच होतें—आणि मला तर नंतर शंका येऊं लागली—त्याने आमच्यापैकी कोणाचेंहि वाङ्मय फारसें वाचलेलें नसावें—कारण त्याने तें वाचलें असतें, तर सर्वांबद्दल एका मापानेच तो बोलला नसता—हसला नसता !

—वर्ष दोन वर्षांच्या त्याच्या संगतींतच मला आढळून आलें की, त्याला खऱ्या जिव्हाळ्याचा स्नेही कोणींच नव्हता. कोणी असावा अशी त्याची इच्छाहि नव्हती !

—त्याचा जिवलग स्नेही म्हणजे फक्त तें 'इंग्रजी पुस्तक' की ज्यांत—'सर्वांबद्दल स्तुतीचें उत्साहवर्धक बोलावें—नेहमीं हसतमुख असावें—असें सांगितलें आहे—ते पुस्तक !

—ज्या त्याच्या 'प्रथमदर्शनीं' पाहिलेल्या हास्यावर त्याच्याशीं मैत्री असावी या इच्छेने मी हुरवळून गेलों होतों, तें त्याचें हसणें अजून कायम आहे—पण मला मात्र आता त्या हास्याबद्दल अजिबात आपुलकी उरलेली नाही—ऐवढेंच नव्हे तर चीड आलेली आहे ! तें हसणें पुन्हा ऐकायला येऊं नये—दिसूं नये—म्हणून मी शक्य तोंवर त्याच्या घरावरून जाण्याचें टाळतों—तें हसणें दिसूं नये—

—तें औपचारिक आकाराचें लाकडी रंगीत फळ ?

—तो कृत्रिम माणूस—तो 'यांत्रिक माणूस.'

कुणाबद्दलहि खरी आपुलकी नाही ! खरा जिव्हाळा नाही— फक्त आपल्याबद्दल लोकमत चांगलें असावें या इच्छेने—कुणाबद्दलहि चांगलें बोलणारा—ठराविक साचाने हसणारा—

—त्या हसण्याचा वेळीं ठराविक पद्धतीने व्यायाम करणारा !

—दिवस पावसाळ्याचे होते. पाऊस पडत होता. रस्त्याने रहदारी अजिबात नव्हती. मीच कांही कामाकरिता घराबाहेर पडलों होतों. आणि पावसाने खूपच जोर केल्यामुळे तो पाऊस टाळण्याकरिता—मी माझ्या त्या यांत्रिक मित्राच्या घरीं थोडा वेळ काढावा म्हणून त्या घरांत शिरलों होतों. ती वेळ त्याची दरवाजांत उभें राहण्याची होती. पण पाऊस पडत

असल्यामुळे आणि रस्त्याने रहदारी नसल्यामुळे तो आता घरांत बसला होता.

—पण ' सवय ' हा माणसाचा दुसरा देहधर्म बनतो.

—तो टेबलावर ठेवलेल्या आरशांत बघून— लोकांकडे पाहत ' हसायची जी त्याला सवय झाली होती— तें हसणें तो आज आरशांत आपल्याच प्रतिबिंबाकडे पाहून ठराविक पद्धतीने हसत बसला होता !

—खिडकींतून— त्याचा तो हसण्याचा व्यायाम मला दिसला— मला चीड आली. इतक्यांत बाहेर पावसची केवढी तरी सर आली— तें हसणें मला आता डोळ्यांसमोर नको होतें— तें टाळण्याकरिता मी त्या धो धो पडणाऱ्या पावसांत—त्यांत आता वाऱ्यानेंहि जोर केला होता—काड—काड विजा चमकूं लागल्या होत्या—नदीचा बांध फुटल्याप्रमाणे आता रस्त्यावरूनहि पाणी वाहूं लागलें होतें—त्या पाण्याच्या ओघांत चालणें अशक्य होत चाललें होतें—पण या आधिभौतिक प्रसंगाला तोंड देणें परवडलें—पण तें हास्य—तें हसणें—तो हसण्याचा कृत्रिम अभिनय पाहणें आपल्याला झेपणार नाही मानवणार नाही हें मनोमन पटल्यामुळे मी तशा पावसांतून शांतपणे, धीमेपणाने मार्ग काढीत माझ्या घराकडे परतलों— पण तें हास्य टाळलें !

—आणि तेव्हापासून मी त्या माणसाचें नांव ठेवलें ' यांत्रिक माणूस ! ' त्या दिवसापासून त्याच्याबद्दलचा माझा जिव्हाळा संपला—पण त्याचें हसणें ठराविक ठशाने चाललेंच आहे.

आल्या गेल्याला तो आपल्या हास्याच्या वाकुल्या दाखवीतच आहे ! —आणि ज्यांना तें नवीन आहे तें त्याच्याकडे आकर्षिले जातच आहेत !

● ● ●

# तेरा

‘ लक्षांत राहिलेलीं माणसें ’ आठवलीं तशीं लिहिलीं आणि ‘ प्रसाद ’ मासिकांत एखादें नवें सदर ‘ दीपावलि’ अंकापासून सुरू करावें या विचारांत होतों.

पण, पुष्कळ वेळेला आयुष्यांत ठरवावें तें होत नाही आणि अनपेक्षित पुष्कळ होऊन जातें. तसेंच झालें. ‘ लक्षांत राहिलेल्या माणसांत ’ आणखी एक व्यक्तिचित्र मला लिहावें लागत आहे व आज मी तें आनंदानें

कारण त्याला माझा इलाजच नव्हता.

वेळ सकाळची होती. सगळीकडे कसें शांत होतें. माझें मनहि शांत होतें. माझ्या लिहिण्याच्या टेबलासमोरच असलेल्या ‘ श्रीपाद श्रीवल्लभाच्या तसबिरीकडे मी निर्विकार मुद्रेने पाहत होतों. टेबलावर एक उदबत्ती लावून ठेवली होती. तिचा सुवासिक धूम्र वारा त्या तसबिरीमधून आणि माझ्यामधून वाहत होता. सगळें कसें प्रसन्न प्रसन्न होतें.

माझी बसायची खोली एकीकडे आहे. घरांतून येणाऱ्या चहाची मी वाट पाहत होतों. तोंच हलकेंच दार उघडलें गेलें. मला वाटलें, माझी एखादी मुलगीच चहाचा कप घेऊन हळूच येत आहे.

पण दार उघडून सत्तरीच्या सुमाराचा एक नवखा गृहस्थ आंत आला. दाढी खूप वाढलेली, केस पिकलेले, अंगांतले कपडेहि तसेच.

चेहरा ओशाळगतासारखा. माझी पहिली कल्पना झाली, 'हा कांही तरी निमित्त सांगून कांही मदतीची अपेक्षा करणार माझ्याजवळून!' असें वाटण्याइतका त्याने मला लवून नमस्कार केला.

'काय पाहिजे?' मी थोडेंसें निर्विकार मनाने विचारलें.

'तुमच्याशीं थोडसं बोलायचं आहे– एक अर्धा तास. तुमच्याजवळून मला कांही मागायचं नाही किंवा मला कांही तुम्हांला द्यायचं नाही. कृपा केलीत तर फक्त अर्धा तास तुमच्याशीं बोलायची इच्छा आहे.' आणि गयावया करून मान वेळींत तो म्हणाला, 'माझ्या पोशाखावरून जाऊं नका. परवा वर्तमानपत्रांत वाचलंच असेल आपण–...संस्थेला एक हजार रुपयांची देणगी माझ्या सत्तराव्या वाढदिवसानिमित्त जाहीर झालेली आहे तो मी!'

'बाप रे–!' मी मनांतल्या मनांतच उद्गारलों.

'पण ती देणगी मी दिलेली नाही!' तो खजिलपणाने म्हणाला.

'पण कोणी का होईना–दिलेली आहे ना?' मीं खुलाशाकरिता विचारलें.

'होय–दिलेली आहे–अगदी त्या संस्थेच्या चिटणिसाला घरीं बोलवून–हाक मारून दिलेली आहे–पण मी नाही!' त्यांनी माझ्या खोलींत असलेल्या 'श्रीपाद श्रीवल्लभा' च्या तसबिरीला नमस्कार करीत म्हटलें, '–आणि ती हकीगत सांगायला मी ओळख नसतांना आपल्याकडे आलों आहें,–ती ऐकून घ्यावी एवढीच हात जोडून विनंती!' त्याने मलाहि तितक्याच आदराने नमस्कार केला.

आज घरबसल्या कांहीतरी चांगलें ऐकायला मिळणार, अशी माझी कल्पना झाली. मी बसल्या जागेवरून घरांत दोन कप चहा आणायला सांगितला.

'चहा कशाला? मी चहा घेत नाही.' तो गृहस्थ नम्रपणाने म्हणाला.

'अस्सं?' मी बसल्या जागेवरून पुन्हा घरांत सांगितलें, 'दोन चहा नको हं—एक कप चहा आणि एक कप दूध!'

'बरं–दुधांत साखर नको हं!'

चहा व दूध आलें.

त्यांनी दूध प्यायला आणि मी चहा प्यायला सुरुवात केली.

'......त्या हायस्कूलचे मुख्याध्यापक आपणांस ऐकून माहिती असतील ?' त्याने हळुवारपणे विचारलें.

'हो, ऐकून माहीत आहेत.' मीं म्हटलें.

'तो माझा थोरला मुलगा !'

'बरं—'

'त्याच्या खालचा मुलगा नंबर दोन ..एका व्यापारी कंपनींत नोकरीला आहे–साडेतीनशे रुपये पगार मिळतो त्याला !' तो गृहस्थ दूध प्यायचा थांबला होता–आणि दुधाच्या कपांत बहुतेक तो आपल्या त्या दोन्ही मुलांचीं प्रतिबिंबें पाहण्याचा प्रयत्न करीत असावा.

'...मग, त्या मुलांचें तुमचें पटत नाही ?' हा माझ्याकडे कशाकरिता आला आहे याचा कयास काढण्याकरिता मी विचारलें.

"...नाही..., नाही, तसं कांही नाही...सगळीं मुलं माझ्या ऐकण्यांत आहेत. माझा प्रश्न असा आहे की, त्यांनी माझें इतकें कां ऐकावें ?...हसूं नका...माझी सगळी हकीगत ऐकून घ्या...मला एकंदर मुलगे सात... दोन मुलांची परिस्थिति सांगितलीच तुम्हांला...तिसऱ्या मुलाचा स्वतंत्र धंदा आहे. त्याचंहि छान चाललं आहे...चौथा विलायतेला जाऊन परीक्षा देऊन आला आहे...डॉक्टर आहे...त्याचं नांव कदाचित् ऐकलं असेल तुम्हीं ! पैसा आणि नांवलौकिक त्यांनी दोन्ही मिळवलं आहे. परवाची माझ्या सत्तराव्या वाढदिवसाकरिता संस्थेला दिलेली एक हजाराची देणगी त्यांनीच माझ्या नांवें दिलेली आहे. तेव्हा संस्थेने माझी मुलाखत घ्यायला एक माणूस पाठविला. मी त्याला दाद दिली नाही. मीं सांगितलें, 'मी देणगी दिलेली नाही. माझ्या मुलाने माझ्या नांवाने दिली आहे–तेव्हा त्याचीच मुलाखत घ्या तुम्हांला हवी असेल तर !' असा चमत्कार आहे माझ्या आयुष्यांत–" आणि तो वृद्ध मनमोकळेपणाने हसूं लागला.

मी त्याच्या हसण्याकडे आणि हावभावांकडे पाहतच राहिलों. "माझा पांचवा मुलगा—कॉन्ट्रॅक्टर आहे. त्यांनीच घर बांधलें आहे–आणि त्या घराला नांव दिलें आहे, 'जनकजननी-प्रसाद !' त्या घरांत आम्ही

सगळे एकत्र राहतों—मला नातवंडेंहि आहेत. साती मुलांचीं लग्नें झालेलीं आहेत—आणि आमचें अजून एकत्र कुटुंब आहे !" त्या गृहस्थाला आपलें हसणें आवरेना.

त्या गृहस्थाचें हसणें थांबविण्याकरिता मी विचारलें, " आणि आपला सहावा मुलगा काय करतो ? "

" सहावा मुलगा—पांचव्या मुलाच्या धंद्यांतच आहे—दोघांचेंहि नीट आहे. त्यांत कुणाची किती भागी आहे ह्याची मी चौकशी केली नाही—करीत नाही—मला कारणच काय आणि अधिकारच काय ? खरं कीं नाही ? " त्याने माझें मत विचारलें.

" अधिकार नाही असं कां म्हणतां ? आपण त्यांचे वडील आहांत ना ! सर्व मुलें तुमच्या ऐकण्यांत आहेत ना ? " मीं विचारलें.

" त्याचेंच तर मला दुःख होतें आहे !" तो गंभीरपणाने म्हणाला.

" काय दुःख ? " मी आश्चर्याने विचारलें.

" हो, दुःखच नव्हे तर काय ! सुखाने उत्पन्न होणारें दुःख असें वाटल्यास तुम्ही त्याला नांव द्या ! आणि माझा सातवा मुलगा सरकारी इंजिनीयर आहे—त्याला साडेसतराशें रुपये पगार मिळतो ! आणि आम्हीं अद्याप सर्व एकत्र आहोंत. या आश्चर्यापेक्षा आमच्या राहणीवरून आमची अशी परिस्थिति असेल अशी—तिऱ्हाईत कुणी आमच्याकडे आला तर त्याला कल्पना सुद्धा येणार नाही ! " तो समाधानाने म्हणाला.

" आश्चर्य—खरंच आश्चर्य ! " मी आश्चर्यानेच उद्गारलों.

" आणि मी कोण माहीत आहे ? " तो वृद्ध गंभीरपणाने म्हणाला.

आता हा वृद्ध आणखी काय आश्चर्याचा धक्का देतो हें ऐकण्याकरिता मी कान टवकारले.

" कोकणांतील एक भिक्षुक......मला भिक्षुकी येते, पण ती सुद्धा अगदी चालचलाऊ ! कोकणांत आमचें घर आहे, तेंहि वडिलोपार्जित. थोडीं आंबे—फणसाचीं झाडें आहेत आमच्या मालकीचीं ...... पण त्यांत फक्त आम्हां नवराबायकोचें भागण्यापुरतें.........आणि मुलगे सात—मुलगी अजिबात नाही. माझ्या कुटुंबाची फक्त एवढ्याबद्दल कधीतरी कुरकूर चालते......पण हेंच कदाचित् कारण असेल. आपल्या साती

त्यांनी दूध प्यायला आणि मी चहा प्यायला सुरुवात केली.

'......त्या हायस्कूलचे मुख्याध्यापक आपणांस ऐकून माहिती असतील?' त्याने हळुवारपणे विचारलें.

'हो, ऐकून माहीत आहेत.' मीं म्हटलें.

'तो माझा थोरला मुलगा!'

'बरं—'

'त्याच्या खालचा मुलगा नंबर दोन ..एका व्यापारी कंपनींत नोकरीला आहे—साडेतीनशे रुपये पगार मिळतो त्याला!' तो गृहस्थ दूध प्यायचा थांबला होता—आणि दुधाच्या कपांत बहुतेक तो आपल्या त्या दोन्ही मुलांचीं प्रतिबिंबें पाहण्याचा प्रयत्न करीत असावा.

'...मग, त्या मुलांचें तुमचें पटत नाही?' हा माझ्याकडे कशाकरिता आला आहे याचा कयास काढण्याकरिता मी विचारलें.

"...नाही..., नाही, तसं कांही नाही...सगळीं मुलं माझ्या ऐकण्यांत आहेत. माझा प्रश्न असा आहे कीं, त्यांनी माझें इतकें कां ऐकावें?...हसूं नका...माझी सगळी हकीगत ऐकून घ्या...मला एकंदर मुलगे सात... दोन मुलांची परिस्थिति सांगितलीच तुम्हांला...तिसऱ्या मुलाचा स्वतंत्र धंदा आहे. त्याचंहि छान चाललं आहे...चौथा विलायतेला जाऊन परीक्षा देऊन आला आहे...डॉक्टर आहे...त्याचं नांव कदाचित् ऐकलं असेल तुम्हीं! पैसा आणि नांवलौकिक त्यांनी दोन्ही मिळवलं आहे. परवाची माझ्या सत्तराव्या वाढदिवसाकरिता संस्थेला दिलेली एक हजाराची देणगी त्यांनीच माझ्या नांवें दिलेली आहे. तेव्हा संस्थेने माझी मुलाखत घ्यायला एक माणूस पाठविला. मी त्याला दाद दिली नाही. मीं सांगितलें, 'मी देणगी दिलेली नाही. माझ्या मुलाने माझ्या नांवाने दिली आहे—तेव्हा त्याचीच मुलाखत घ्या तुम्हांला हवी असेल तर!' असा चमत्कार आहे माझ्या आयुष्यांत—" आणि तो वृद्ध मनमोकळेपणाने हसूं लागला.

मी त्याच्या हसण्याकडे आणि हावभावांकडे पाहतच राहिलों. "माझा पांचवा मुलगा—कॉन्ट्रॅक्टर आहे. त्यांनीच घर बांधलें आहे—आणि त्या घराला नांव दिलें आहे, 'जनकजननी-प्रसाद!' त्या घरांत आम्ही

सगळे एकत्र राहतों—मला नातंवडेंहि आहेत. साती मुलांचीं लग्नें झालेली आहेत—आणि आमचें अजून एकत्र कुटुंब आहे ! " त्या गृहस्थाला आपले हसणें आवरेना.

त्या गृहस्थाचें हसणें थांबविण्याकरिता मी विचारलें, " आणि आपला सहावा मुलगा काय करतो ? "

" सहावा मुलगा—पांचव्या मुलाच्या धंद्यांतच आहे—दोघांचेंहि नीट आहे. त्यांत कुणाची किती भागी आहे ह्याची मी चौकशी केली नाही—करीत नाही—मला कारणच काय आणि अधिकारच काय ? खरं कीं नाही ? " त्याने माझें मत विचारलें.

" अधिकार नाही असं कां म्हणतां ? आपण त्यांचे वडील आहांत ना ! सर्व मुलें तुमच्या ऐकण्यांत आहेत ना ? " मीं विचारलें.

" त्याचेंच तर मला दुःख होतें आहे ! " तो गंभीरपणाने म्हणाला.

" काय दुःख ? " मी आश्चर्याने विचारलें.

" हो, दुःखच नव्हे तर काय ! सुखाने उत्पन्न होणारें दुःख असें वाटल्यास तुम्ही त्याला नांव द्या ! आणि माझा सातवा मुलगा सरकारी इंजिनीयर आहे—त्याला साडेसतराशे रुपये पगार मिळतो ! आणि आम्हीं अद्याप सर्व एकत्र आहोंत. या आश्चर्यापेक्षा आमच्या राहणीवरून आमची अशी परिस्थिति असेल अशी—तिऱ्हाईत कुणी आमच्याकडे आला तर त्याला कल्पना सुद्धा येणार नाही ! ' तो समाधानाने म्हणाला.

" आश्चर्य—खरंच आश्चर्य ! " मी आश्चर्यानेच उद्गारलों.

" आणि मी कोण माहीत आहे ? " तो वृद्ध गंभीरपणाने म्हणाला.

आता हा वृद्ध आणखी काय आश्चर्याचा धक्का देतो हें ऐकण्याकरिता मी कान टवकारले.

" कोकणांतील एक भिक्षुक......मला भिक्षुकी येते, पण ती सुद्धा अगदी चालचलाऊ ! कोकणांत आमचें घर आहे, तेंहि वडिलोपार्जित. थोडीं आंबे—फणसाचीं झाडें आहेत आमच्या मालकीचीं ...... पण त्यांत फक्त आम्हां नवराबायकोचें भागण्यापुरतें........आणि मुलगे सात—मुलगी अजिबात नाही. माझ्या कुटुंबाची फक्त एवढ्याबद्दल कधीतरी कुरकूर चालते......पण हेंच कदाचित् कारण असेल. आपल्या साती

सुनांशीं ती अगदी पोटच्या मुलींसारखी वागते! तिने अजून आपल्या नाकांतील नथीचें सुंकलें बदललेलें नाही ...मुलं वाटेल त्या किंमतीची आईला नथ घ्यायला तयार आहेत. पण ही म्हणते, 'हें माझें नथीचें सुंकलें माझ्या सासूबाईचें आहे—त्या सुंकल्याचें हें भाग्य आहे बरं—आणि बरं का मुलींनो—माझ्यामागे हें नथीचें सुंकलें कुणाला देऊन टाकूं नका हो......जी कोणी माझ्या वर्षश्राद्धाचा स्वयंपाक करील तिने त्या दिवसापुरतें आपलें मोठेंपण विसरून हें सुंकलें नाकांत घालून माझें पान वाढावें!' कारण काय, आमच्या घरांत अजून स्वयंपाकाला बाई नाही!" ही हकीगत सांगतांना त्या वृद्धाचे डोळे पाण्याने भरून आले होते.

"तुमच्या पत्नीहि अजून हयात आहेत तर?" मी कौतुकाने विचारलें.

"हो......आहेत ना—आणि तिच्या हट्टाकरिता तर मी मुलांजवळ येऊन राहिलों आहे......इकडे इतकें सगळें वैभव आहे, पण खरं सांगूं, माझ्या कोकणच्या छोट्या परसूचा आणि आंब्या—फणसांच्या झाडांचा मला अजून लोभ आहे—पण केवळ हिच्याकरिता मी त्या सर्वस्वावर पाणी सोडून इकडे आलों......एका दूरच्या नातलगाला ती सर्व इस्टेट देऊन टाकली......अहो, कोकणच्या इस्टेटीची मालकी म्हणजे काय...कष्टाची मालकी—जेवढे कष्ट तेवढेंच उत्पन्न!"

मी पुन्हा थोडा माझ्या एकट्याकरिता संकोचाने चहा मागवला.

"तुम्ही घ्या ना चहा! अहो, ज्याच्या त्याच्या सवयी असतात...... अहो, आता मुलं जाऊं देत नाहीत म्हणून. नाहीतर अजून मला वाटतें, चार घरं भिक्षुकी करावी आणि हातपाय चालत आहेत तोंपर्यंत आपल्या दोघांच्या पोटापुरतें आपण मिळवावें......पण पोरं जाऊं देत नाहीत. मग घरच्याच देवांची पूजा करीत बसतों......" माझ्या खोलींतल्या घड्याळाकडे पाहत तो वृद्ध म्हणाला, "किती, अर्धा तास होऊन गेला ना?"

"वेळेची नका काळजी करूं तुम्हीं. आजची माझी सकाळची सुरुवात अत्यंत उल्हसित उमलली आहे!" मी समाधानाने म्हटलें.

"मला सात मुलगे झाले हें मी सांगितलंच तुम्हांला. वाढत्या प्रपंचाचा

खर्च मला झेपेना. तेव्हा माझ्या थोरल्या मुलानें पहिल्यांदा घर सोडलें. वार लावून त्यानें आपलें शिक्षण पुरें केलें. त्याला नोकरी लागली. तेव्हा त्यानें आपल्या धाकट्या भावाला इकडे आणलें. त्याचें शिक्षण पुरें होऊन त्याला नोकरी लागल्यानंतर क्रमाक्रमानें माझीं सर्व मुलें इकडे आलीं आणि अशा तऱ्हेनें मार्गाला लागलीं. सर्वांचीं लग्नें झालीं. संसार सुखानें वाढूं लागला. मध्यें थोडी सुनासुनांत कुरबुर झाली. माझ्या थोरल्या मुलाची मिळकत सर्वांत कमी; पण सगळ्या मुलांनी सांगितलें, 'त्यांनी पहिल्यांदा घस सोसून आमचें शिक्षण पुरें केलें म्हणून–हा पगार–ही मिळकत दिसते आहे तुम्हांला. त्यानें–दादानें फक्त आपलाच प्रपंच पाहिला असतां तर आज कुठे तरी हॉटेलांत 'कपबशा' विसळीत बसलों असतों आम्हीं!' ही कृतज्ञता......पुढे कुणी कांही उद्गारच काढला नाही!"

मी कुतूहलानें विचारलें, "मग आज तुमची तक्रार काय आहे? काय हेतूनें आज तुम्हीं माझ्याकडे आलांत?"

वृद्ध हसत म्हणाला, "फार मोठी तक्रार आहे. हे सर्व दिवस आम्हांला दिसले माझ्या थोरल्या मुलाच्या कष्टानें–पण तो आणि सर्व मुलें सागतात –आमच्या आईवडिलांची कृपा–अहो, आणि लाज वाटते सांगायला, सगळीं मुलं–सुना, नातवंडें–सकाळीं आमच्या दोघांच्या पाया पडतात, अशी लाज वाटते नमस्कार करून घेण्याची–! पण त्यांच्या भावना दुखवतां येत नाहीत. मुलं सागतात, आमच्या 'आईवडीलांची कृपा' आणि असा हा आमच्या सुखाचा संसार-वृक्ष पाहून कांही वर्तमानपत्रवाले मुलाखत घ्यायला येतात. मी कुणाला दाद दिली नाही; पण केवळ मनाची मानसिक कुचंबणा टाळण्याकरिता आज आपणहून आपल्याकडे आलों!" तो वृद्ध गंभीरपणानें कुठे तरी पाहूं लागला.

"कुणालाहि हेवा वाटावा इतके भाग्यवान् आहांत–अहो, जन्मदाते तुम्हीं आहांत–अशीं कृतज्ञ मुलं तुम्हांला लाभलीं आहेत—" मी त्या वृद्धाला खुलवण्याकरिता म्हटलें.

"खरं आहे–तुमचं म्हणणं खरं आहे; पण या सगळ्याच्या मुळाशीं

एक दुःखदायक घटना आहे ती मला बेचैन करते ! " वृद्धाच्या डोळ्यांत अश्रू तरंगूं लागले.

पुढची हकीगत ऐकण्याकरिता मी अत्यंत उत्सुकतेने कान टवकारले.

" माझ्या लग्नाची दुःखद कहाणी आहे ही......मला एक थोरला भाऊ होता......आता नाही......आज जी माझी पत्नी आहे–तिचें पाहिल्यांदा माझ्या–त्या भावाशीं लग्न ठरलें होतें, माझा थोरला आणि एकुलता एक भाऊ तो–त्यावेळीं त्याचें वय किती होतें–चौदा वर्षांचें–त्यावेळीं इतक्या लहानपणीं लग्न होत–आता तुम्हांला हें ऐकूनसुद्धा हसायला येईल......मुलगी होती शेजारच्या गावची...... आम्ही आनंदांत होतों. घरांत लग्नाची तयारी चालू होती. आमचे सासरे–हो आता माझेच सासरे–लग्नाकरिता वऱ्हाड घेऊन आमच्या गावीं आले... आणि माझ्या भावाच्या मनांत लग्न करायचें नव्हतें. वय लहानच...... त्याच्या डोक्याने घेतलें होतें......संसार करायचा नाही......संन्यास घ्यायचा–त्यावेळी तें कुणाला खरें वाटलें नाही आणि लग्नाची तयारी चालू झाली–आणि वधूकडचेंहि वऱ्हाड गावांत आल्याचें कळल्यानंतर भाऊ घरांतून पळून गेला......आमच्याकडे रडारड चालू झाली...... ही हकीकत वधूकडच्या माणसांना कळल्यानंतर तेहि बुचकळ्यांत पडले–काय करावें हें वधूकडच्या माणसांना कळेना–यांतून मार्ग कसा काढायचा हें आमच्याकडच्या लोकांनाहि कळेना......वधूकडच्या माणसांचा जाण्या-येण्याचा व इतर बुडीत खर्च माझे वडील भरून द्यायला तयार होते–पण वधूकडच्या माणसांना पैशाची किंमत नव्हती......मुलीचें लग्न न होतां गावी परत जाण्यांत जी नामुष्की होती–ती त्यांना सहन होईना–वधूचे वडील जीव द्यायला निघाले. ......गावांतलीं माणसें मधे पडलीं–अखेर एकाने तोडगा सुचविला......माझ्या भावापेक्षा माझें वय दीड वर्षानेच लहान गावाने ठरवलें......ती मुलगी मला द्यावी......आणि माझ्या भावाशीं जिचें लग्न ठरलें होतें,–तिचें माझ्याशीं लग्न झालें–ती मुलगी मोठी पायगुणाची होती असे आमचे सासरे लग्नापूर्वीं सांगत होते–पण या मुलीचा पहिल्यांदा आमच्या घरीं पायगुण माझा भाऊ पळून जाण्यांत झाला......माझा भाऊ पुन्हा कधीच घरीं परत आला नाही......

आम्ही बातमी काढीत होतों. पहिल्यांदा आम्हांला कळलें, तो कुणा संन्याशाबरोबर फिरतो आहे......नंतर कांही दिवसांनी आम्हाला कळलें–तो एका नाटक-कंपनींत नोकरीला राहिला आहे......आणि कांही दिवसांनी कळलें–कांहीतरी विचित्र रोग होऊन तो कैलासवासी झाला ......माझ्याभोवतीं आज सर्व सुखें आहेत. पण मला वाटतें, तीं सर्व सुखें मला वाकुल्या दाखवीत आहेत–भेडसावीत आहेत की, 'बेट्या, तुझ्या भावाचें हें सर्व वैभव तूं उपभोगतो आहेस!' वास्तविक यांत माझा काय दोष? यात जसा माझा दोष नाही, तसा माझीं मुलें मला जो मोठेपणा देत आहेत तोहि माझा खरा मोठेपणा नाही! सगळी कर्तबगारी माझ्या मोठ्या मुलाची......कृतज्ञता लहान मुलांची; पण त्या सर्वांनी त्या सगळ्या वैभवाच्या जरीपटक्याचा मान मला दिला आहे ......असें हें बेचैन करणारें सुख–मनाला डाचणारें सुखी दुःख...... आज तुम्हांला सांगितलें, समाधान वाटलें......हें मुलाखतींत कसें आणि कुणाला सांगूं? मुलाखतवाल्यांनी 'शब्दचमत्काराने त्यांतच माझ्यावर कर्तबगारी लादली तर ती मला आणखी जास्त दुःखदायक वाटेल...... पण तुम्हांला त्रास दिला–माझें नांव न घालतां ही हकीगत तुम्ही लेखनांत वापरलीत तरी माझी हरकत नाही. वाटल्यास माझ्या घरीं येऊन–हें सर्व खरें आहे का नाही पाहा–पण जर कदाचित् आमच्या घरीं आलांतच–तर फक्त माझ्या मुलांच्या बोलण्यावर विश्वास ठेवूं नका. इतर वेळीं तीं खरं बोलतात–पण आम्हां नवरा–बायकोबद्दल–त्यांच्या जन्मदात्या आई-वडिलाबद्दल विनाकारणच चीड येणारें चांगलें बोलतात. त्यांच्यावर विश्वास ठेवूं नका......पण या एकदा आमच्या घरीं–या बाबतींत खरं बोलूं फक्त मी आणि माझी पत्नी–बाकी सगळें खोटें–खोटें ....."

या हकीगतीचा माझ्या मनावर विचित्र परिणाम झाला. मी डोळे मिटून घेतले, आणि ती हकीगत पुन्हा डोळ्यांसमोर आणूं लागलों. त्या वृद्धाने मला जातों म्हणून विचारलें. मीं 'हूं' म्हटलें–पण मी डोळेसुद्धा उघडले नाहीत—तो वृद्ध निघून गेला—कित्येक वेळाने मीं डोळे उघडले.

तो वृद्ध बसला होता त्या खुर्चीकडेच मी आश्चर्याने पाहूं लागलों–आणि हसूं लागलों!

• • •

# चौदा

ही एका वयोवृद्धाची जीवित-कथा आहे.

उन्हाळ्यांतील असो, पावसाळ्यांतील असो अगर हिवाळ्यांतील असो, प्रत्येक दिवशीं उमलणाऱ्या रम्य उषःकालीं आकाशाकडे पाहून—

'शान्ताकारं भुजगशयनं'

हा श्लोक म्हणतांना त्या वयोवृद्धाला अनेकांनी पाहिलें असेल. मी सुद्धा पाहिलें आहे—पण मला त्या रम्य उषःकालापेक्षा—त्या सुमधुर श्लोकापेक्षा—ज्या मधुर आवाजाने तो श्लोक म्हटला जात असे त्या मधुर आवाजापेक्षा त्या वृद्धाचें तें स्थिर दृष्टीने आकाशाकडे पाहणें मला जास्त अर्थपूर्ण आणि मनाला मोहिनी घालणारे वाटे आणि अजूनहि वाटतें.

रस्त्यावरच असणाऱ्या दुसऱ्या मजल्यावरील एका खोलींत तो वृद्ध राहतो. आज अनेक वर्षें तो तिथे राहतो आहे. त्या खोलीला रस्त्यावर एक बारिकसा सज्जा आहे. त्या सज्जांत विनम्र भावाने हात जोडून आकाशाकडे पाहून 'शान्ताकारं—' हा श्लोक म्हणण्याचा त्याचा अनेक वर्षांचा परिपाठ आहे! त्याच्या तोंडून तो श्लोक मीं अनेक वेळां ऐकला आहे— कधी अर्धवट—कधी पुरा—कधी अस्पष्ट—तो त्यावेळीं आकाशाकडे पाहत असायचा आणि मी मात्र त्या वयोवृद्धाकडे आणि त्याच्या त्या वेळच्या सूक्ष्म हालचालीकडे कुतूहलपूर्ण नजरेने पाहत राहायचा!

नंतर कांहीं निमित्तानें त्याची–माझी ओळख झाली तो प्रसंग सांगत नाही–पण पुढे प्रसंगाप्रसंगानें त्या वयोवृद्धाचें जें व्यक्तिचित्र माझ्या मनांत निर्माण झालें त्याचें मी आज फक्त शब्दचित्रण करणार आहे :

आज तो वृद्ध आहे सत्तरीच्या पुढे. त्याची माझी ओळख झाल्याला कमींत कमी पंधरा वर्षें तरी झालीं असतील! तेव्हापासून तो कधी आजारी पडल्याचें मी पाहिलें नाही किंवा ऐकलेंहि नाही!

नवीनच ओळख झाली त्यावेळीं त्या वयोवृद्धाच्या गृहस्थितीची चौकशी करण्याइतकी आपुलकी आमच्यांत निर्माण झालेली नव्हती!

एके दिवशीं मी माझ्या एका मित्राकडे गेलों होतों. त्या मित्राच्या लहान मुलांशीं तो वृद्ध स्वतःच्या नातवंडांशीं खेळावें इतक्या तन्मयतेने खेळत होता. तें निमित्त साधून मीं त्या 'बुवांना' विचारलें,––त्या वयोवृद्धाच्या एकंदर वागणुकीवरून आम्हीं त्याला अलीकडे 'बुवा' म्हणून हाक मारायला सुरुवात केली होती––"बुवा, आपल्याला मुलंबाळं काय आहेत?" मुलं, सुना, नातवंडं किती आहेत?" तिथे जमलेल्या मुलांकडे हसत हसत पाहत बुवा म्हणाले, "मग हीं कुणाचीं मुलंबाळं आहेत, नातवंडं आहेत?" आणि एवढें बोलून बुवा स्वतःचें स्वतःशींच असें कांहीं गंमतीदार हसले की, त्यामुळे त्यावेळीं जास्त खोलांत शिरून मला त्यांना कांही जास्त खुलासेवार विचारतांच आलें नाही!

पुढे आम्ही प्रसंगाप्रसंगानें एकमेकांना अनेक ठिकाणीं भेटूं लागलों. पण त्या त्या वेळच्या भेटींत, बुवांच्या आयुष्याबद्दल जास्त कुतूहल वाटण्यापलीकडे मला त्यांच्या आयुष्याबद्दल जास्त कांहीच माहिती मिळूं शकली नाही. आणि तसा मी प्रयत्नहि केला नाही.

नंतर नंतर मी बुवांच्या खोलीखालून रस्तानें जाऊं लागलों की, बुवा मला अगत्यानें हाक मारूं लागले. मला अगत्यानें चहा करून देऊं लागले–पण त्यांनी कधीच माझ्याबरोबर चहा घेतला नाही. "दोन वेळच्या जेवणाशिवाय मी काहीं खातपीत नाही––म्हणून माझी अशी तब्येत टिकली आहे!" बुवांनी एक दिवस मला असें हसत हसत उत्तर दिलें.

बुवांना स्वयंपाक उत्तम करतां येत होता. ते कधी आलेपाकाच्या चांगल्या वड्या करीत–कधी बेसनाचे लाडू, कधी खमंग चिवडा करीत–

आणि माझ्यासारख्या त्यांच्या अनेक मित्रांना हाक मारून वात्सल्याने खायला देत. हे सर्व जिन्नस बुवा हातानेच तयार करीत.

एक दिवस मीं सहज म्हटलें, "बुवा, हा त्रास कशाकरिता घेतां तुम्ही ?"

" बोलायला चुकताहात तुम्ही. हा त्रास नव्हे- हा मी आनंद घेत आहें ! अहो, मी पेन्शनर असल्यामुळे माझ्या आयुष्याचा सर्व वेळ रिकामा आहे- तो घालवायचा कसा ? संपायचा कसा ? स्वतःचें असें काम किती असणार ? वर्तमानपत्रें वाचनांत किती वेळ जाणार ? मग बसतों असें कांही -तरी करीत. चांगला आहे ना आजचा चिवडा ! "

चिवडा खात खात मी थट्टेने म्हटलें, " उत्तम ! अहो, या चिवड्याला कोण नांवें ठेवणार ? या चिवड्याची चव कांही निराळीच आहे बुवा ! पण अशी आम्हांला नेहमी सवय लावूं नका हं ! असे उत्तम उत्तम तुमच्या हातचे पदार्थ खायला मिळाले तर न बोलावतांच आम्ही रोज यायला लागूं कदाचित् ! "

" वा ! मग येत जा की ! पण तुम्ही कसले येणार-मी तुम्हांला खायला देतों-यापेक्षा किती तरी मोलाचा तुमचा काळ आहे-तो तुम्ही असा माझ्याकरिता वाया घालवाल ? पण रोज आलांत तर माझा तोहि वेळ आनंदांत जाईल ! " आणि बुवा हसले आणि आपल्या नेहमीच्या सवयीप्रमाणे बाहेरच्या आकाशाकडे पाहूं लागले.

बुवांच्या अंगांतले कपडे नेहमी पांढरे शुभ्र आणि हाताने धुतलेले असायचे.

बुवांना मी अनेक ठिकाणीं—अनेक प्रसंगीं पाहिलेलें आहे. अनेक लोकांशीं बोलतांना ऐकलेलें आहे. पण त्यांनी कधी कुणावर टीका केलेली मीं ऐकली नाही किंवा कुणाचें उणें काढलेलें ऐकलें नाही !

जग सारखें बदलत होतें- जगांतले विचार बदलत होते. ते सर्वच कांही बुवांच्या मनोवृत्तीला पसंत पडण्यासारखे खासच नसणार ! पण त्यांनी कशाबद्दलहि नापसंतीचे उद्गार काढल्याचें मीं ऐकलेले नाहीत ! पण जगाच्या नवीन विचाराआचारांत त्यांच्या मनाला जें पटे त्याबद्दल मनमोकळेपणाने ते पसंती दाखवीत. बुवांचें बोलणें नेहमी उत्साहवर्धक असे—पण तें खोटें किंवा तोंडपुजें कधीच नसे !

अशा त्यांच्या स्वभाववैशिष्ट्याने आणि वागणुकीने त्यांनी आपल्याभोवतीं एक आपल्यापुरतें विश्व निर्माण केलें होतें. तरुण मनालासुद्धा बुवांच्या सहवासाची ओढ होती. लहान मुलेंबाळें तर त्यांची वाट पाहतच राहत!

बुवांच्या खिशांत नेहमी पेपरमिटाच्या वड्या–खडीसाखर, बेदाणा असायचा—बालगोपाळांना वांटण्याकरिता!

एखाद्या घरीं संध्याकाळच्या वेळीं मी त्यांना लहान मुलांचे पाढे—परवाचे घेत बसलेले पाहिलें आहे—तर दुसऱ्या घरीं सुट्टीच्या दिवशीं लहान मुलांत बसून कवितेच्या भेंड्या लावीत मजेने काळ काढतांना मी बुवांना पाहिलें आहे–तर जुन्या काळचे लग्नांतले उखाणे आणि म्हणी हसत हसत बुवा सांगत आहेत आणि म्हणत आहेत. आणि भोवतीं जमलेली बालगोपाल मंडळी तें ऐकून हसत खिदळत आहेत हेंहि दृश्य माझ्या संग्रहीं आहे!

कुणा विद्यार्थ्याला घरीं बोलावून 'अमरकोश' शिकवितील; तर कुणाची पाठ केलेली शब्दरूपावलि म्हणून घेतील–तर कधी एकटे आपले आपणच डोळे मिटून सबंध गीता तोंडपाठ म्हणत बसतील!

त्यांच्या या निर्माण झालेल्या परिवारांत कुणा घरीं लग्न असेल तर बुवांचा "मौल्यवान" आहेर तिथे हजर असेल–तिथे बुवा पानसुपारी वांटतांना दिसतील–पण जेवायला? अं–हं!

आणि कुणी फारच आग्रह केला तर बुवा हात जोडून त्याला सांगत, "अरे, घरीं खातों आहे हें तुमचेंच खातों आहे. आणि खरं सांगूं–मी तुमच्याकडचं जेवणं शिल्लक ठेवतों आहे–उद्या मला हातांनी होत नाहीसें झालें तर तुमच्याकडेच येऊन राहणार मी! मग त्यावेळेला मात्र नाही म्हणूं नका हं!" आणि ऐवढें बोलून बुवा हसत हसत चालूं लागत!

सगळीकडेच असून कुठेच न रमलेला असा हा 'बुवा' होता. बुवांनी अशा तऱ्हेने अनेक कुटुंबांत–मुलाबाळांत–तरुणांत स्वतःबद्दलची आपुलकी पेरून ठेवली होती! पण मला बुवांचें खरें स्वरूप दिसे तें कोणत्याहि प्रसंगांतून मनाने बाहेर पडण्याकरिता ते अफाट आकाशाकडे नजर लावून बसत तेव्हा! जणूं त्यांचें खरें विसाव्याचें ठिकाण तें होतें. निःशब्द अफाट आकाश!

अनेक वर्षांच्या परिचयानंतर मात्र मी एक दिवस बुवांना हट्टाने विचारलें, "बुवा, आम्हां सगळ्यांची माहिती तुम्हांला आहे–पण तुमच्या खाजगी आयुष्याची माहिती मला सांगा–तुम्हांला मुलंबाळं काय आहेत? तुमच्याकडे तुमच्या नात्याचें कुणीच कसें येतांना दिसत नाही? तुम्ही तुमच्या वैयक्तिक आयुष्यांत दुःखी आहांत का सुखी आहांत? तुमची वृत्ति इतकी निर्विकार आणि समाधानी कशी? तुम्ही इतके आनंदी कसें राहूं शकतां?"

हसत हसत बुवांच्या तोंडून उत्तर आलें, "खरंच, मी आनंदी आहे–सुखी आहे– तें मला साधलें आहे! केवळ एक विद्या मीं साध्य केल्यामुळे मी इतका आनंदी राहू शकतो. ती विद्या म्हणजे 'विसरायची विद्या!' कोणतीहि गोष्ट मी झटकन् विसरूं शकतों! तुम्हांला आश्चर्य वाटेल, मी माझं संपूर्ण आयुष्य–वैयक्तिक आयुष्य विसरून गेलों आहे! आता माझें लहानपण मला आठवत नाही, तरुणपण आठवत नाही मला वाटतें की, मी जन्मापासून आता आहे असाच आहे! मला माझ्या आयुष्याची आठवण एवढीच आहे की, मला पेन्शन आहे–आणि मी सुखी आहे! प्रत्येक उजाडणाऱ्या नव्या दिवशीं माझा नवा जन्म होतो!

प्रवासाला निघाले–आगगाडींत बसले–की त्यावेळी जे डब्यांत असतील ते त्यावेळेपुरते आपले नातेवाईक; तो प्रवास संपला की, गेले ते सर्व प्रवासी विस्मृतीच्या अथांग आकाशांत!

मी काय काय विसरलों आहे–तेंहि आठवण्याचा आज मी प्रयत्न करीत नाही!"

एवढें बोलून माझ्याकडे पाहून चुलीवरचें आधण उकळावें अशा आवेगानें बुवा हसूं लागले–आणि समाधानाची वाफ त्यांच्या तोंडावर तरंगत होती!

त्यावेळीं बुवा त्यांच्या मनाचें समाधान होईपर्यंत हसले आणि तें हसणें संपल्यानंतर–बुवांच्या टेबलावर चार मोगऱ्याचीं फुलें होतीं, त्यांतील दोन मोगऱ्याचीं फुलें माझ्या हातीं देत–बुवा म्हणाले,

"पाहा, या फुलांना वास किती छान आहे! तुम्ही फुलांचा वास घ्यायला शिका–हा नाद तुम्ही स्वतःला लावून घ्या–मग प्रयत्न न करतां जीवितांत नकोशा वाटणाऱ्या गोष्टी तुम्ही आपोआप विसरायला शिकाल!"

एवढें बोलून बुवा आपल्या खोलीबाहेरच्या गॅलरींत गेले. खालचा रस्ता गर्दीत वाहत होता—वरचें आकाश शांत होतें—सूर्य मावळतीला निघाला होता आणि बुवा शांतपणे आकाशाकडे पाहत होते !

" नुसतें आकाशाकडे पाहत बसणें हासुद्धा मनाला केवढा तरी व्यायाम आहे—तुम्हांला कल्पना नाही ! एके काळीं माझ्याकडे एक मोठा थोरला आरसा होता—कित्येक वर्षांपूर्वी मीं तो एकाला देऊन टाकला. कुणाला दिला तेंहि आता आठवत नाही मला.

तेव्हा रिकाम्या वेळीं मला आरशांत पाहत बसण्याची सवय होती—पण मीं आता ती सवय सोडली आहे ! कारण आरशांत पाहत बसलें की, आपल्या आयुष्यांतील कित्येक विसरलेल्या गोष्टी आठवूं लागतात—म्हणून मीं आरशांत पाहणें सोडलें आणि रिकाम्या वेळीं आकाशाकडे पाहत राहण्याचा नाद मीं माझ्या मनाला लावून घेतला.

आकाशाकडे पाहत बसलों की, मनाचा कापूस आपोआप पिंजून निघतो—त्याचा निर्मळ धागा निर्माण होतो—आकाशगंगेला जोडला जातो—मनाला वाऱ्याचा वेग येतो—मन विशाल होतें. मला वाटतें, भगवान् श्रीकृष्णांना गीता सुचली ती आकाशाकडे पाहत बसण्याच्या नादामुळेच असेल कदाचित् !

—कोणत्याहि गोष्टीकडे जवळून पाहण्यापेक्षा लांबून पाहण्यांत त्याचें खरें स्वरूप कळतें. प्रत्येकाने फावल्या वेळांत आकाशाकडे पाहत बसायला शिकावें—त्यामुळे मन विशाल होतें. "

—बुवांनी आपल्याभोवतीं निर्माण केलेल्या चिमुकल्या विश्वांत कुठेहि गेले तरी बुवांनी तिथे आपली एक तरी आठवण ठेवलेली दिसेल. कुणाला त्यांनी आरसा दिलेला असेल, कुणाला कांही—कुणाला कांही !

बुवांनाहि अनेक लोक अशाच कांही जिनसांच्या भेटी देत. बुवा त्या मात्र आनंदाने स्वीकारीत—त्या जिनसेचा मुक्काम बुवांच्या घरीं फक्त दोन-तीन दिवसच राही. ते दोन-तीन दिवस या जिनसेची खरी गरज कुणाला आहे, याचा विचार करण्यांत बुवा घालवीत आणि मग विचारान्ती ती जिन्नस खऱ्या गरजेच्या माणसाकडे रवाना होई आणि ती जिन्नस ज्यांनी बुवांना दिली असेल त्याला आठवणीने बुवा सांगत, " तुमची जिन्नस मीं अमक्यातमक्याला दिली—किती आनंद वाटला त्याला ! "

आणि बुवा म्हणजे कांही परदेशांतून आयात केलेली चीज नव्हती. माझ्या मनाने ओढ घेतली आणि ओळखी-ओळखीने पत्रव्यवहाराच्या धाग्याने बुवांच्या पूर्वायुष्याची मी संपूर्ण माहिती मिळविली आणि मला आश्चर्य वाटलें. बुवांचें पूर्वायुष्य संकटांनी आणि दुःखांनी भरलेलें होतें. आयुष्यांत एकहि गोष्ट—एकहि माणूस त्यांना मनासारखें मिळालेलें नव्हतें आणि चुकून जें कांही मनासारखें मिळालें होतें तें टिकलें नव्हतें !

परमेश्वराने बुवांच्या वैयक्तिक आयुष्यांत प्रत्येक जातीचें दुःख भेट म्हणून पाठविलें होतें आणि अखेर परमेश्वराचाहि पराजय झाला होता. कोणतेंहि दुःख बुवांना खची करू शकलें नाही !

—प्रत्येक दुःख बुवांचा स्वभाव जास्तच निर्विकार आणि आनंदी बनवीत होतें !

—आणि आता बुवांच्या आयुष्याचें फूल पूर्णपणे उमललें होतें. त्या फुलाने आता आपल्या वैयक्तिक आयुष्याचा आधार सोडला होता. स्वतःच्या कुलाच्या वंशवृक्षाचीहि विस्मृतींत रवानगी झाली होती. आता सगळेच त्यांचे नातेवाईक—सगळ्यांनाच सुखी करण्याचें, संतोष देण्याचें बुवांचें आयुष्य आता उरलें होतें आणि त्यांतच त्यांच्या वैयक्तिक सुख-भावना फुलत होत्या.

बुवा कुठेतरी सरकारी नोकर होते. त्यांना त्या मानाने पेन्शन चांगलें मिळत होतें आणि बुवा स्वतःच्या जीवनाला पुरून उरतील ते राहिलेले सर्व पैसे महिनाअखेर संपवून टाकण्यांत आता तरबेज झाले होते !

कुणाच्या मुलाची फी द्यावी-कुणाला पुस्तकें घेऊन द्यावींत-कुणी घेण्याची टाळाटाळ केली तर बुवांनी हसत म्हणावें, " अरे, या महिन्याला तर घे—दरवेळीं मी थोडाच देऊं शकणार आहे ? आणि मला वाटतें, मीच तुमचं कांहीं पूर्वजन्मीचं देणं लागत असेन—एरव्ही मला हें तुम्हांलाच द्यायची बुद्धि कां व्हावी ? शेजारच्या घरांत हें द्यायला मी कां नाही गेलों ? " आणि त्या व्यक्तीकडे डोळे मिचकावून पाहत बुवा हसत हसत निघून जात !

मी एक दिवस बुवांना खिजवण्याकरिता मुद्दाम म्हटलें, " असे पैसे दर महिन्याला उधळतां—उद्यां तुम्ही आजारी पडलांत—आणि तुमचें दुखणें लांबलें— "

माझें बोलणें मध्येच थांबवीत बुवा आनंदाच्या आवेगाने म्हणाले, "एवढें मात्र मी तुम्हांला खात्रीने सांगतों - असें कधीच व्हायचें नाही—असें कधीच व्हायचें नाही—एक दिवस कधी तरी—अगदी सुप्रभातीं तुम्हांला कळेल की, बुवा संपले ! आकाशाकडे पाहत संपले ! मी रोज रात्रीं नेहमी दार उघडें ठेवून निजतों—माझा कुणालाहि त्रास व्हावयाचा नाही ! "

मी त्यांना खिजवण्याकरिता पुन्हा म्हटलें, " म्हणजे तुम्ही आपल्या जिवाला कंटाळला आहांत ? संपण्याचे विचार तुम्हांला नेहमी त्रास देतात ?"

" कां ? जिवाला कंटाळायला मला काय कमी आहे ? मला किती तरी आजूबाजूला प्रेमळ नातेवाईक आहेत—माझ्यावर प्रेम आहे—लोभ आहे—अशा आल्हाददायक जगांतून मला जावेसें कां वाटेल ? वाटेल तितकीं वर्षें जगायची मला हिंमत आहे आणि मनाची तयारी आहे. आणि तुम्ही लोकच मला कंटाळलां असलांत—पण तसंहि कांही कारण मला दिसत नाही—पण तरीहि माझें कुणाहिवांचून अडायचें नाही—ही माझी आराम-खुर्ची या गॅलरींत टाकून दिवसाचे चोवीस तास आकाशाकडे आनंदाने पाहत बसण्यांत मला मौज आणि आनंद वाटेल—खरं सांगतों तुम्हांला !

माणसें केव्हा तरी संपतात म्हणून मी केव्हातरी अचानक संपेन असें म्हटलें—पण माझी संपायची इच्छा नाही—कदाचित् मी कधीच आणि केव्हाच संपणारहि नाही—परमेश्वराची लीला अतर्क्य आहे !"

बुवा हें सर्व खरें आणि मनापासून बोलत होते याची तुम्हांला ग्वाही देतों. कारण ते जें बोलतील तें नेहमी नखशिखांत खरें असतें, हें त्यांच्या हसण्यावरून मी सांगतों—त्यांचें हास्य इतकें निर्मळ, इतकें सोज्वळ—दृष्टि-आडच्या फुलांचा सुगंध दरवळावा इतकें निर्विकार आणि मधुर—आणि म्हणून त्यांच्या तोंडून नेहमी ऐकलेला—

शान्ताकारं भुजगशयनं पद्मनाभं सुरेशं
विश्वाधारं गगनसदृशं मेघवर्णं शुभांगं ।
लक्ष्मीकान्तं कमलनयनं योगिभिर्ध्यानगम्यं
वन्दे विष्णुं भवभयहरं सर्वलौकिकनाथम् ।।

हा श्लोक त्यांच्याच वर्णनात्मक मला वाटतो. हें म्हणण्यांत अत्यंत अतिशयोक्ति आहे हें मी मनमोकळेपणाने कबूल करतां—पण अतिशयोक्ति हाहि एक अलंकार आहे ना ?

—पण बुवांचे खरें नांव-पाहा माझ्या डोळ्यासमोर आहे; पण आता आठवत नाही !

[ ता. २० मे १९५७ रोजीं पुणें आकाशवाणी केंद्रांत " अविस्मरणीय व्यक्ति " या मालेंत सांगितलेलें व्यक्तिचित्र. ]

● ● ●

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत
अनुक्रम ३५०३५०९...... वि: ..................
[redacted] ........................ [redacted]

## पंधरा

वेळ सकाळची होती. मी आपल्या खोलींत आज कांही-तरी लिहावें या विचारांत होतों. प्रसादच्या वर्षारंभ अंकापासून " लक्षांत राहिलेले प्रसंग !" या सारखें एखादें नवें सदर सुरू करावें, म्हणून विचार करीत होतों. डोक्यांत अनेक कल्पना होत्या; पण त्यांतील कोणतीहि एक ठाम ठरेना.

" लक्षांत राहिलेलीं माणसं " हें सदर अनेकांना आवडलें होतें—अनेकांना आवडलें नव्हतें. दोन्हींहि माझ्या कानांवर येत होतें. त्याची कारणेंहि माझ्या लक्षांत आलीं होतीं. ' लक्षांत राहिलेल्या माणसांसारखा ' एखादा माणूस वाचकांच्या जीवनाच्या आसपास घोटाळून गेलेला असला की, 'तो' माणूस त्या वाचकाला आवडे. इतरांना ती कल्पना वाटे. आणि एकच कथा सर्वांना सारखीच आवडेल हें बहुधा शक्य नाही !

कांही ' काळ—वेळेचाहि ' गुण असतो. वाचतांना वाचक ज्या मनोवृत्तींत असेल त्याचाहि वाचनावर परिणाम होतो. आणि " लक्षांत राहिलेलीं माणसं " हें सदर म्हणजे कांही ' रामायण—महाभारतासारखें ' चिरंतन काव्य नव्हे ! त्याची ' आवड—नावड ' अशीच दोलायमान असणार !

हें सर्व कां लिहितों आहे ?

—त्या दिवशीं सकाळीं एक वयोवृद्ध अनोळखी माणूस मला भेटायला आला होता.

“ मी प्रसादचा वर्गणीदार नाही—प्रसाद मधून मधून वाचतों—आपली ‘ लक्षांत राहिलेलीं माणसं ’ मला फार आवडलीं ! ” तो म्हातारा अत्यंत नम्रतेने म्हणाला.

“ कुठे असतां आपण ? ”

“ मी परगावचा आहे—प्रवासांत माझी चोरी झाली म्हणून इथे मुक्काम करावा लागला. ” तो गंभीरपणाने म्हणाला.

तो पुढे सांगू लागला—

“ इथे पुष्कळ माणसें माझ्या ओळखीचीं आहेत—पण त्यांना हें कसें सांगावें ? मी गृहस्थ माणूस आहे. दिवस असा आला आहे, हें कुणाला आणि कसें सांगावें ? ” तो काळजीखोर चेहरा करीत म्हणाला.

इतक्यांत माझ्याकडे कांही माणसें आलीं. त्या वृद्धाने त्या परिस्थितीचा फायदा घेतला. “ दुपारीं घरींच असतां ना ? मोकळे असतां ना ? दुपारींच आपल्याला येऊन भेटेन. ” हातांतील पिशवी उचलून तो गंभीरपणाने म्हणाला, “ पण तुमची ‘ लक्षांत राहिलेली माणसं ’—अंतः-करणाला चटका लावणारीं असतात हं ! ”

माझ्याकडे आलेलीं माणसें हें ऐकून आनंदलीं. तो वृद्ध निघून गेला.

“ हा गृहस्थ ओळखीचा आहे आपल्या ? ” कुणीतरी विचारलें.

“ नाही ! ” मीं म्हटलें.

“ प्रसादचा वर्गणीदार? ”

“ नाही ! ”

“ फक्त एवढें सांगण्याकरिताच आला होता ? ”

“ होय ” मी म्हटलें. “ आता त्याने फक्त एवढेंच सांगितलें आहे. तुम्ही आलांत म्हणून तो उठून गेला—दुपारीं पुन्हा येऊन भेटणार आहे ! मी हसत म्हटलें. माझें हसणें निर्लेप नव्हतें.

दुपार उजाडली. मी नुकतांच झोपून उठलों होतों.

माझे सहकारी आणि स्नेही श्री. पवार व बर्वे येऊन बसले होते. आमच्या कांही अवांतर विषयावर गप्पा चालल्या होत्या.

तोंच तो सकाळचा म्हातारा आला.

माझ्याकडे अगोदरच माणसें बसलीं आहेत हें पाहून तो निराश झाला. तें त्याच्या चेहऱ्यावर दिसत होतें.

तो गृहस्थ माझ्या माहितीचा नव्हता. पूर्वी मी पाहिलेला नव्हता. पण साधारण एखादा अनोळखी मनुष्य पाहतांच आपली जी एक कल्पना होते–तशी त्या माणसाबद्दल माझी कल्पना झाली होती.

तो प्रामाणिक असावा. जीवनात खूप खाचखळगे त्याला लागलेले असावेत. आयुष्यांत केलेलीं मनोराज्यें त्याच्या हातीं आलेलीं नसावींत. स्वतःविषयीच्या त्याच्या कल्पना मोठ्या असाव्यात. तो स्वतःला जितका मोठा समजत असावा तितकें मोठेंपण त्याच्यांत नसावें. त्याचीं मनोराज्यें त्याच्या भोवतालच्या परिस्थितीच्या मानाने अत्यंत भडक असावींत, कापसाच्या एका बोंडापासून एक दहावारी धोतर विणलें जावें–या कल्पनेंत आणि त्याच्या कल्पनेंत साम्य असावें ! त्यामुळे तो आपल्या कुटुंबांत आणि स्नेह्यासोबत्यांत 'प्रिय' नसावा.

आयुष्यांत जें आपल्या हातांत आलें आहे, तें निराशाजनक आहे–पण आपल्या विचारांत आणि आचारांत कांही चुकत असावें या दृष्टीने–एवढें वय गेल्यानंतरहि त्याने आपल्या स्वतःकडे पाहिलें नसावें.

तरीहि त्याची आयुष्याबद्दलची उमेद खचलेली नसावी !

अजून आपल्या आयुष्यांत कांही 'चमत्कार होईल' आणि आपण आयुष्यांत पुन्हा वर येऊं, असा त्याचा अद्याप मनोभ्रम असावा ! त्या दृष्टीने तो प्रवासाला निघालेला असावा.

सकाळीं त्याने सांगितल्याप्रमाणे त्याची प्रवासांत चोरी झालेली नसावी. त्यांतील तो फक्त अडचणीने येथे उतरला आहे एवढें खरें असावें.

माझ्या लेखनाची त्याने केलेली स्तुति अगदीच खोटी नसावी, पण त्या स्तुतीने आपलें कांही काम जमलें तर पाहावें हा त्याच्या स्तुतीचा मतलब असावा.

त्याची अडचण खरी असावी–पण खोटें बोलून आपलें काम साधलें तर पाहावें–पटण्यासारखी अडचण सांगावी––

तो मनुष्य मूळचा वाईट नसावा. पण––

आता माझ्याकडे आलेल्या माणसांचीहि त्याने परवा केलेली नाही. त्याने पहिल्यांदा माझ्या लेखनाची स्तुति केली–आणि 'नाशिकला जाण्यापुरतें भाडें द्या–लगेच गेलों की परत पाठवितों. घरूनच मागवून घेतले असते–पण मला येथे विनाकारण थांबावें लागेल–वगैरे कारणें त्याने केविलवाणेपणाने सांगितलीं.

नाशिकला गाड्या कोणत्या सुटतात, रेल्वेने जाण्यापेक्षा एस. टी. ने जाणें कमी खर्चाचें व सोईचें कसें आहे, नाशिकची माहिती–तेथील चार मोठमोठीं नांवें–फक्त सहा पावणेसहा रुपये एस. टी. चें भाडें व घरीं पोहोचण्याकरिता रुपया, सव्वा रुपया–एकूण सात रुपये !

मी माझ्या त्या दोन मित्रांना हसत विचारलें,

"काय, देऊं का हो सात रुपये ?"

दोघांनीहि सस्मित संमति दिली.

मी त्या वृद्ध गृहस्थाच्या हातावर सात रुपये ठेवले.

"एक कागद द्या—पावती लिहून देतों !" तो वृद्ध डोळ्यांत अश्रु आणून म्हणाला.

"पावती नको !" मी गंमतीने विडी पेटवीत म्हटलें.

"म्हणजे ? तुम्ही मला अप्रामाणिक समजत आहांत—हे पैसे परत येणार नाहीत असें तुम्हांला वाटतें आहे. आज शनिवार आहे ! उद्या रविवार, पोस्टाला सुट्टी !—सोमवारीं नाशिकहून तुम्हांला मनिऑर्डर करतों–उशिरांत उशिरा बुधवारीं आपल्या हातीं हे सात रुपये पडतील !" तो वृद्ध सर्वांकडे पाहत म्हणाला..

मीं नुसतीच संमतिदर्शक मान हलविली.

पण जातांना त्याने मला सांगितलें, "'लक्षांत राहिलेलीं माणसं' हें सदर बंद करूं नका हं !— फार लक्षांत राहतात तीं !"

अदबीने नमस्कार करून तो वृद्ध बाहेर पडला.

त्यानंतर बुधवार आले आणि गेले. पण मनिऑर्डर आली नाही— अर्थात् मला आशा नव्हतीच !

पण त्या वृद्धाच्या शब्दाकरिता मीं कांहीहि भावनेने का होईना सात रुपये दिले. वाटलें, त्याच्या शब्दाकरिता 'लक्षांत राहिलेलीं माणसं' हें

सदर—त्याचें शब्दचित्र लिहूनच पुरें करावें !

या शब्दाने ' लक्षांत राहिलेलीं माणसं ' हें सदर पुरें करीत आहे—आतापर्यंत ' लक्षांत राहिलेलीं माणसं ' जुन्या अनुभवांतून लिहिलीं—आता जग बदललें आहे—माणसें बदललीं आहेत. माणसांच्या मनोवृत्ति बदलल्या आहेत—तें पाहावें आणि जमलें तर तीं शब्दचित्रें सवडीने केव्हा तरी लिहावींत !

पण त्या वृद्धाबद्दल एक मात्र लिहावेंसें वाटतें. ते सात रुपये माझे कधीहि परत येणार नाहीत—पण निदान ते नेतांना तरी त्याची परत करण्याची इच्छा असावी—आणि हें शक्य नाही हें त्यालाहि त्याच वेळीं कळलेलें असावें !

• • •

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रम ३८३८९...... वि: ..... ..........
....................... नों दि ...
REFBK-0011637
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
११८३८

# श्री. य. गो. जोशी

## यांचें वाङ्मय

### कादंबऱ्या

१. वहिनींच्या बांगड्या
२. शेवग्याच्या शेंगा
३. सुपारी
४. हिरकणी
५. होमकुंड
६. साहित्यिकांची सफर
७. अनंता परत आला
८. त्रिदोष
९. पडसाद
१०. श्रीकांत

### लघुकथा

१. पुनर्भेट भाग १ ते ७
२. भेळ
३. तुळशीपत्र आणि इतर गोष्टी
४. गजरा मोतीयाचा
५. तरंग
६. मायेच्या सांवल्या
७. जाईजुई
८. दुधाच्या धारा
९. रेघोट्याचें दैवत

### नाटकें

१. भोळा शंकर
२. श्रीमुखांत
३. बोलका सिनेमा

### चारित्रात्मक

१. अनौपचारिक मुलाखती
२. दुधाची घागर
३. लक्षांत राहिलेलीं माणसें

मराठी ग्रंथ संग्रहालय, [illegible]
अनुक्रम ३८७८७९
क्रमांक ............ दि. [illegible]